६८-

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
नाटक

लेखक रा. म. लाकभाते

संग्रहालय क्रमांक
२५५
·३५४

पुस्तकाचें नांव हंस पाळिका

६९-

नाटक

# हंसपालिका.

मनोरंजक कल्पित नाटक.

हें पुस्तक

## रावजी मनोहर ताकभाते.

यांनीं

तयार केलें,

तें

## पुणें येथें

रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं आ-
पल्या "जगद्धितेच्छु" छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केलें.

जुलै सन १८८८.

सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिस्टर केलें असे.

( सर्व हक्क रावजी श्रीधर गोंधळेकर
यांनीं आपलेकडे ठेविले आहेत. )

आवृत्ति २ री.

किंमत १॥ रुपया.

ग्रंथ संग्रहा

# आपले लोकप्रिय.

श्रीमंत राजश्री

रामचंद्रराव ऊर्फ अप्पासाहेब जमखिंडीकर यांस,

यांचे ठायीं

स्त्रीशिक्षणाविषयीं उत्सुकता व विद्येची अभिरुची
आणि परोपकारादि स्तुत्य कृत्यांस उदारता
इत्यादि अनेक सद्गुणांचें वास्तव्य जाणून
व त्यांचे परवानगीवरून

करानें,

हें लहानसें पुस्तक कृतज्ञतापूर्वक परमादरानें

# नजर केलें असे.

रा० म० ता०.

या पुस्तकास रा० रा० रामचंद्र मोरेश्वर राजे व गोविंद गणेश राहतेकर आणि विष्णु भगवंत मांडे यांणीं स्तुत्य मदत केल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

रा० म० ता०

# प्रस्तावना.

कोणतेंही पुस्तक वाचण्यापूर्वीं त्याची प्रस्तावना वाचावी हें फार सयुक्तिक आहे. ह्मणजे असें केल्यानें पुढें पुस्तकांत काय आहे, व तें कोणत्या विषयावर आहे, ह्याचा सारांश जलद ध्यानांत येतो. आणि नंतर पुस्तक वाचण्यास योग्य किंवा अयोग्य याचा निश्चय मनास करतां येतो. प्रस्तुत जें तुह्मी पुढें पुस्तक वाचणार आहां याचें " हंसपालिका नाटक " असें नांव आहे. कारण, यांतील मुख्य नायका जी आहे तिचें हंसपक्ष्यांनीं पालन केलें आहे; याकरतां **हंसपालिका** असें नांव पुस्तकास दिलें. यांत एकाच गोष्टींत लहान लहान चार भाग ठेविले आहेत. आणि हुबेहुब रंगमंडपीं सभासद मिळून सूत्रधार विदूषकासह नाटक होत आहे काय ? अशा प्रकारें लिहिण्याचा कटाक्ष ठेविला आहे. गोष्ट मनोवेधक असून, तिच्या अंगभूत संगतीनें, स्त्रियांच्या नादानें पुरुष कोणतीं साहसकर्में करतात, फितुरी मनुष्य राजमंडळांत असल्यास काय अनर्थ होतो, अशिक्षित मनुष्य मोठ्या हुद्यावर असल्यास त्याचे हातून दारुण परिणाम, श्रीमंताजवळ हांजी हांजी करणारे लोक आपला फायदा कसा करून घेतात, स्त्रीपुरुषांचे खऱ्या प्रीतीपेक्षां जगतांत कोणतीच मो-

ल्यवान् वस्तू नाहीं, सुधारलेल्या राज्यांची आणि स्वेच्छाचार अंदाधुंदी राज्यांची तुलना, मनुष्यदेहास सुखदुःख कसें समान असतें, इत्यादि प्रकारचें फार चांगलें स्पष्टीकरण करून, हास्य, वीर, करुणारस बरेच साधले आहेत; व मुख्यरस शृंगार ठेविला आहे.

नाटकरूपानें लिहिलेल्या गोष्टीचा सारांश प्रथमताच वाचकांस प्रथम पानावर कळला जावा. परंतु तसें केल्यानें पुढील वाचण्यांत गोडी, व अंतःकरणास चटका कमी राहतो. याकरतां सारांश लिहिला नाहीं.

रावजी मनोहर ताकभाते.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

पहिली आवृत्ति सरल्या कारणानें आह्मी ही दुसरी आवृत्ति काढली आहे. पहिल्या आवृत्तींत ज्या छापण्याच्या चुका झाल्या होत्या त्या ह्या आवृत्तींत दुरुस्त केल्या आहेत. सदर्हू पुस्तकाबद्दल योग्य मोबदला घेऊन रा. रावजी मनोहर ताकभाते यांनीं आह्मांस सर्व प्रकारें हक्क विकला आहे.

रावजी श्रीधर गोंधळेकर.

# ग्रंथकर्त्याचा उद्देश.

सकल आनंदाचें व शांतीचें मूळ विद्या हें उघड आहे; परंतु त्यांतही दोन भेद आहेत. एक आनंदविद्या व दुसरी उदरविद्या. जन्मभर काबाडकष्ट करून केवळ उदराकरतां व लौकिकाकरतां संपादन करणें, ती उदरविद्या म्हणण्यास हरकत कोणती ? चित्त उदास झालें तर, आनंदाच्या लहरा तिजपासून उत्पन्न होतील काय ? नाहीं. प्रत्येकानें ती उदरापुरती साध्य करून बाकी वेळ, जो आपणास दुर्लभ मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, याच्या खऱ्या सुखाकडे खर्च करावा हें रास्त आहे. सर्वच आयुष्य उदरविद्येचे मागें घालवूं नये. तर कांहीं तरी आनंदविद्येचा विचार करावा. कारण, जातो आहे क्षण हा पदरांत. पुढील क्षण कसा येतो कोण जाणे हा धाक मागें आहे. तर अशा काळाच्या दाढेंत असतां दाढ मिटेपर्यंत स्वस्थ बसावें काय ? मनुष्याच्या ज्ञानाचा कांहीं तरी उपयोग ! कां सर्व आयुष्य उदरनिवृत्तीकडेच. "नादे चित्ता शांती ऐशी विद्या कशाला" हें वाक्य खोटें कांहो ? नाहीं. याकरतां चित्त ज्या रीतीनें शांत होईल, या दुर्लभ मनुष्यदेहास सुखाचा एक तरी क्षण जाईल, आपण दुनियेंतून नाहींसे झालों तरी मागें कित्येकांस आपण करून ठेविलेल्या आनंदविद्येपासून समाधान होईल, व जेणेंकरून अखंड कीर्ति राहील,

अशा कामांत आपला वेळ उदरविद्येपेक्षां जास्त घालवावा, हें सुज्ञास योग्य आहे, आणि प्रायः हाच विचार दृढ धरून मागें झालेले जे जगविख्यात विद्वान्, कालिदास, भवभूती, वामनपंडित, मयूरपंत इत्यादिकांनीं आपलें चातुर्यभांडार खर्चून आह्मांकरतां आनंदविद्या करून ठेविली. पहा खरोखर मन उदास झालें असतां, त्यांतील एखाद्या विद्वानाचा ग्रंथ किंवा कवित्व अगर त्यांच्या स्वचातुर्याचें एखादें नाटक, मग बोधपर ह्मणा किंवा शृंगारपर ह्मणा, परंतु तें पाहिलें असतां हल्लीं आपल्या मनास आनंद होतो. आणि लागलींच अशी कल्पना येतें कीं, त्यांनीं इतके परिश्रम करून ही आनंदविद्या तयार केली, त्यांत त्यांना कांहीं फायदा होता काय ? नाहीं. तर खरोखरच ते उदरविद्येकडे लक्ष ठेवित नव्हते, असें सिद्ध होतें. त्यांचे मनांतून मागें कीर्ति राहून आनंदविद्येंत सर्वांनीं रमावें हाच हेतु खरा. म्हटलें असतां त्यांना पोट नव्हतें काय ? होतें. व तत्प्रीत्यर्थ त्यांची विद्या व वेळ ही खर्च होत होतीं. परंतु खरें लक्ष आनंदविद्येकडेसच ठेवित होते. असो. ह्याच कारणानें त्यांच्या कीर्तिचे डंके अद्याप झडत आहेत, व आपलें एखादेवेळीं चित्त उदास झालें तर आपण त्यांनाच शरण जातों. ह्मणजे त्यांच्याच ग्रंथांतील एखादा सुंदर विषय वाचून किंवा ऐकून आपण समाधान पावतों.

वरील विचार मनांत आणून अलीकडेही बऱ्याच

विद्वजनांनीं याकामाकडे लक्ष पोंचविलें आहे. म्हणजे आपापल्या बुध्द्यनुसार कोंणी भाषांतरें, कोणी स्वकपोलकल्पित कादंबऱ्या, कोणी नाटकें अशीं बरीच गद्यपद्यात्मक पुस्तकें तयार केलीं आहेत. प्रत्येकाचा हेतु ग्रंथ करण्याबद्दल वेगळा वेगळा असतो. त्यांत स्त्रियांना वाचण्यास तर सोपें असावें आणि मनोरंजन तर उत्तम व्हावें अशीं कल्पित पुस्तकें, कादंबऱ्या किंवा नाटकें फारशीं प्रसिद्ध दिसत नाहींत. पुराणांवरून आहेत; किंवा भाषांतरावरून गद्यपद्य अशीं बरीच झालींत, परंतु कल्पित असून वाचण्यास सोपीं व मनोवेधक अशीं फारच कमीं असतील. पुस्तकांच्या मधून कविता असल्यानें त्यांसहित वाचणारे, व त्याबरोबरच सर्व अर्थ ध्यानांत आणणारे, असें वाचणार, स्त्रिया वगैरे नूतन उमेदीचे मंडळींत कमीच निघतील. आणि त्यामुळें पुस्तकांचे मधून कविता असल्या म्हणजे त्यांच्या वाचण्यांतील रसाचा विपर्यास होतो असें पुष्कळ आढळतें. नूतन उमेदीचे वाचणारास प्रथम मनोरंजन होऊन वाचण्याचा चटका लागला, म्हणजे मग आमच्या देशबांधवांनीं केलेली गद्यपद्यात्मक पुस्तकें उपयोगीं खरीं.

वर लिहिलेल्या नूतन उमेद्वारांस ( स्त्रिया वगैरे. ) किंवा वाचकांस, एक अल्पमतीनें येईलसें पुस्तक करून सादर करावें, असा फार दिवस हेतु घोळत होता. परंतु उपयोग काय ? या कामास किती नडी ! पुस्त-

क लिहिणें किंवा छापून प्रसिद्धकरणें याचें सुख बहुतेक माझ्या देशबांधव पुस्तककर्त्यांनां माहित असेलच ! तेव्हां ह्या प्रसंगीं त्याबद्दल स्पष्टीकरण करण्याचें कारण दिसत नाहीं. असो, सहस्त्रावधी नडी येऊन पुढें हजर झाल्या. परंतु ईश्वर कृपेंकरून माझ्या सुज्ञ व अकृत्रिम स्नेह्यांच्या मदतीनें त्यांतून पार पडून तुह्मां वाचकांच्या दृष्टीसमोर उभा राहिलों. कृपादृष्टी करणें हें तुह्मांकडे आहे.

ग्रं० क०

ना-३६०

# हंसपालिका.

## मनोरंजक कल्पित नाटक.

### भाग १.

### प्रवेश १.

स्थळः—रंगमंडप.

पात्रें.

सूत्रधार........................नाटककर्ता.
विदूषक........................साह्य करणारा.
गणपती........................सांबाचा पुत्र.
सरस्वती........................ब्रह्मकुमारी.

प्रारंभीं रंगमंडपाचे ठायीं सूत्रधाराचें आगमन होऊन मंगलाचरणास आरंभ होतो. ( कांहीं नामस्मरण झाल्यानंतर नाचत नाचत मोठ्या डौलानें विदूषक प्राप्त होतो.)

वि०—(इकडे तिकडे फिरून आपणाशींच) अहाहा! काय थाट हा! काय वृक्षागणित माणसें लटकलींत हीं बा! मौजच बनली आहे बा. ( मोठ्यानें हसून ) जिकडे जावें तिकडे आवडतें तेंच कपाळीं येतें. विछाईत काय सुंदर आंथरली आहे! अस्मादिक येथें येणार तों अगोदर इतका थाट! आणि मग आल्यावर—

(अर्धेंच बोलून) पण एक कसें चुकला? मीं ताकीद केली होती कीं, हंड्या, ग्लासें सर्व विझवून मी येण्याच्या पूर्वीं दिवाणखाना मात्र पेटवून ठेव. तसेंच मधल्या गच्चीवर पलंग अधांत्री आडवा बांधून त्याच्या खालच्या बाजूस गादी टाकून वर सत्रंजी पसर. पण तो रामडू विसरला वाटतें? करावें काय? आतां मला मोठा राग येऊन गेला होता; पण तो या वेळेस जवळ नाहीं. नाहीं तर मी आपल्या पाटीला तेल लावून त्याचे पाठीवर खरपूस फटके मारले असते. असो, आतां विदूषक महाराज, अंमळ शांत व्हा. दांतही आपलेच आणि ओंठही आपलेच. करावें काय? ( इकडे तिकडे फिरून ) आतां येथेंच निजावें ह्मणून निजूं लागतो तों इतक्यांत—)

सू०—अहो, संभावीत. ( सूत्रधार हांक मारतो पाहून )

**विदूषक** मागें तोंड करतो.

सू०—( त्याचे पुढें जाऊन ) अहो, तुह्मी कोण? येथें येऊन हीं वेडींविद्रीं भाषणें काय करतां? स्थीर होऊन या गरिबाशीं दोन शब्द बोला; आपलें वृत्त ऐकण्यास आह्मी फार उत्सुक आहों.

वि०—( सूत्रधार विचारतो पाहून ) भिंतीकडेस तोंड करून काय सुंदर चित्रें आहेत हीं! बस्स. आपली तर तहान भूक हरली; एकून चित्रें काढणारा उत्तम मूर्ख होता ह्यांत संशय नाहीं.

सू०–( आणखी त्याचे पुढें जाऊन ) अहो थोर गृहस्थ, आह्मी फार वेळ आपणास विचारतों हें ऐकूं येत नाहीं काय ?

वि०–( रागानें आंगावर येऊन ) काय आहे हो? तुह्मी कोण ? काय बडबड चालविली आहे ? सरकार आतां निजण्याच्या बेतांत आहेत आणि तुह्मी रोषनाईला हंड्या लावून हा कशाचा चकचकाट केला आहे? आणि ही मंडळी कां इतकी जमली आहे? कांहीं लढाईचा बेत करून आमचें राज्य घेणार कीं काय ? बरें असो. कांहो तुह्मी आह्माला तुमच्या चिचीच्या लग्नाबद्दल लग्नपत्रिका धाडली होती त्याचें कसें काय ? जर तुमचा बेत राहिला असला तर आम्ही आपले माघारी जातों. बोला बोला लवकर. बरें तें असो. अहो, आणीक एक आह्मांस नुक्तें स्मरण होऊन विसरलों त्याचें कसें काय ? ( तोंडांत बोट घालून) हो, हें मघांपासुन तुम्ही ( मागें बोट करून ) तुंणतुंण, झणझण, फडफड, वाजवितां हें काय ? सांगानात ? तुम्ही तर मोठे थोर दिसतां ! काय बुवा मतलबी ! आपलें तेवढें झांकझांकून ठेवायचें आणि दुसऱ्यास मात्र तुम्ही कोण ? तुम्ही कोण ? तुमचें वृत्त सांगा ह्मणायचें. ( मोठ्यानें हंसून ) आपणाशींच हं ! किती हंसावें ? वडील माणसें बसलीं आहेत.

सू०–शाबास बाबा शाबास! आज तुझी विद्वत्ता,

चातुर्य, तशीच समयसूचकता पाहून हे सभासद फार आनंद पावले. अस्तु. आतां वेळ फार झाला, अद्याप पुढें चरित्र फार होणें आहे. आतां माझें नांव व मी करणार काय ? आणि हे संपूर्ण सभासद कां मिळाले आहेत? हा सर्व प्रकार थोडक्यांत सांगतों, श्रवण कर. माझें नांव सूत्रधार. ( आणि पुढें बोलणार तों )

वि०–हां हां आतां ठीक झालें. पण कांहो नेहमीं अखंड धार असतेना ? कां कधीं कधीं बंद पडत असते ? ह्मणजे आपला श्रावण मासांतला खर्च वांचला. तुह्मालाच मूर्तिमंत नेऊन महादेवावर आडवें टांगिलें, म्हणजे हवी तितकी धारच धार.

सू०--वहावा! तुह्मी तर अरण्यपंडितच आहां, पण अशी ज्या त्या गोष्टीवर टीका जर कराल, तर आह्माला सर्व सरंजाम घेऊन मुकाट्यानें घरीं गेलें पाहिजे. तर कृपा करून, मी काय रसभरित चरित्र करणार हें पाहून जर आपणही थोडी बहुत मदत कराल,तर या सर्व सभासदांचें मनरंजन होऊन माझ्याही श्रमाचें सार्थक्य होईल; पण हें सर्व आपले हातीं आहे.

वि०–हो हो. मदत करण्याचें काम माझें. पूर्वीं एकदां रामभटजींच्या वांसराची गाय चुकली तेव्हां तीन दिवस दिवसाची रात्र करून हिंडलों, पण गाय मिळवून आणली. मग दोघांची दृष्ट–भेट झाल्याबरोबर वांसरूं जेव्हां पान्हवलें, तेव्हां मग गाय तर

भिऊन दमली तरी पान्हा राहीना. शेवटीं मग मीं तोंड लावून दूध प्यालोंन् ऐकतां काय ?

सू०—अरे, तें मी विचारीत नाहीं; आणि तसली मदत मला नको. आह्मां सर्वांत सर्व रसांची अनुकूलता असून एक हास्यरसाची मात्र कमतरता आहे, तव्हां जेथें जेथें आमच्याकडून कांहीं न्यून पडेल, तेथें तेथें त्वां आपल्या हास्यरसानें पूर्णता करीत जावी. आतां पहा तुला येथें काय चमत्कार दाखवितों तो. प्रथम विघ्ननिवारणार्थ गणपतीचें स्तवन करून त्यास प्रत्यक्ष येथें आणवितों. घे दर्शन. (**सूत्रधार**आंत जातो व पडदा पडतो.)

(पडद्याचे आंत.)

सू०—(दीर्घ स्वरानें) हे गजानना, हे गौरीसुता, हे वक्रतुंड, हे गणनायका, हे शूर्पकर्णा, हे भक्तप्रिया, हे विद्याधरा, या अल्पमती पामराचें वांछित पुरविण्यास एकवार ह्या रंगभूमीप्रत प्राप्त होऊन तुझ्या पादपंकजदासास पूर्ण आशीर्वाद द्यावा. हे प्रभो, आपण कसे आहांत ? दयेचे केवळ सागर, मूर्तिमंत ज्ञानमय, तसेच दीनाचे नाथ, सकळ देवांत श्रेष्ठ असा जो तूं आदिईश्वर तुजप्रत नमस्कार असो; असें स्तवन होत आहे तों एकदम सहस्र सूर्यांचें तेज असा दिव्य प्रकाश होऊन चहूंकडेस केशर कस्तुरीचा परिमळ भरून राहिला. (तशींच नानाप्रकारचीं वाद्यें वाजूं लागलीं. इतक्यांत—)

सू०–(बाहेर येऊन) अरे विदूषका, पहा आतां काय थाट आहे तो. गजानन महाराजाची स्वारी येत आहे.

(पडदा वर होतो.)

सू०–( गजाननाची स्वारी आली असें पाहून ) यावें यावें परमेश्वरा यावें. या सिंहासनावर बसावें. (गणपती बसतात.)

सू०–वंदन करतों महाराज.

**गणपती**–हे सूत्रधारा, वत्सा, तुजप्रत कल्याण असो. बालका, कैलास पर्वताचे ठायीं आदिईश्वर जो गिरिजारमण भोळा शंकर, त्याचे अग्रभागीं महा आनंदांत तल्लीन होतसाता, मी गायन करीत होतों; इतक्यांत तुझी दीन वाणी श्रवण करून मनोवेगानें या ठिकाणीं प्राप्त झालों. वत्सा, माझ्या आगमनाची इच्छा किमर्थ केलीस ?

**सू०**–हे सिद्धिविनायका, या रंगमंडपाचे ठायीं कांहीं अद्भुत चरित्र नाटकरूपानें दाखविण्याचें या पामरानें मनांत आणलें आहे. परंतु बुद्धिदाते आपण आहांत, आपल्या आज्ञेशिवाय वृक्षपत्र हालणें कठीण, मग हें महत् कार्य कोठून होणार ?

**गण०**–हे सूत्रधारा, तूं जो विचार केला आहेस, तो सिद्धीस जाऊन या सभासदांचें पूर्ण मनोरंजन करशील हा माझा पूर्ण आशिर्वाद आहे.

**सू०**–महाराज, आपल्या आशिर्वादेंकरून कार्य

सिद्धीस जाईल ही तर शंकाच नको. परंतु ( हात जोडून ) आणखी एक महा संकट आहे.

**गणपती**—वत्सा, कोणतें संकट आहे तें निवेदन कर.

**सूत्र०**—हे विघ्नांतका, माझीं संपूर्ण नाटकपात्रें अज्ञान व लहान बालकें आहेत; तेव्हां सभासदांपुढें मिष्ट भाषणें करून मनोरंजन करण्यास कशीं समर्थ होतील हें मोठें संकट आहे महाराज.

**गण०**—वत्सा. सांगतों हें श्रवण कर. ब्रह्मकुमारी जी सरस्वती तिचें तूं स्तवन कर, ह्मणजे तुझे सर्व हेतु पूर्ण होतील. आतां मी स्थानाप्रत गमन करतों.

**सूत्र०**—कृपा करून क्षणभर स्थिर असावें महाराज. सरस्वती मातोश्रीचें स्तवन करून त्यांस आतांच येथें आणवितों. ( असें ह्मणून पडद्याच्या आंत जातो. )

( पडद्याचे आंत. )

**सूत्र०**—( दीर्घ स्वरानें ) हे सरस्वती मातोश्री, हे आदिमाये, हे जगज्जननी, हे भक्तवरदायिनी, हे भक्तप्रिये, हे त्रिपुरसुंदरी, हे हंसवाहिनी, हे वागेश्वरी, या दीन वत्सावर कृपादृष्टि प्रेमपान्हा सोडून, दासाचें हृद्गत पूर्ण करावें; आणि एकवार या रंगमंडपीं प्राप्त होऊन बालकास पूर्ण आशिर्वाद द्यावा ही प्रार्थना आहे.

**सू०**—( बाहेर येऊन ) अरे विदूषका, मातोश्री-

ची स्वारी येत आहे, नीट मर्यादेनें उभा रहा.

वि०–हो येऊंद्या त्यांना. मी आपले पाय डोकीवर घेऊन मुडद्यासारखा उभाच आहें.

सू०–( रागावून ) ही का थट्टेची वेळ कारे ? ( इतक्यांत सरस्वती मातोश्री आल्या असें पाहून ) यावें, यावें, मातोश्री यावें. हे गजानन बसले आहेत ह्यांचे सन्निधानीं बसावें.

**सरस्वती**–मयुरावर बसून तालसुरावर नाचत नाचत रंगमंडपीं प्राप्त होतात.

सू०–वंदन करतों मातोश्री.

स०–बालका, तुजप्रत कल्याण असो. वत्सा, सत्यलोकाचे ठायीं स्कंदीं विणा घेऊन, आदि अंत ना मध्य असा जो षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान, त्याचे गुणानुवाद गायन करीत असतां, गीत संगीत नृत्यांत निमग्न होतें, इतक्यांत तुझा करुणाशब्द कर्णीं आला, ह्मणून मयुरारूढ होऊन या रंगभूमीचे ठायीं प्राप्त झालें. बालका, माझ्या आगमनाची इच्छा किमर्थ केलीस ?

सू०–मातोश्री सांगतों श्रवण करावें. यत्किंचित् पामरानें कांहीं कल्पित चरित्र नाटकरूपानें या सभासदांस दाखविण्याचें मनांत आणिलें आहे. परंतु माझीं पात्रें अज्ञान, मुखदुर्बळ; तेव्हां मधुर भाषण करून सभासदांचें मनोरंजन करण्यास असमर्थ आहेत असें जाणून आपली प्रार्थना केली. हे अंबिके, आ-

पले कृपेनें मुकेही बृहस्पतीवत् होतात; तसेच जन्मांधही रत्नपारखी होतील; पंगू पर्वतशिखरें चढतील; शतमूर्ख वेदांतज्ञानी होतील ही आपली सत्ता. तेव्हां मज गरिबाचे यत्किंचित् हेतू पूर्ण होणार नाहींत काय ?

सर०—वत्सा, सूत्रधारा, तुझीं अज्ञान बालकें बृहस्पतीवत् भाषणें करून या सर्व सभासदांचें मनोरंजन करतील हा माझा पूर्ण आशिर्वाद आहे. आतां मी स्वस्थानाप्रत गमन करतें.

सू०—यावें मातोश्री यावें, वंदन करतों.

सर०—कल्याण असो. ( सरस्वती जाऊं लागते इतक्यांत. )

वि०—अहो ! अहो ! आईसाहेब कां मागल्या पायीं पळ काढला ?

सर०—अरे पळूं कशाला ? भक्तकार्याकरितां आलें होतें. त्याचें वांछित पूर्ण केलें; आतां स्वस्थळाप्रत जाण्यास काय प्रत्यवाय ?

वि०—या ठिकाणीं तुमचा कोण भक्त होता, आणि वांछित कोणाचें पूर्ण केलें ?

सर०—अरे, या ठिकाणीं मत्भक्तिपरायण जो सूत्रधार त्याकरितां माझें आगमन झालें, आणि त्यासच वरप्रदान दिलें.

वि०—( सूत्रधारास हाक मारून ) कांहो सूत्रधार, तुह्मीं तरी मोठे आपमतलबी दिसतां! पूर्वीं आह्मा-

ला म्हणालांत कीं, या ठिकाणीं तुह्मी आणि मी मिळून एक सुंदर चरित्र करूं, आणि जो लाभ होईल तो समसमान वांटून घेऊं. आणि आतां आपल्याच पोळीवर तूप ओढलें कीं नाहीं ? सरस्वती बाबानें जें कांहीं दिलें तें एकटच्यानेंच गट्टम केलेंना ? शाबास! असें असेल तर आह्मी आपले चालते होतों. चला आटपा हो मंडळी. जा घरीं, चला, हे आह्मी चाललों, विझवा हांड्या. ( विदूषक जातो पाहून )

सू०—अरे हें काय ? अशी घटकोंवटकीं तुझी तबियेत जाऊं लागली, तर मग पुढें चरित्र होणें आनंदच दिसतो ! हीच का ती मदत करणार ? सरस्वती मातोश्रीनें जें वरप्रदान दिलें, तें मला एकटच्यालाच नव्हे. तर, त्यांचे आशीर्वादानें सर्वांचें कल्याण होणार आहे. आणि तुला दर्शन झालें हा केवढा लाभ झाला समजत नाहीं का ? तुला आणिक कांहीं पृथक् मागणें असल्यास मागून घे.

वि०—हो ! असे वाटेवर या. मी आतां मागून घेतों. (सरस्वतीचे पुढें जाऊन) वंदन करतों मातोश्री.

स०—कल्याण असो. तूं कोण आणि तुझी काय इच्छा आहे ?

वि०—( गांगरून ) मी आपला—छेबा तसें कांहीं नाहीं, मी आपला आहें.

स०—अरे, तुझी काय इच्छा आहे ती बोल सत्वर.

मला सत्यलोकीं जाण्यास विलंब झाला.

वि०—माझी इच्छा होय? आतांशीं माझ्या मनांत ( थोडा घोंटाळून )पायांनीं चालावें असें आलें आहे; कारण, हात फार दमले आमचे!

स०—ठीक आहे, तुझे सर्व हेतु पूर्ण होतील. ( असें ह्मणून सरस्वती अदृश्य होते. )

गजा०—हे सूत्रधारा, पहा सरस्वतीचें नृत्य गीत ऐकून मम मानसाचे ठायीं फार आल्हाद झाला. वत्सा, आतां मी कैलासभुवनाचे ठायीं गमन करितों.

सू०—यावें, गजानना यावें, ( गजानन महाराज अदृश्य होतात. )

( पडदा पडतो. )

वि०—( पडद्याचे बाहेर येऊन ) अहो सूत्रधार, इकडे या, असे जवळ या पाहूं.

सू०—जवळ येऊन, हा आलों पहा, काय ह्मणतोस?

वि०—अहो आतां आले होते हे कोण? तुह्मीं तरी बंगाली विद्या शिकलां असें वाटतें. एकुण कळसूत्रीपणा असा तुह्मीं करावा. काय चित्रें नाचलीं इतका वेळ! मला तर झोंप सुध्दां येईना. बरें तें असो. आणीक कांहीं असलीं चित्रें तुमच्या पेटारींत आहेत काय? असलीं तर येऊं द्यां बाहेर.

सू०—अरे वेड्या हीं कां चित्रें नाचलीं ? अरे पूर्वीं आले ते विघ्नहर्ते, शंकराचे पुत्र, त्यांना गजानन म्हणतात, आणि मागून आली ती ब्रह्मकुमारी. अरे,

त्या दोघांनीं पूर्ण आशीर्वाद दिला, आतां आपणास विघ्नांचें भय म्हणून बिलकूल नाहीं; आणि त्यांच्या कृपेनें आपले सर्व हेतू पूर्ण होतील. असो, आतां रात्र फार झाली,मी खेळास आरंभ करतों.आतां येथें–( विदूषकाचे पाठीवर हात ठेवून सांगतो. ) प्रथम भुवनसुंदरी व तिच्या सख्या यांचें मनोवेधक भाषण होईल, आणि नंतर ते विलासबागेंत जातील हा सर्व प्रकार हुबेहुब करून दाखवितों लक्ष्य दे.

वि०–वः! मोठी मौजच होणार तर मग! सूत्रधार, जलदी करा तर, एकदां विलासबागेंत जाण्याचें माझे-ही मनांत आलें आहे.

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश २.

### स्थळ.–शृंगारपुरींतील राणीचा रंगमहाल.

### पात्रें.

भुवनसुंदरी............ भुवनपाल राजाची स्त्री.
सुमित्रा............... तिची आवडती दासी.
चंद्रभागा.............. उपाध्याची स्त्री.
भुवनपाल.............. शृंगारपुरीचा राजा.
भालचंद्रभट........... राजाचे उपाध्ये.
विदूषक...............सर्वांचें मनोरंजन करणारा.

## रंगमहाल.

**चंद्रभागा.**—सुमित्रे, आज कशी काय तब्यत आहे ? ठीक आहेना ? आज सकाळपासून बाईसाहेबांची भेटच नाहीं, म्हणून आपली समाचारास आलें होतें.

**सुमित्रा**—( नाकावर बोट ठेवून ) हं, हळू बोला. सवारी आतांच वाईच लवंडली आहे.

**चंद्र०**—कां बरें ? आज कांहीं अधिक उणें झालें कीं काय ? जरा इकडे ये दाराबाहेर.

**सुमि०**—( हातानें खूण करून ) नको. ( दाराजवळ येऊन ) बाईसाहेब जाग्या झाल्या तर मंग उगीच राग भरत्याली.

**चंद्र०**—कांगे ? काय झालें ? पण मी कांहीं ( हळूच ) हिकडचें तिकडें अगदीं बोलायची नाहीं. तूं आपली गरीब बापडी, बोलून उगीच तुझ्या पोटावर कां पाय आणीन ?

**सुमि०**—अहो काय झालेया म्हुन काय विचारतां ? कांहीं नवीन कां झालया जें है तें पहिलंच है, अन तेंबी समद्यास्नि ठाव है. आज सकाळीं सरकारची सवारी आलिया त्यांच्या आदीच बगा, आपली सेनापतीची बाईल, रखमाबाइ नव्ह कां? ती हित आली, अन् जरा बाईसाव अन् त्या जरा कांहीं एकमेकीला झनाल्या. मंग बाई. रखमाबाई बी उठून गेली, अन् तवाधरून जी बाई साहेबांची तबीयत

बिघडली ती बगा आमासनी, असें झालंया कीं देवा, हें काय संकट अन् काय दुःख हें! बाईसाहेब पलंगावर गडबडच्या लोळत, अन् खाईनात पिईनात, कायबी नहीं, डागिने बी झोंकून दिले. लई धांदल झाली बगा, तो नवा शालू नहीं कां आनला? तो नवा. त्याचा रंग बिंगबी लयी नामी दिसतोयां तो.

**चं०**—हं, (मनांत समजून) तो हिरवागार, दुगोली परवांच "माणकोजीनें पैठणाहून पाठविला तो." मग त्याचें कसें काय झालें?

**सुमि०**—झालं काय, त्या धांदलींत त्योबि जरा चिरकलान् काय? मंग तित सरकार आल. (हळूच) त्यांचा तरी अक्शी जीव परान बाईसाहेबावर. मंग बाईसाहेबासनी बगा त्यानीं मांडीवर घेतलं अन् मग काय ते सुखसोहळ! इतक्यांत (बाईसाहेबांची हांक आलीसें वाटून) जी जीअं, आलें हो बाईसाहेब. (धांदलीनें आंत जाते.)

**सुमि०**—( धांवत जवळ येऊन )काय सरकार?

**भुवन०**—आग मेलं घटकाभर कां जवळ बसूं नये? ऊठ पळ बाहेर, ऊठ पळ बाहेर! हें काय बाई? तो मेला शिवऱ्या आला असेल बाहेर, ह्मणून पाहरा सोडून गेली असशील?

**सुमि०**—नाहीं बाईसाहेब, एकद्यां माणसापून घडल ह्मनून, यिळभर सारं तेच कां मनांत धरत्यात. आपन बाईसाब त्या दिवशीं राग भरल्यात, त्या दिसापून

मंग त्या मेल्याचें तोंड नाहीं पाहिलं.

वि०-(कान देऊन ऐकून हळूच)कांगे ? सांगूं कां आतां ? त्या तबेल्यांत त्याला चणे कोण देत होतं ? मीं मागितले तर मला देत नाहीं ह्मणाली नाहींस ?

सुमि०-(हातानें खूण करून) सांगूं नको, मंग तुला बी देईन.

वि०-बरें तर मग, पण भाजून देशीलना?

सुमि०-हो.

भुव०-अग, इतक्यांत मला डोळा लागला न लागला तर लागलीच बाहेर गेलीसना ?

सुमि०-बाईसाहेब, त्या चंद्रभागाबाई आल्यात तित बाहेर उभ्या हैत. त्यांनीं जरा दाराजवळ राहिलें ह्मनुन गेले.

भुव०—कोण, चंद्रभागाबाई ? कां आल्यात ? मग त्यांना बाहेर कां उभें केलें ? आंत बोलाव.

सुमि०—होय बाईसाहेब बोलावतें. ( लगबगीनें बाहेर येऊन ) चंद्रभागाबाई,बाईसाब जाग्या झाल्यात अन् तुह्मासनी बोलवित्यात.

चंद्र०—( आंत येऊन ) या: आज फारशी झोंप ?

भुव०—( चंद्रभागाबाई आली पाहून ) या हो तुह्मी या. येथें बसा.

चंद्र०—होय सरकार, तुह्मी कशाला उठतां पलंगावरून? मी तुह्माजवळ बसतें. ( पलंगावर बसून )

कां आज अशा दिलगीर कां? चेहरा अगदीं सुकून फिकट दिसतो आहे? तुमच्या मनांत तरी काय आहे? असं मनांतले मनांत झुरझुरून अगदीं अस्थीचर्म मात्र राहिलें. असें केल्यानें परिणाम कांहीं ठीक दिसत नाहीं. कसें सुमित्रे? जी गोष्ट आपल्या स्वाधीनची नाहीं, त्याकारितां वाईट वाटून उपयोग काय? मर्जी देवाची. आतां आमच्या वरूनच अनुभव पहानात? आज मुंज झाली असती, पण तें होणार कोठून? "आलें देवाजीच्या मना आणि तेथें कोणाचें चालेना" (कष्टी होऊन) आपण वाहिलेंच नाहीं मग व्यावें कोठून? तुह्मी नाहीं ह्मणून हाका मारतां, आणि आह्मी होऊन नाहीं ह्मणून हाका मारतों; मिळून फळ एकच, असो, पण तुह्मी आतां असें दुखणें घेणार काय? आणि रोजच्या पेक्षां आज ज्ञास्ती वाईट वाटण्याचें कारण तरी काय?

**भुवन०**--नाहीं बाई, दुखणें कशाचें आणि तें तरी मला येतें आहे कोठें? शहरांत तरी चांगले मुलाबाळांचें धनी मरतात. पण देवा, मला करंटीला कां मरण येईना? (स्फुंदून स्फुंदून) जगदंबे, नको हा आतां जीव.

**चंद्र०**—हं हें काय असें भलतं भलतं बडबडतां! तुह्माला जिव नकोसा झाला पण आह्माला तुह्मासारखी धणीन कोठून आणावी? तुह्माला काय कमी आहे? पूर्व जन्मीं हारताळका चांगल्या पूजल्या होत्या,

ह्मणून अशा सार्वभौमराजाचे पदरीं पडलांत. पहा, पृथ्वीवर मला तर कोणी आपल्यासारखी भाग्यवान स्त्री दृष्टी पडत नाहीं. आपलें ऐश्वर्य पाहून इंद्रही लज्जित होईल. पहा संपूर्ण पृथ्वी ज्याचें अर्जव करते असा जो "भुवनपाल राजा" तो तुमच्या अगदीं मुठींत; मग काय कमी आहे! कांगे सुमित्रे, मी खरें ह्मणतें कीं खोटें?

सुमि०—हें काय ह्मनावें बाई, आहो, महाराजांचा आक्सी जीवपरान ह्यांच्यावर है, उलीसें डोकं दुखूं लागलं कीं बावरचं होत्यात. मी लटकं बोलत नाहीं. (वर बोट करून) सूर्य नारायन डोईवर है, असा जोडा काई संमद्या पिरथीमींत गंवसायाचा नाहीं.

वि०—(हळूच आंत येऊन) हो खरें तें, एक आमचा मात्र करकर वाजतो, मग कोणाचा जोडा नाहीं वाजत. (आपणाशींच) नीटच आहे तें—वाजवी, फुकटच उपटून आणायाचा मग कां न वाजेल?

चंद्र०—(रागावून) बायकांमध्यें तुझें काय काम आहे? चावटा? चल नीघ येथून, कोण आहे बाहेर, सुमित्रे? पहाऱ्यावर कोण आहे? याला येथपर्यंत कोणी येऊं दिला?

वि०—पळून जातो. (इतक्यांत भालदार ललकारातो.)

सुमि०—सरकार आलं वाटतं. (भालदार पुकारतो) या.

चंद्र०-( झटकन् उठून ) खरेंच, काय सुमित्रे, सरकार आले? तर मग मी जातें बाई, बाईसाहेब मी येतें हो.

भुव०-येतां कां? याहो, आतां कधीं भेटाल?

चंद्र०-( हात जोडून ) आपण लोभ करतां ह्मणून मी नेहमीं अगदीं जवळ आहें.

भुव०-बरें तर उद्यां भेटा हो; माझें कांहीं काम आहे.

चंद्र०-ठीक आहे. (असें ह्मणून जाते. इतक्यांत भालदार निगारखो मेहेरबान सलाम-अस्ते चलना महाराज, असा पुकारतो; आणि महाराजांची स्वारी महालांत येते.

सुमि०-(महाराज आले पाहून वंदन करते.) व लांब कोंपऱ्यांत उभी रहाते.

महा०-कांगे सुमित्रे? ही अशी कां आज निजली आहे? प्रकृती बरोबर नाहीं काय? ( रागावून) काय तुह्मी मूर्ख माणसं आहांत! प्रकृती इतकी बिघडली तरी मला कोणीं कळविलें नाहीं! ( पलंगावर बसून आपणाशींच ) आज अशी काय व्यवस्था झाली ही! मुख कोमेजून गेलें आहे. अलंकार विसकटून पडलेत; वस्त्र काय विगलीत झालें हें काय? (घाबरून) सुमित्रे, केव्हांपासून हिची तब्येत बिघडली, आणि कारण तरी काय?

सुमि०-( घाबरून थर थर कांपूं लागली, व भीत

भीत हात जोडून ) सरकार सेनापतीची अस्तुरी रमाबाई येऊन गेल्यापून हें सर्व झालं है. ह्मनजे मंगा आपून जें है तें हैं.

**महा०**–आग पण मघाशीं इतकी नादुरुस्त नव्हती, मीं तेव्हांच काय झालें ह्मणून विचारिलें, पण तेव्हां " उगीच जरा मस्तक चढलें आहे " ह्मणून सांगितलें. मग मी केशर वगैरे तुझ्या हातून मस्तकास चोळून गेलों कीं नाहीं ? कारण, दिवस जरा थंडीचे असल्यामुळें शैत्यानें प्रकृती कमीजास्त होत असते; म्हणून मी आपला त्या भरावर गेलों, नाहीं तर ( मुख कुरवाळून ) मी आपल्या प्राणप्रियेला असा सोडून गेलों असतों काय ? आतां खात्री झाली कीं, हें कांहीं डोकें दुखणें नव्हे; कांहीं तरी संतापानें प्रकृती बिघडली असावी. ( असें म्हणून भुवनसुंदरीचें मस्तक मांडीवर घेऊं लागतो. )

**भुवनसुंदरी** रागानें मोठ्या झपाट्यानें मांडीवरून डोकें खालीं घेते.

**महा०**–अग पण झालं काय ? तुझें डोकें दुखतें कां ? होतें तरी काय? एकदां सांग. (हनवटी धरून) तुला कोणी बोललें होय ? अशी रागवलीस कां ?

**भुवन०**–( तोऱ्यानें ) माझे अंगास हात लावूं नका. व्हा पलीकडे हें काय पण ? हा काय लोचटपणा ! मला आपलें कांहीं होईना, इकडे त्याची काळजी कशास ?

महा०—नाहीं पण असें काय करतेस? तुझी काळजी मी करणार, किंवा माझी तूं करणार, याखेरीज कोणी तिऱ्हाईत कां काळजी करील सांग बरें. तूं आपल्या मनांत विचार कर कीं, तुला असें कमीजास्ती वाटत असल्यावर, मला चैन पडेल काय ? सर्व काय तो पंचप्राण. ( चुंबन घेण्यास मुख पुढें करून ) इकडे कचेरींत गेलों तरी लक्ष्य इकडे; काय मोहनी केली आहे कोण जाणे.

भुवन०—पुरे, पुरे आतां. ( राजास थोडें पलिकडे ढकलून ) " वरून वरून मरून जाईन आणि काळीज बोका खाऊन जाईन. " हें कां मला समजत नाहीं काय ? सुमित्रे, आतां कशालाग इकडे येणं झालं. मी बोलावूं का पाठविलं होतं, माझं मेलं आतां काय ? मला विचारतो कोण ? आणि पुसतो कोण ? आतां काय ती मुक्त्यारीण ती केली आहेना, ती सांगेल तसं वागायचं. कुठ बसली होती तप करीत ! ( दुःखाचा सुस्कारा टाकून ) जें प्रारब्धीं होतं तें घडून आलं. आतां मेलें त्याचं वाईट वाटून तरी काय? कारण " लंगड तें लंगड, गांव कुशीं चरेना " जन असें ह्मणल. काय बाई ! पूर्वी वाहल नाहीं, मग कोठून मिळणार ? आतां मेलं आपलं कांहीं तरी खाऊन एकदां यांतून सुटावं म्हणजे झालं. देव तरी काय ? मेल गांवांतल चांगले चांगले लोक मुलाबाळांचे धनी तेवढे जातात, आणि माझंच मेलं नांव

कोणत्या सांदाडीला पडलं आहे कोण जाणे? देवा, नको नको हा जीव, आतां नको. (असें ह्मणून रडूं लागते.)

महा०—(तिला पोटाशीं धरून) अग पण हें काय? (आपल्या शेल्यानें तिचे डोळे पुसून मनाशींच) हें कांहीं समजत नाहीं. या बोलण्यांतला अर्थ काय? जीव कां नको? ती कां मुक्त्यारीण झाली? हें मोहगम बोलणें कोण समजेल? मी म्हणजे कधीं एक अक्षरानें सुद्धां दुखविलें नाहीं, उलटें ही सांगेल त्याच रीतीनें वागतों. असें असून जर ही मजला दूषण देईल, तर ईश्वरेच्छा. (मुख कुरवाळून) सखे, बोल, बोल आतां. पहा तुझ्या प्रीतीबाणानें मी अगदीं व्याकूळ झालों आहें. प्राणप्रिये, तुला कोणी शब्दानें दुखविलें काय? किंवा खाज़गी कारभाऱ्यानें कांहीं जिन्नस देण्यांत आळस केला काय? तूं सांग; म्हणजे कोणतेंही कार्य दुर्लभ असलें तरी हा भुवनपाल तुजकरतां वेळेस प्राणही खर्चीं घालील, परंतु कार्यसिद्धि करील. पहा चंद्रवदने, राजकीय व प्रापंचिक कामांत दिवसभर कितीही ताप झाला, तरी तुझा मुखचंद्र पाहिल्याबरोबर माझा ताप दूर होतो ही तुझी योग्यता. मी खचित सांगतों कीं, माझे संपूर्ण सुखाची तूं खाणच आहेस, हें वरकातीं बोलणें नव्हे, खरोखरीच तूं भाग्यशाली आहेस. असो, आतां एकदां सर्व राग सोडून मोकळ्या

मनानें मजजवळ बोल. तुझा दुर्घट हेतू असला तरी मी पुरविण्यास समर्थ आहें. ये, अशी जवळ ये. ( जवळ घेतो. )

**भुवन**०—मी नाहीं जा. मी कशास जवळ व्हावी? जवळ येणारी आतां आवडती पाहिली आहेना? ती येईल जवळ. माझं मेलं काय? "दर्यामें खसखस" ( राजा समजावितो तों तों अधिकच उमासा येऊन ) आतां काय त्याचं "पदरीं पडलं आणि पवित्र झालं" तशी गत.

**महा**०—तूं नाहींना सांगत? चल आतां मीच आ- पलें काळें करतों. ( असें ह्मणून म्यानांतून तरवार काढून आपल्या मानेवर ठेवितो. ) चल आतां संभाळ आपलें राज्य; हा मी चाललों पहा.

**भुवन**०—( तरवार मानेवर पाहून फार घाबरली ) हें काय? कोण राग हा! [ जलदीनें ] आग सुमित्रे, धांव, धांव लवकर. ( असें म्हणून मोठ्या झटक्यानें राजाचे हातची तरवार हिसकावून घेते. गळ्याला मिठी घालून ) अग बाई! परमेश्वरानेंच आज खैर केली. इतक्या निकरास जाईल हें मला काय बाई माहित? अतःपर ( आपले हातानें तोंडांत मारून घेऊन ) चुकलें बाई! काय तरी राग! मी आपलं नित्याप्रमाणें समजलें. पण सुमित्रे, शर्थ झाली. म्ह- णजे काय तें आखेर मजवर दूषण ठेवायचं. बरं असो. सर्व आपेशाची काय ती मीच.

**महा**०—चल् सोड आतां. कां माझी तरवार हिसकावून घेतलीस? तुला नाहींना सांगायचें काय झालें तें? मग उगीच मला कां आडथळा?

**भुवन**०—( मोठ्या प्रेमानें गिठी घालून ) हो हो, पुरे आतां अवसान, काय तो शूरपणा माझे भोंवतींच यायचा. पण एक आतां साखरेचा—

( इतक्यांत **विदूषक** हळूच आंत प्रवेश करून. )

**वि**०—काय बुवा गंमत? एकून यांचेपेक्षां मी बरा. परवां एकदां माझे बायकोवर मी जेव्हां रुसलों कीं नाहीं सुमित्रे, तेव्हां मग काय विचारतेस! ती तर पायां पडून पडून दमलीच; परंतु शेवट मीं तिला साष्टांग नमस्कार घातला; तरी माझा राग कांहीं जाईना. मग त्या रात्रीं खीर केली, आणि ( सरकार आपल्याला पाहतात असें पाहून मागल्या पायीं पळतो. )

**महा**०—पण नाहीं आतां आह्माला साखरेचा द्यावयाचा. मर्वांची तूंच का? पुरुषांनीं कितीही जरी जीव तोडला तरी बायकांना दया ह्मणून नाहीं.

**भुव**०—पण बाई हें काय? चुकलेंना आतां? पुनः असं नाहीं करणार.

**महा**०—बरें तर मग ये जवळ.

**भुव**०—मी नाहीं जा, गरज असेल तर! (अर्धेंच बोलून )

**महा**०—अजून मलाच का गरज? बरें मग. (असें ह्मणून तिला जवळ घेतो.)

भुव०-(किंचित हंसून राजाजवळ येते! इतक्यांत.)

वि०—झालं हो झालं, आतां राग लोभ गेला, काय अवमान तरी आणलें होतें? मीं आपला भाबडा मनुष्य! माझे आंगाचा जो थरकांप झाला तो कांहीं अजून गेला नाहीं सुमित्रे. जरा माझ्या छातीस हात लाव बरं, काय धड धड करती आहे, जशा तोफा सुटतात. एकून बायकांपुढें तरवारीचें सुद्धां पाणी झालं, मग मनुष्याची काय कथा! का सुमित्रे? खरं का खोटं?

सु०—अरे, सरकार ऐकत्यात पन तूं मंगापून बडबड करतो हायेस? पन एकदम वढं निघल मंग.

वि०—पण मी हातीं लागेन तेव्हां ना? मी काय कमी आहें कां? बारा पिंपळावरला मुंज्या.

भुवन०—( मोठ्या रागानें ) काय आहेग सुमित्रे? काय गडबड आहे? चल, तूं बाहेर जाऊन दरवाजा लावून घे.

सुमि०—होय बाईसाब. ( विदूषकास )चल हो बाहेर. नाइ तर बाइसायबासनी सांगतें.(विदूषक पळून जातो आणि सुमित्रा दार लावून घेऊन बाहेर जाते.)

महा०—कां? आतां कोणी नाहीं येथें. मघां इतकी प्रकृती का नादुरस्त झाली होती?

भुवन०—असो मेलं, झालं गेलं आतां त्याचें काय आहे ?

महा०—नाहीं पण, मला अगदीं चटका लागून गेला आहे.

**भुवन०**—सांगूंच कां आतां? मी आपलं ऐकलं तें सांगतें हो, खरं खोटं तें मला माहीत नाहीं.

**महा०**—बरं, तूं ऐकलं असशील तेंच सांग.

**भुवन०**—आज सकाळीं मीं आपलं रोजच्याप्रमाणें तुळशीला पाणी घातलं आणि तिच्या पुढें स्वस्तिक काढीत होतें इतक्यांत रखमाबाई ह्मणजे सेनापतीची बायको—

**महा०**—हं समजलों, पुढें बोल.

**भुवन०**—ती आली, मीं तिला विचारलं कीं, रखबाई, आज सकाळींच कुणीकडे आलांत? ती म्हणाली, उगीच फार दिवस भेटीला झाले म्हणून आलें. मग माझं स्वस्तिक काढणं झालं, आणि आम्ही दोघीही देवघरच्या समोर चोपाळा आहे कीं नाहीं तिथं बसलों. मग बाई जरा इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या, आणि पटदिशीं तिनं मला विचारलं.—"काहो राणीसाहेब, मीं एक आज गोष्ट आयकिली आहे ती खरी काहो? आणि ती जर खरी असेल तर आमचं प्रालंब्धच समजलं म्हणायचं" असं तिचं बोलणं ऐकून मीं बाई मग तिला सांगण्याविषयीं आग्रहच केला. मग तिनें मीं कोणाजवळ बोलूं नये म्हणून मजजवळून शपथ घेऊन मला म्हणाली : "राणीसाहेब, आज असं ऐकलं आहे कीं, आपलें सरकार द्वितीय संबंध करणार. ही बातमी गांवांत मोठी दाट पसरली आहे. मग खरं खोटं परमेश्वर जाणे." सरकार, असं रख-

मात्राईच्या तोंडचं ऐकल्यापासून मला चैन पडेना. म्हटलं असतां माझं कांहीं त्यांत कमी होतं असं नाहीं. पण बाई जीव कोठें राहतो ? तेव्हांपासून अंगाची आग होऊन गेली आहे, सरकार तुम्हाला माझी शपत आहे, खरं काहो हें ?

**महा०**—हा वेडे! हेंच का तें कारण? एकून तुम्ही बायका हलक्या मनाच्या खऱ्या. कोणत्याही कामाची पुरी चौकशी केल्यावांचून, असा अनर्थ करणें हें बरोबर नाहीं, असो. आतां खचीतच सांगतों कीं, ह्यापैकीं कांहीं खरें नाहीं. परवां **सोमदत्त**राजाच्या लेकीची कोणी तसबीर आणली होती, आणि प्रधान वगैरे मंडळींनीं मला त्या गोष्टीविषयीं पुष्कळच आग्रह केला, परंतु मी साफ नाहीं म्हटलें. कारण, संततीकरतांच एवढी आटाआट करायाची. मग आपल्या प्रारब्धीं असेल तर आणि शंकराचे मनांत देणें असेल, तर तुलाच नाहीं कां मुलगा होणार? काय तुझे दिवस कां गेले? त्यांचे मनांत आल्यावर पाहिजे तें होईल. पण खरेंच सांग. ( जवळ घेऊन ) प्रथम तुला कोणती हौस? मुलगा किंवा मुलगी ?

**भुव०**—( लाजून व खालीं मान घालून ) मला नाहीं तें माहीत. हें काय भलतंच विचारणं.

**महा०**—पण आतां मघांचा एकदां साखरेचा—

**भुव०**—नको होता, मग कशाला आतां ? ( अर्धंच बोलून. )

महा०—अग, तेव्हांचें तेव्हां गेलें. आतां काय त्याचें ?

भुव०—हो, बरी आठवण झाली, मी फार दिवस विचारीन विचारीन म्हणत होतें कीं, मला एकदां विलास बागेंत जाणें आहे, तिथली सुमंगलादेवी फार लोकांना नवसाला पावते म्हणूग ऐकिलें, म्हणून एकदां मनांत आलें आहे, पण इकडची आज्ञा होईल तेव्हां.

महा०—काय पण आज्ञा, जसें तसेंच वागणें होत असतें.

भुव०—याकरतांच कोणती गोष्ट मी विचारीत नाहीं. मनांत नसलं, म्हणजे मग कांहीं तरी पुढं वांकडं यायचं; चला, नाहीं तर नाहीं; इथं कोण जाण्यास खोळंबलं ?

महा०—झालें, पुनः वेताळ आला का पूर्व स्थळावर ? मीं तुला नको जाऊं का म्हटलं ? तूं तरी अगदीं जबाब काढूं देईनास. उद्यां कर तयारी. मीही सर्वांस हुकूम देतों. म्हणजे तेथें गेल्यावर जरा हवाही बदलेल, आणि मनाची थोडी उदासीनताही कमी होईल. तें सर्वच ठीक होईल. चल आतां जाऊं मी ?

भुव०—जा कोणी म्हणावं आणि बसा कोणी म्हणावं ? मर्जीस येईल तसं व्हायचं, बोलावं कोणी ? आतां रात्र थोडी कां झाली ? पण रात्रींसुद्धां काम

असतं मेलं हें काय ? रात्रंदिवस कोणाची मजुरी कां पतकरली ?

महा०—बरें तर, नाहीं जात; तुझ्या मर्जीप्रमाणेंच कां होईना, नाहीं तर आणखी रुसवा झाला तर समजावणें होणें कठीण.

भुव०—काय तरी माझी मर्जी ! आणि आपले मनांत नाहीं वाटतं ? पण उगीच मन पाह्यचं. ( असें ह्मणून भुवनपाल व भुवनसुंदरी निद्रिस्थ होतात. )

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३.

### स्थळः—भुवनपाल राजाची कचेरी.

### पात्रें.

भुवनपाल............राजा.
सुविचार............राजाचा प्रधान.
शौर्यसागर...........सेनापती.
त्रिविक्रमशास्त्री ......न्याय करणारे.
सिताराम जोशी.....मुहूर्त वगैरे जोतिष पहाणारे.
भालदार.............सोन्याची काठी धरणारा.

### कचेरीची जागा.

महाराज—( सिंहासनीं बसून ) कोण आहे तेथें भालदार ?

भाल०—जी सरकार. चरनपर शिर धरतां हूं.

महा०—अबे तेरा कल्याण. सुनो मालदार, सुविचार प्रधानजीकूं जलदी ह्यां बुलाव.

मा०—आछा खावंद. (असें ह्मणून पडद्यांत जातो व पुनः बाहेर येऊन "निगारखो, मेहेरबान, सलाम" प्रधानजीके निगापर, नजर रखो महाराज. " इतक्यांत प्रधानजी येऊन, वंदन करतों महाराज. "

महा०—कल्याण असो प्रधानजी. प्रधानजी, आज कोणत्या गडबडींत आहांत ? मी आज फार वेळ वाट पाहतों आहें.

प्र०—[ हात जोडून ] सरकार आज थोडा घांदलींत होतों तें आपण सांगितल्याप्रमाणें [ थोडा घोटाळून ] विलास बागेंतील, मधल्या जळ मंदिरांत चहूंकडे, सोनेरी वेल व फुलें काढविण्यांत गुंतलों होतों महाराज. एकून आतां "सोनाजी"सारखा चितारी ह्मणून पुनः होणें नाहीं. काय सांगावें सरकार ? आज त्यानें काम केलें आहे तें अगदीं बीनमोल आहे; ह्मणजे माझा आज सगळा दिवस तेथें मोडला, परंतु त्याबद्दल आज वाईट वाटलें नाहीं; कारण, सरकारचे कामास वर्षानवर्ष जरी रात्रंदिवस बसावें लागलें, तरी हरकत नाहीं, परंतु कोणतेंही काम अप्रतीम व्हावें.ही इच्छा. आह्मी कितीही श्रमलों, तरी [राजाचे पायाकडे बोट करून] या पायांचें दर्शन झालें ह्मणजे अगदीं आनंद होऊन जातो; गादीची पुण्याईच तशी.

महा०—प्रधानजी, सर्व फुलें काढलीं कां आज ?

प्र०—कांहीं काढलीं महाराज, बहुतेक निवालीं ह्मणायचीं. ( इतक्यात विदूषक येतो.)

वि०—[हात जोडून] सरकार, प्रधानजी आज आठ दिवसांत तरी विलासबागेंत गेले होते कां, ह्मणून विचार बरं ?

महा०—(विदूषक चाहडी करतो पाहून) अरे पण ( बोटानें खूण करून ) बोलूं नको, गप्प.

वि०—मग तीं सिताफळें घरीं एकट्यानींच स्वाहा केलीं ? मी उगीच बायकोला डोहळे झाले' ह्मणून मागितलीं, पण माझें ऐकतो कोण ? आणि पहातो कोण ? तेव्हां मग आतां ही युक्ती काढली कीं आपण जरा राजापुढें बढाई झोंकीत असलां, ह्मणजे ती वेळ साजरी करावी.

प्र०—[हळूच] अरे, बोलूं नको वेड्या; तूं आणि मीं का दोन आहोंत ? घरीं येऊन तुला हवीं तितकीं सिताफळें घेऊन जा. तूं कधीं आलास, आणि आह्मी कधीं नाहीं ह्मटलें ? अरे सिताफळेंच काय ? जें कांहीं माझें आहे, तें सर्व तुझेंच आहे.

वि०—हं, आतां ठीक, पण मी आपणास पक्कें ओळखून आहें, हें बोलणें इथेंच काय तें; कचेरीची पायरी उतरल्यावर मग ओळख नाहीं. असो, पण या वेळेस जातों आतां.

महा०—काहो प्रधानजी ?

प्र०—[धांवत जवळ येऊन] जी सरकार.

महा०—तें दुसरें काम कोठपर्यंत आलें? ह्मणजे विलासबागेंतील देवीच्या देवळांत सहस्रधारी कारंजाचें काम चालू केलें होतें तें?

प्र०—होय, तें अगदीं आटपत आलें, परंतु थोडी कसर आहे.[ हात जोडून ] म्हणजे हुकूम झाला होता कीं, कारंजाचे वरल्या अंगीं मोठें झाड लावण्याचा जो हलका मोर तोंडांत धरून आहे, त्याचे पिसापर्यंत कारंजाचें पाणी उडावें, तें तितकें उंच अझून उडत नाहीं, एवढीच काय ती कसर. ( इतक्यांत त्रिविक्रमशास्त्री आले पाहून भालदार पुकारतो. )

महा०—प्रधानजी, भालदार कां पुकारला?

प्र०—त्रिविक्रम शास्त्री आले आहेत सरकार.

महा०—तर मग उत्तमच झालें. येऊं द्या आंत. [ त्रिविक्रमशास्त्री येतात. ]

महा० व प्र०—[ उत्थापन देऊन ] यावें, यावें शास्त्रीबावा.

महा०—वंदन करतों महाराज.

शा०—राजा सामराज्यमस्तु. भुवनपाला, कचेरींत आल्याबरोबर, तुझा हा आदरसत्कार पाहून फार संतोष झाला. [ असें म्हणून खालीं बसतात इतक्यांत सितारामजोशी येतात. ]

शा०—यावें, जोशीबोवा यावें. [जोशी आल्याबरोबर] नमोनमः नमोनमः यावें, येथें बसावें जोशीबोवा.

जोशी—नाहीं, आपण बसावें.

त्रिविक्रम–नाहीं, आपण बसावें. (दोघेही बसतात इतक्यांत विदूषक कांहीं नवीन सोंग घेऊन येतो.)

वि०–(कचेरींत येऊन) नमोनमः शास्त्रीबोवा आलेकम सलाम.

त्रिवि०–अहो जोशीबोवा, हा कोण?

जो०–माझा नव्हे बा कोणी ! मी ह्मटलें आपला विद्यार्थी आहे.

त्रिवि०–अरे तूं कोण ? आणि येथें येण्याचें काय प्रयोजन ? तुला येथील पाचारण कां आहे ?

वि०–अहो, तुह्मी तरी शास्त्रीबोवा मोठे भोळे दिसतां ! इतक्यांत विसरलां, अहो मीं हुसेनभट बिन सोनापाचार्य नव्हे कां ? परवां अबदुल्ल अल्लीच्या येथें त्याचे मुलाची मुंज होती, तेव्हां तुह्मीं आह्मीं मिळून याज्ञिक नाहीं कां गुंडाळलं ! आणि हे जोशीबोवा मुहूर्त धरण्यास तेथें नव्हते कां ? होते. एकून इतक्यांतच ओळख विसरतांनां? एबात अच्छी नहीं.

त्रिवि०–अरे, कोण आहेरे येथें ? पाहऱ्यावर कोणी नाहीं काय ? (इतक्यांत भालदार येऊन त्या सोंगास घालवून देतो.)

महा०–कां जोशीबोवा स्वस्ति क्षेम ना ? तुमचे आणि शास्त्रीबावांच्या येण्यानें आज फारच सभेला शोभा आली.

शा०–खरें महाराज. सर्व या गादीचा अधिकार. पहा भुवनपाला, तुह्मी तोंडावरच स्तुति करावी असें

नाहीं. तूं या सिंव्हासनीं विराजमान झाल्यापासून सुख सर्वांस झालें. अरे दोषदुष्काळ देशांतून पळाले. परचक्राची भीति स्वप्नांतसुद्धां राहिली नाहीं. सर्व प्रजा आनंदांत निमग्न आहे. प्रजा व पदरचे सर्व कामगार वेळच्या वेळेस आपलीं कामें बजावीत आहेत. भुवनपाळ असें नांव खरोखरीच तुला साजतें. कां जोशीबोवा सत्य कीं मिथ्या ?

**जोशी॰**—हें काय विचारावें ? असा राजा पुनः व्हावयाचा नाहीं,आणि मागेंही झाला नाहीं,असा सर्व प्रजेच्या तोंडांतून नेहेमीं उद्गार ऐकूं येतो. शाबास राजा शाबास! कारण, राज्यांतीं नरक ह्मणून जें न्यायशास्त्र नेहमीं ह्मणत असतें, ते अगदीं असत्य. तो न्याय कोणाला लागू ? तुजसारख्या नीतीनें वागणाराला कां ? नाहीं, तेव्हां तूं धन्य आहेस. कां शास्त्रीबोवा असेंच ना ?

**शा॰**—सत्य आहे. अहो धन्य ह्मणजे काय ! केवळ याला इंद्राची जरी उपमा दिली तरी साजेल.

**जोशी॰**—इंद्राची उपमा याला देणें अगदीं बरोबर नाहीं, कारण त्या इंद्राचे हातून आजपर्यंत सहस्त्रावधि अन्यायाच्या गोष्टी घडल्या असतील ! आणि भगांकित सर्व तनु झाली, हें तर प्रसिद्धच आहे. आणि भुवनपाल अजून शुद्ध धुतल्या मोत्यासारखा निर्मळ आहे, तेव्हां भुवनपालाची योग्यता विशेष.

**शा॰**—अहो पण तें नव्हे, त्यांतलें कारण असें.

( आपलें बोलणें जोशीबावानें मोडून काढलें पाहून जरा रागानें ) हें काय ? इंद्र तो इंद्र आणि भुवनपाल तो भुवनपाल. इंद्रानें शंभर अश्वमेध यज्ञ केले, आणि भुवनपालानें एक तरी केला काय ? हें काय भलतेंच बोलणें ? मला असें तोंड देखलें बोलणें बोलतां येत नाहीं.

जो०–अहो पण पुण्य कर्मेंही केलीं, आणि पापकर्में तशींच केलीं. ह्मणजे त्यांत झालें काय ? एवंच फळ एकच. आह्मांला तोंड देखलें बोलणें बोलून काय करावयाचें आहे ? तुह्मीही गादीचे आश्रित, आणि आह्मीही गादीचे आश्रित त्यांत हो काय ? तुह्मांला आमचें बोलणें रुचत नसलें, तर आह्मी आपले उठून जातों. ( असें ह्मणून रागानें उठून जाऊं लागतो. )

शा०–तुह्मी कशाला ? मीच बापडा जातों उठून, तुह्मी मिष्टभाषणी आहांत तेव्हां राजप्रिय आहांत, आह्मी आपले स्पष्टवक्ते आहोंत तेव्हां आमचें बोलणें सर्वांस कडू लागायचें. ( दोघेही उठून हात पुढें करून एकमेकांशीं. )

शा० आणि जो०–नाहीं पण तसें नव्हे, तु काय बोललां, नाहीं पण ( हात पुढें करून )

जो०–तसें, काय ? ही कां रीत पण—

शा०–नाहीं, मी कधीं असें बोललों ? मीच असें नाहीं, न्यायशास्त्र पहा.

जो०—पण असें नव्हे, धर्मशास्त्र आजच बुडालें कां?

शा०—अहो पण ! तो तुमचा विषय नव्हे. ( इतक्यांत विदूषक येतो. )

वि०—हां, हां, आतां ठीक झालें. (मनांत आपणही जरा मदत करावी. ) हं हं अहो शास्त्रीबोवा, अहो जोशीबावा, हें काय? ही कां मारामारी करतां काय? तुह्मी तर अगदीं ताळच सोडला. शास्त्रीबोवांचें म्हणणे रास्त आहे. नाहीं पण मला जोशीबोवांचें सत्य वाटतें. तें कांहीं असो, तुम्ही दोघे आतां ष्टांप कागदावर अर्ज्या करा, आणि त्याचें वकीलपत्र मला द्या, म्हणजे वाद मिटेल, नाहीं तर येथें खून पडतील.(इतक्यांत भालदार येऊन विदूपकास कचेरींतून हांकून देतो.)

महा०—( हात जोडून)अहो त्रिविक्रमशास्त्री, अहो सिताराम जोशी, हें काय? बोलतां बोलतां दोघेही तेरीमेरीवर आलां हें काय? मज गरिबास इंद्राची उपमा कशास आणि चंद्राची तरी कशास? मी आपला तुह्मा ब्राह्मणाचे पायाचा दास आहें. आणि इंद्र चंद्र तरी काय? तुह्मां ब्राह्मणाचे कृपेनेंच थोरपणा पावले आहेत. महाराज, उभयतां शांत व्हा. हें काय? अहो आपण ज्यावर कृपा कराल त्याला इंद्राहीपेक्षा थोर कराल, असें असतां आपसांतच आपला थोरपणा विसरून कलह करतां यास काय ह्मणावें ? ( असें ह्मणून भुवनपाल दोघांचीही समजूत करतो. नंतर दोघेही राजाचे मध्यस्थीनें शांत होतात. )

शा०–(थंडपणानें) नाहीं पण जोशीबावा? माझ्या मुखावाटें कांहीं गैर गेलें कां?

जो०–तर मग मी गैर बोललों कां? दोघेही नाहीं. तुह्मी आह्मी कां परके कां आहोंत? आमच्या महादेवाची जी सून ती तुमची नात नव्हे कां?

शा०–अहो! हो! पाहिलें असतां तुह्मी आह्मी अगदीं जवळ आहों. तेंच नातें कशाला! तुमची विहीण आमची आत नव्हे कां?

जो०–हो, हें कां एक नातें? हें बरें पण अगदीं जवळ आलें. ( इतक्यांत हळूच विदूषक येतो. )

वि०–अहो शास्त्रीबोवा, सितारामजोशी इतके लांबचे तरी नातलग. पण मी पहाना किती जवळचा आहें तो.

त्रि०–तुझें आमचेंरे काय नातें?

वि०–हं, बरें विचारलें, जवळचें ह्मणजे किती सांगूं! अगोदर आमचे घरीं जाण्यास तुमचे घरावरून रस्ता आहे, हें तर खरें, आणि त्यांत तुमचें आमचें परस एक आहे, ह्मणजे मध्यें भिंत नाहीं,शिवाय दररोज ह्मैस वांटाण्याच्या शेंगा खाते, तेव्हां मग नातें जवळ नव्हे कां? पोत्यांत शिरलें कीं नातें शेजारींच.

त्रि०–वाहवारे वाहवा! बृहस्पतीच आहेस.

वि०–आह्मी त्याचेही गुरू. ( असें ह्मणून नाहींसा होतो. )

शा०–(जरा स्थिर झाल्यावर) राजा भुवनपाळा, ब-

राच वेळ या गोष्टींत गेला. असो, मी कचेरींत आल्यापासून विचारीन विचारीन ह्मणतों आहें, परंतु या रिकाम्या गोंधळांत हें सर्व विसरलों होतों. परंतु स्मरण झालें.—राजा, तुझा मुखचंद्र दिवसेंदिवस अगदीं निस्तेज होत चालला हें काय ? मलाच दिसतो असें नाहीं, जोशीबावा तुह्माला कसें दिसतें ?

जो०—सत्य आहे. शास्त्रीबोवा आपण बोललां हें माझ्याही मनांत घोंटाळत होतें. बरें केलें विचारलें.

महा०—शास्त्रीबोवा, मुखचंद्र निस्तेज कशाकरतां होणार आहे ? मला कांहीं कमी आहे कीं काय ? तुह्मा थोरांच्या आशिर्वादानें मी निष्कंटक पृथ्वीचें राज्य करतों आहें, तेव्हां काय कमी ?

त्रि०—तूं कितीही संपादणी कर, परंतु मोठी जबर कामनिक व्यथा तुला लागली आहे, यांत संशय नाहीं. ( इतक्यांत )

सुवि०—( हात जोडून ) महाराज, शास्त्रीबोवा, जोशीबोवा, आपले उभयतांचे आज सरकारास हे प्रश्न पाहून मला फार संतोष झाला, आणि आज हा दिवस सोन्याचा उगवला यांत संशय नाहीं. ही गोष्ट माझेही मनांत फार दिवस सरकारास विचारणें होती, पण विचारून त्याचा माझे हातून यांहीं खुलासा झाला नसता, तेव्हां आज हा विषय निघाला हें फार उत्तम झालें. आतां सरकाराचा मुखचंद्र निस्तेज कां हें मी सांगतों. पहा, पूर्व पुण्याईनें, आज आमचे सर-

कार केवळ मृत्युलोकींचे इंद्रच आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तशीच स्वर्गांत जीं जीं सुखें इंद्रास अनुकूळ आहेत, तीं तीं मृत्युलोकीं भुवनपाल महाराजांस आहेत, परंतु न्यून ह्मणून इतकेंच कीं, जें संपूर्ण प्रपंचांतील मूळ सुख, किंवा सकळ आनंदास कारण आणि प्रापंचिकाचें विश्रांतीचें अगर, असें जें पुत्रसुख त्याचा, आमचे महाराजांस लोप झाला आहे. तेव्हां वरकड सुखें कशीं रुचतील ? या योगानें दिवसेंदिवस महाराज शुष्क होत चालले, सर्व कामांत उदासीनता प्राप्त झाली आहे. इकडे यांची अशी अवस्था, मग तिकडे आईसाहेबांकडे तर विचारणेंच नको, रात्रंदिवस डोळ्याचें पाणी टळत नाहीं. एकेक घांसानें जेवण कमी होत चाललें. ठीकच आहे; हो, गोड लागेल कोठून ?

शा०—हो, सत्य आहे प्रधानजी. अहो "गृहरत्नानि बालकाः" सर्व सुखाची अखेर काय ती तीच, आणि मग तें जर नाहीं तर व्यर्थ जिणें ह्मणायाचें; कां जोशीबोवा ?

जो०—सत्य आहे. (मान हालवून) अहो शास्त्रांत निपुत्रिकाचें मुख पाहूं नये असें सांगितलें, तेव्हां थोडा कां दोष हा !

प्र०—अहो, आतां तें असो, परंतु सांगण्याचें कारण इतकेंच कीं, भुवनपालमहाराज आणि आईसाहेब दोघेंही झुरणीस लागलीं यांत संशय नाहीं. तेव्हां आ-

तां यास उपाय काय ? तुह्मी सूर्यासारखे ब्राह्मण महाराजांचे हितकर्ते असून या कामास जर उपाय योजानात, तर मग काय उपयोग !

शा०—ठिक ठिक प्रधानजी, फार चांगला विचार काढला. आतां मला जो विचार योग्य दिसतो आहे तो मी समक्ष बोलतों, मग यावर जोशीबावा सांतील तसें.

जो०—अहो मी काय, आणि तुह्मी काय ? कोणीकडून कार्य झालें म्हणजे झालें. पण—( हळूच ) या कार्यांत ब्राह्मणांचें यथास्थित पिकेल असें करा ह्मणजे झालें. तुम्हाला सांगितलें पाहिजे असें नाहीं; पण आपली उगीच सूचना केली.

शा०—हो, तें ठिकच आहे. अहो कोणतेंही काम केलें तरी त्यांत सर्वांचें कार्य साधावें, त्यांत विशेषकरून आपलें उभयतांचें. हं द्या टाळी.

प्र०—शास्त्रीबोवा, कां विचार सांगतां सांगतां मध्येंच थांबलांत ?

शा०—प्रधानजी, आपले विलासबागेंतील सुमंगल देवीचें फार जागृत स्थान आहे; तेव्हां त्या ठिकाणीं पुत्रकामेष्टी यज्ञ करावा, म्हणजे जगदंबा कृपा करील यांत संशय नाहीं. कां जोशीबोवा, विचार ठीक आहेना ?

जो०—वा ! विचार काय यथायोग्य. पुत्रकामेष्टी यज्ञानें राजा दशरथासुद्धां फलप्राप्ति झाली. वः !

एकून शास्त्रीबोवासारखीं (प्रधानाकडेच तोंड करून) आतां पोक्त विचाराचीं माणसें क्वचित्.

महा०–ठीक आहे, शास्त्रीबोवा, विचार काढला तसा जोशीबोवांकडून मुहूर्त वगैरे काढून लागलीच वेताचा निश्चय करून उठा म्हणजे झालें.

प्र०–हो, महाराज ह्मणतात हें बरोबर आहे, कारण, पुनः असा योग येणें दुर्लभ. कोणत्याही कामाची त्वरा केली म्हणजे वरें.

शा०–हो, तेंही ठीकच. "शुभस्य शीघ्रं" याप्रमाणेंच व्हावें, मग जोशीबोवा, आतां विलंब कां? (इतक्यांत सेनापतीची स्वारी आली पाहून भालदार पुकारतो.) निगारखो मेहरबान सलाम सैनापतीकी सवारी आइ है महाराज. (सैनापती आंत येऊन) वंदन करतों सरकार.

महा०–कल्याण असो, शौर्यसागरा बसावें. (सैनापति बसतात.)

शा०–वः! सैनापती वेळेवर आले, मुहूर्त काढण्यास पांचांचा समाज असावा तें यथाशास्त्र झालें.

सु० व प्र०–हं जोशीबोवा, आतां विलंब नका करूं. दहा घटका आतां वाजतील.

जो०–हें पंचांग काढलें, मला काय उशीर आहे! (पंचांग पहातात इतक्यांत विदूषक हलकेच जवळ येऊन.)

वि०–जोशीबोवा, तें पंचांग मग पहा, परंतु आ-

मचें नांव यादींत घालाल कीं नाहीं? तुह्मी तरी आतां सरकारास दहा पांच लक्षांचा खर्च आणलात! एकून नैमित्तक काढण्याविषयीं तुमचा कित्ताच ध्यावा. गांवांत आणखी जोशी आहेत पण त्यांची येथें डाळ कोठें शिजते? ती लटपटपंची तुह्मालाच बरी साधली आहे! पण काहो? तुह्मी अनायासें पंचांग काढलें आहे ह्मणून विचारतों. ह्मणजे परवां कपिलाषष्ठींत जेव्हां सूर्यग्रहण झालें, आणि त्या दिवशीं पोर्णिमा होती, तेव्हां महोदय त्या दिवशीं कसें आलें? ह्मणजे जोतिषग्रहण ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, (मांडी घालून मोठ्या डौलानें) नैनं सूर्य कथं अर्थ इति वाग्वाणीं किं? अथएव अर्घ्यदानं नकुर्यात्. याची टीका सांगतों. ह्मणजे अमावास्येस सूर्य जर डोक्यावर आला, तर अर्घ्यदानं कुर्यात् किं न कुर्यात्? अथएव दिवाकरभट्ट वाणीं प्रमाणं. (इतक्यांत जोशीबोवा रागावले असें पाहून पळून जातो.)

जो०—राजा, उद्यां गुरुवार अमृतसिद्धियोग आहे. तेव्हां उद्यां सर्व सरंजामासुद्धां विलासबागेंत जाण्याची तयारी करावी. ह्मणजे परवां दशमी आहे, सुदिन आहे, परवांच यज्ञास प्रारंभ करावा. कां शास्त्रीबोवा ठीक आहेना?

शा०—वा! ठीक ह्मणजे काय? तुह्मांसारखीं विद्वान माणसें आतां बहुधा क्वचितच. कां भुवनपाळा! उद्यांची तयारी ना?

महा०-उत्तम आहे. मी आपल्याबाहेर नाहीं. प्रधानजी, उद्यां सर्व सरंजामाची तयारी करून गांवांतील सर्व बडे लोकांस बोलावणें करा. विलासबागेंत कोणी हुशार मनुष्य पुढें पाठवून सर्व तयारी ठेवा, झालें. ब्राह्मण सांगणें वगैरे त्यांचें काम, व सरंजामाची खटपट आपल्याकडेस नाहीं. ते शास्त्रीबोवा आहेत, आणि जोशीबोवा आहेत. पाहिजे तें करोत. चला तर मग आतां, करा तयारी सर्वजण. सैनापती तुह्मी सडे स्वारीची मात्र तयारी करा, फार लोक घेण्याच्या यातायातींत पडूं नका.

सैना०-होय सरकार. तेवढी निशाणी पलटण, आणि दोन हजार खाजगी घोडेस्वार एवढे मात्र घेतों.

महा०-ठीक आहे. तेवढा हिरारतन हत्ती अंबारीसहित घ्या. आणि दुसरे पन्नास घ्या ह्मणजे झालें. तसेंच हिरालाल खाजगी घोडा आणि शिवाय दोनशें कोतवाली घोडे घ्या ह्मणजे झालें. चला जा तर मग, करा तयारी.

सैना०-आज्ञा सरकार. (इतक्यांत)

प्रधानजी-( मोठ्या लगबगीनें ) अहो; कोण आहे येथें ? गणेशपंत ?

गणे०-जी महाराज, काय हुकूम आहे ?

सु०-शास्त्रीबोवांस व जोशीबोवांस विडे, हार, गजरे वगैरे कांहीं! किती सुस्तपणा हा! (रागावून) रोज काय सांगावें ! दरबारांत वागतां किंवा ( अर्धेच बो-

लून ) नंतर गणेशपंत विडे, हार, तुरे, अत्तर, गुलाब सर्वांस देतात.

शा०—येतों आह्मी आतां. हुकूम ?

महा०—हं, ठीक आहे. मीही उठलोंच, ( असें ह्मणून भुवनपाल राजा उठतो. नंतर सर्व कचेरी उठते.)

भा०—निगारखो मेहेरबान, कचेरी बरखास्त.

( पडदा पडतो. )

इतक्यांत घड्याळवाला मोठ्यानें पुकारतो " दस घडी बजगइ महाराज, ग्यारांका अंमल सरकार."

---

## प्रवेश ४.

### स्थळः—विलासबागेच्या वाड्यांतील भुवनसुंदरीचा महाल.

### पात्रें.

भुवनपाल..................राजा.
भुवनसुंदरी................त्याची स्त्री.
सुमित्रा....................तिची सखी.
सुविचार ..................प्रधानजी.
शौर्यसागर ................सेनापती.
त्रिविक्रम शास्त्री.........न्यायाधीश.
सिताराम जोशी.........राजाश्रित जोशी.
इतर भिक्षुक ब्राह्मण.....यज्ञास आणलेले.

**गांवांतील बडेलोक**......समारंभास आलेले.
**विदूषक**..................मनरंजन करणारा.

भु०—कांगे, सुमित्रे ? स्वारी नाहीं कां अजून बागेंत आली ?

सु०—हो, केव्हांच आलिया. आपल्याची आतुगर. काय बाइसाव आज हा थाट ! शहरापून ते ह्याबागेपं पाया पईस नाहीं. एकसारखं तीन कोस घोड्यापं घोडं आन् हत्तीपं हत्ती, पालख्यापं पालख्या अन मॉन्यापं मॉनं, एकावर एक मानसबी पडत होतीन काय? गांवांत बामनांची तरी कोण धांदल उडलिया, शा संमद्या लोकांची अशीच धांदल झालिया. दुधाच्या तरी कावडीच्या कावडी भरून बागेंत येतात. लयच गा गडबड. आजचा खर्च तरी लय दांडगा व्हईलना काय ? लाखो रुपयांचा चुना व्हइल पन त्याचा विधी निषेध काय ? सगळं ह्या जिवाकरतां. (भुवनसुंदरीकडे हात करून ) ह्या जिवाकरतां सरकार! आसमानांतला चंद्रमाबी धरतरीपं आणतील.

भु०—पुरे बाई. ह्या जिवाकरतां, ह्या जिवाकरतां! काय मलाच कां एव्हढं अगत्य ? त्यांच्या मनांतून नाहीं कां हौस ? "कावळा बसायास आणि डाहळी मोडायास" एक गांठ पडली. मी विलासबागेंत चला ह्मणायास आणि यज्ञाचा बेत ठरण्यास एक गांठ झाली; ह्मणून बाई निमित्य झालें. नाहीं तर एरवीं कितपत माझ्या कह्यांत स्वारी आहे तें दिसतच आहे.

सु०—कह्यांत नवं हो, तें माझं म्हणणं नव्हे पन उगीच आपली थट्टा केली. आपल्याला गोड लागत नसलं तर पुन: असं बोलणार नाहीं हो ! नाहीं तर थट्टेची गोष्ट. (अर्धेच बोलून)

भु०—सुमित्रे, मीं कांहीं रागानें नाहीं बोल्लें. सहज रीतीची गोष्ट सांगितली, त्यांत तुला इतकें आणखरं कां वाटलें ?

सु०—नाहीं बाईसाब, आनखर कशाचं, मी तरी खरं होतं तेंच बगा बोललें. आपल्या जिवाकरतां कालपून लय सरकार सिनले बगा! आज तरी काय? कोन कुठें उतरलय, होमसालंत तयारी झाली कीं नाहीं?बामन बिमन आलं कीं नाहीं, संमद्यासनी सामान पोंचलं कीं नाहीं, सकाळ धरून हिच गडबड बगा. लय धांदल उडलिया. (इतक्यांत, भालदार ललकारतो ऐकून) सवारी आलि हो बाईसाब, सवारी आली, ती बगा इकडच येत्या ती. ( स्वारी महालांत येते. )

भु०—( स्वारी आली पाहून लाजून चटकन उठून नमस्कार करते, त्यामागून सुमित्राही वंदन करते. )

महा०—कल्याण. ( नंतर सुमित्रा एके बाजूस जाते. )

भु०—कां? आज फार घामनूंत आला आहे ? सर्व स्वत: का बघितलें पाहिजे ? आणि ते मेले झाळकु-

जी त्रिळकुजी भाराभर आहेत ते कुठे गेले ? खाय-ला तेव्हढ पुढपुढं येतात आणि कामाच्या वेळीं त्यां-चा अस्त होतो.

महा०—अग अस्त कशाचा ? ते सर्व आहेत पण आपण स्वतः असल्यावांचून कोणतेंही काम व्यवस्थे-शीर होत नसतें. सकाळपासून मी जेव्हां उभा हो-तों तेव्हां आतां सर्व तयारी झाली, होमशाळेंत ब्रा-ह्मणांची सिद्धता करून दिली, गांवांतले लोकांची उतरण्याची वगैरे व्यवस्था करून त्यांस शिधा सरंजा-म वगैरे हजार कामांची व्यवस्था सर्व जिकडली तिकडे लावून दिली आणि आतां इकडे आलों.

भु०—अहो तें खरें, पण प्रकृतीकड कांहीं पहाणं? सकाळपासून धांदलींत असल्यानं डोकं नसेल का चढलं ? पण ज्याचं नांव तें, बोलावं कोणी ?

महा०—आग प्रकृती काय ? ह्या जिवापेक्षां काय जास्त आहे ? ( हनवटीस हात लावून ) किती श्रम झाले तरी एकदां तुझें हास्यवदन पाहिलें कीं,—( अ-र्धेंच बोलून. )

भु०—( जरा हातास झिडकावून ) हो हो. पुरे आ-तां. सगळे श्रम माझ्याच करतां, आपल्या मनांतून नाहीं वाटतें ?

म०——काय माझें मनांतून काय ?

भु०—मला नाहीं माहित. पण आतां खालीं बस-णं नाहीं का होत ? माझे मेले पाय दमले.

म०–अग आतां बसण्यास वेळ कोठें आहे ? तिकडे ब्राह्मण वाट पाहताहेत. मंगलस्नानाकरतां चौकांत कारंज्याजवळ तयारी होऊन सर्व बायका वाट पाहत आहेत. तूंच चल लवकर मी आतां बसतबिसत नाहीं. (इतक्यांत प्रधान येऊन) महाराज ब्राह्मण वाट पाहताहेत. सर्व मंडळी आपणास केव्हां मंगळस्नान होणार ह्मणून आनंदानें मार्गप्रतीक्षा करीत आहेत. आणि गंगाळांत उपसलेलें पाणी थंड होत आहे. ह्मणून त्वरा होण्याविषयीं विनंती आहे.

म०–ठीक आहे. हा आलों पहा. तुह्मी व्हा पुढें.

सु० व प्र०–आज्ञा सरकार. (असें ह्मणून जातो.)

म०–चल येतेसना आतां ? सर्व वाट पाहत आहेत. ऐकिलेंस तर खरें.

भु०–पण हें काय? जोड्यानें का स्नान करावयाचें ? जा मेलें मी नाहीं. आतां आपण लहान का आहोंत?

म०–अग लहान कशाचे ? मंगळ स्नान ह्मणजे अंगास सुगंधिक तेल वगैरे लावून जोड्यानें स्नान करावें, आणि सर्व लोक आनंदानें भोंवतालीं पाहत असतात. वाजंत्रीं वाजतात. याचें नांव मंगळ स्नान, आणि तसें करण्याचा आजच दिवस आहे, तेव्हां त्यांत लहान आणि मोठें काय ?

भु०–हो ! तें खरेंच, पण मला बाई लाज वाटते. जोड्यानें स्नानाची लग्नांत नाहीं का हौस पुरली ?

म०–अग लग्नांत काय तूंही लहान होतीस, आ-

णि मीही अज्ञान होतों; उपयोग काय? आतां मात्र हौस पूर्ण होईल. ( असें ह्मणून तिला हातीं धरून नेऊं लागतो. )

भु०–हें काय वेडेपण ! मी नाहीं जा. मला नको तें मंगळस्नान; जा तुह्मीच करा जा. मी आपली येथेंच स्नान करून येतें.

म०–वा! मनचीच मुक्त्यार. आज उभयतांनीं स्नान केलेंच पाहिजे चल लवकर. (हनुवटी धरून) असें काय वेड्यासारखें करतेस? माझें ऐकत नाहींसना? मग आटपूं तर यज्ञसमारंभ? ब्राह्मणांस सांगूं घरीं जा म्हणून? बोल. तुझ्याच मनांत नाहीं, मग मी तरी कशास यातायात करूं?

भु०–( किंचित हंसून ) काय तरी पण, जसा खराच राग आला. जरा नाहीं कां होय ह्मटलें कीं, गेली तबियत. येतें हो. ( असें ह्मणून सुमित्रेस हाक मारते. ) सुमित्रे,

सु०–जी बाईसाब जी. ( धांवत जवळ येते. ) काय सरकार?

भु०–अग मी जातें चौकांत स्नानाला, दुगोली भरजरी लफ्याचा पिंवळा शालू आणि अंजीरी, मोतीं जडलेली चोळी ती? संक्रांतीस तयार केलेली? ती घेऊन लवकर चौकांत येहो?

सु०–व्हय बाईसाब. बिगिनशान येतें. तुह्मी व्हा होर.

भु०—चलाहो आतां सरकार, आपल्याच सारखें होऊंद्या. (असें ह्मणून दोघेंही एकमेकांकडे पाहून किंचित हंसून व किंचित् रागाचे झटक्यानें निघून निरनिराळे वाटेनें चौकांत येतात.

## होमशाळा.

विदू०—अहो सिताराम जोशी, अहो शास्त्रीबावा, काय राव, तुह्मी तर सुपाऱ्याच मिळविण्याच्या नादांत! इकडचा ग्रह तिकडे आणि तिकडचा मंगळ इकडे, सर्व सुपारीचे काळ. यंदा तुमची साल बेगमी होत आहे असें वाटतें. हे किती तांदूळ ! आणि किती नारळ! किती हवा तितका खुर्दा उपटून आणला आहे! आणि केवढा समयांचा चकचकाट आणि उदबत्त्यांचा घमघमाट ! रांगोळ्याचा थाट करून ठेविला आहे; ह्मणजे हें पाहूनच सरकारांनीं खुष व्हावें. बरं तें असो. कांहो जोशीबावा ? आतां हे इतके एकवीस हंडे तूप लागणार कांहो? मी कांहीं कुठे बोलणार नाहीं सांगानात ! यांतून घरीं उदर होमास किती लागणार? दक्षिणेचा तरी हाच गोंधळ दिसतो ! कोठीवाल्याची आणि जामदारखानेवाल्याची सरकत ठेविली असली ह्मणजे बरें, मग हवें तितकें द्यावें. "ऐशीं तिथें पंच्यायशीं, आणि करगे ट्वळे पुरणपोळ्या !" तुमचें काय खर्चतें ! आणि कोठीवाल्याचें काय खर्चतें ? मुद्दलांत तोटा माझा.

जो०—अरे, (नाकावर बोट ठेवून) मोठ्यानें ओ-

५

रहूं नको. तुझा नाहीं का हिसा यांत? अरे, निघेल तितकें यजमानाकडून काढून घ्यावें. असे श्रीमंत यजमान वारंवार का आपल्या तावडींत सांपडतात? बरें तें असो, पण कांरे विदूषका, सरकारचें स्नान नाहीं का अद्याप झालें?

**विदू०**—वाहवा! वा, एकून राजास दिवाळी माहीतच नाहीं? तुह्मी तरी दिवसभर "पिंडदान का घोड्याचा दाणा" या विचारांत असतां असें वाटतें. अहो सरकार चौकांत येऊन काय स्नानाचा थाट उडाला! प्रथम अंगास उंची तेल वगैरे लावून, ह्मणजे राणीसाहेबांस, प्रधानजीच्या व सेनापतीच्या वगैरे स्त्रियांनीं अंगास लाविलें, आणि शागिर्द पेशानें सरकारचे अंगास लाविलें, मग काय! उभयतां शिळेवर उतरल्याबरोबर, चहूंकडून सहस्रावधी उष्णोदकाचे तांब्ये पडूं लागले, तशांत स्त्रियांनीं मंगल गाणें ह्मणण्यास सुरू केलें होतें. चहूंकडेस दारू सुटूं लागली, तोफांचे अवाज आणि बंदुकांच्या आवाजांनीं तर कांठाळ्याच बसल्या; तशांत चवघड्याची घाई, सनयांची गर्दी, राजकुटुंबांतील स्त्रियांची व पुरुषांची थट्टामस्करीची मौज अशी मोटी गंमत झाली बोवा, मी तर एक घटकाभर अगदीं शुद्धींत नव्हतों; या सर्व थाटामध्यें गुंग होऊन गेलों होतों. आतां इतक्यांत सरकार येतील. मी इकडे आलों तेव्हां स्नान होऊन पितांबर नेसत होते, आणि राणीसाहेब दागिने घालीत हो-

त्या. ( इतक्यांत समोरून सरकार स्वारी आली असें पाहून विदूषक लांब पळून जातो. )

शा०–( सरकार आले पाहून ) यावें, यावें, सर्व सिद्धता आहे. ( नंतर भुवनपाल राजा मांडलेल्या स्वास्तिक पाटावर बसतो. भुवनसुंदरीही त्याचे शेजारीं येऊन बसते; आणि वरकड सर्व लोक चारही बाजूं-नीं घातलेल्या बिछायतीवर बसतात, संपूर्ण स्त्रिया वरतीं जमल्यावर चिकाचे पडद्यांत बसून मौज पाह-तात; दारीं संपूर्ण सैन्य थाटानें उभें राहिलें आहे. चहूंकडेस आनंदानें चवघडे झडत आहेत. याप्रमाणें तयारी झाल्यावर वैदिक ब्राह्मण राजाभोंवतीं बसून प्रथम पुण्याहवाचन इत्यादि कृत्यांस, व राजाचे हा-तास यज्ञकंकण वगैरे बांधण्याचा विधी करूं ला-गतात. ( इतक्यांत विदूषक हळूच येऊन जोशीबावा शेजारीं बसतो. )

वि०–कांहो रामभटजी ? ( हळूच ) सरकारचे व राणीसाहेबांचे मात्र कपाळास सुवर्ण घट लाविला, आणि मीच काय पाप केलें ? माझा नाहीं कां मान? मी तरी काय तुह्माला हलका वाटतों कीं काय ? ति-कडून खुर्दा मिळतो ह्मणून त्याचे कपाळीं नारळ, आ-णि आह्माजवळून चिंचोके मिळणार; तर आमचे कपाळीं सुपारी तर खरी. त्यांचे हातात पिवळें सूत आणि हळकुंड बांधलें, माझे हातांत निदान सोन्यानें कडें तर खरें. सोन्याला तर कांहीं दुष्काळ नाहीं ना?

**जो०**–(रागावून) कायरे काय आहे गडबड? तुझी तर सर्व कामांत धांदल आहेच, अशानें सरकारास सांगून तुला येथें येण्याचीच बंदी करीन. हा काय चावटपणा! वेळ कोण! प्रसंग कोण! कोठें थट्टा करावी हें कांहीं समजत नाहीं. "सब भाई बारा टक्के."

**विदूषक**–( सितारामजोशी रागावले पाहून पळून जातो. नंतर यज्ञास आरंभ होतो.)

**जो०**–हं हं रामभटजी, त्या समिधा द्या हिकडे, हे तीळ द्या, द्या, द्या, लवकर, आणा.

**राम०**–अहो आणा काय? कापूर कोठें आहे? तुपाची पातेली कोणी लवंडली ही? छेः! काय हे? मी आतांच येथें पंचपात्री ठेविली ती कुठें आहे? ह्या द्या, जोशीबावा समिधा द्या. पण अहो प्रथमतः बीज मंत्राचें उपपादन करणें अवश्य आहे. कां त्रिविक्रम शास्त्री असेंचना? आपण सांगाल तसें. आमचें काय? कोणी तसेंही करतात, आणि कोठें अशीही चाल आहे.

**शा०**–अहो यांत आमचें गम्य नाहीं. तो तुमचाच विषय. जशी रूढी असेल तसें करावें म्हणजे झालें. तुमचें आपलें चालूं द्या. अहो "भोळा भाव आणि सिद्धीस जाव." शेवटीं मात्र अग्निनारायणास हात जोडून प्रार्थना करावी कीं "पत्रं पुष्पं फलं तोयं" याप्रमाणें प्रार्थना केली म्हणजे झालें; हं चालूं द्या. दोन प्रहर भरत आले.

( नंतर रामभट, गजाननभट रामयाज्ञीक्षित, यज्ञेश्वर दीक्षित, वगैरे याज्ञिकी ब्राह्मण मिळून, कुंडांत आहुती टाकतात आणि एकच गडबड होऊन जाते. )

राम०—ओं अग्नयेस्वाहा अग्नयइदंनमम.

ग०—ओं इंद्रायस्वाहा इंद्राय इदंनमम.

रा०—ओं मैत्रियस्वाहा मैत्रिय इदंनमम.

य०—ओं प्रजापतयेस्वाहा प्रजापतये इदंनमम. ( विदूषक हळूच येऊन बसतो. )

वि०—ओं श्वानायस्वाहा श्वानायइदंनवच. ओं परस्त्रिये स्वाहा परस्त्रिये इदंनवच. ओं तारायंत्रायस्वाहा तारायंत्राय इदंनवच.

जो०—( सितारामजोशी रागावून ) कारे ! आलास कां पुनः गडबड करण्याला ?

वि०— नाहीं बा, मी आपला गप्प बसलों आहें. पण कांहो जोशीबावा, यामधील कुंडाचें तोंड ईशान्य दिशेस कसें केलें ? कारण "चडचड" शास्त्रांत,आणि "खडखड" पुराणांत याविषयीं एक कायदा सांगितला आहे; ह्मणजे, तीनशें ब्याण्णव कलमांत पुनर्विवाहाविषयीं जो सवाल सांगितला आहे, त्यांत तरी असेंच सांगितलें आहे. पण तें आतां असो. तुमची ही गडबड आटपणार कधीं? आपल्याला तर भूक लागली बा.

जो०—अरे, तूं गरीब आहेस ह्मणून तुझी दया येते; नाहीं तर आतांच सरकारास सांगून यज्ञांत गडबड करतोस ह्मणून यथास्थित बक्षीस दिलें असतें.

त्रि०—छेबा, तसें कांहीं नाहीं. माझी बायको चु-कली, ह्मणून मी या ठिकाणीं तिला पहाण्यास आलों; कारण, कुठें तरी या गडबडींत धुरामध्यें डोळे चोळीत किंवा दशमी खात बसली असेल; ह्मणून बापडा मी आलों. नाहीं तर तुझी 'या!' ह्मटल्यानें व सरकारांनीं शंभर बोलावणीं पाठविलीं तरी हा गृहस्थ येण्यासारखा आहे काय ?

जो०—अरे तुझी बायको आहे कुठें ? आणि लग्न तरी झालें काय ? जा नीघ येथून. तुला कांहीं खाव-यास दिलें तर मग जाशीलना ?

त्रि०—मग पुनः येणार नाहीं. परंतु जितके दिवस तुमचा हा यज्ञ चालू राहील, तितके दिवस मला रोज नऊ ओले नारळ देण्याचा रतीब ठेवावा, म्हणजे मग तुम्ही निर्विघ्न यज्ञाचें फळ शेवटपर्यंत घ्याल; नाहीं तर ( अर्धेंच बोलून. )

जो०—अरे, हा यज्ञ आजपासून सात दिवस चाल-णार, आणि रोज संध्याकाळपर्यंत सर्व ब्राह्मण राजा-सहीत उपवासी राहून सायंकालीं कंदमुलादी दुग्ध-आ-हार मात्र करणार. सातवे दिवशीं पूर्ण आहुती हो-ऊन मग मोठींच समाराधना होऊन आम्हां सर्वांची पारणा होणार, असा हा बेत आहे. तेव्हां तेथपर्यंत आपलें आगमन कधींच या ठिकाणीं होऊं नये. नऊ सोडून दहा नारळ मी तुला देत जाईन.

त्रि०—हो, घाल तर काय ? हलवायाच्या घरावर

तुळशीपत्र. तुमचें काय जाणार. ( असें म्हणून निघून जातो.)

( पडदा पडतो. )

त्रि०–( पडद्याबाहेर ) नमस्कार. ( लवून ) नमो नमः. वाहवा वाहवा ! हें झेंडूचें फूल कोणीकडे ? इतके दिवस कोठें अस्त झाला होता ?

सूत्र०—अरे अस्त कशाचा ! कामकाजामुळें भेट नाहीं झाली; तुझ्यासारखा मी रिकामा आहें ?

त्रि०–एकून मी रिकामा ना ? विलासबागेंतून लाडू खाऊन हा आतांच आलों. हें नव्हे का काम ? सर्व कामांपेक्षां जेवणाचें काम मोठें.

सू०–बरें तें असो.कांरे? विलासबागेंतील कसा काय थाट झाला ? लाट आहे ना ?

त्रि०–ती कांहीं सांगतां सोय नाहीं, इतका वेळ माझा कसा करमणुकींत गेला! एकून तुमच्या संगतीनें मोठी गंमत दृष्टीस पडली बोवा.बहार झाली काय! मला तें सर्व हुबेहूब खरें वाटलें. काय यज्ञाचा थाट ! आणि जेवणाचा बेत तरी किती सुंदर होता ! काय बुवा सगळें स्वप्नासारखें झालें. आमचे ते सोबती, सितारामजोशी आणि त्रिविक्रम शास्त्री हे सर्व कोणीकडे गेले ? दहा नारळ मात्र रोजचे बुडाले. कांहो सूत्रधार, हें सर्व मी कां झोंपेंत पाहिलें? झोंपेंत ह्मणावें सर्व, तर हुबेहूब डोळ्यापुढें दिसतें. ह्मणजे सात दिवस मी जसा कांहीं विलासबागेंतच होतों. आणि यज्ञ

झाला, समाराधना झाली, शेवटीं पूर्ण आहुती होऊन सर्व ब्राह्मणांनीं शेष राहिलेला प्रसाद राजाचे हाता-नें भुवनसुंदरीस देवविला; आणि मोठ्या स्वरानें ब्राह्मणांनीं आशिर्वाद दिला, तेव्हां मीही त्यांत होतों; व आशिर्वादांतला भावार्थसुद्धां माझ्या लक्ष्यांत आहे. सितारामजोशी आणि रामभटप्रभृती मंडळींनीं राजास "तुला अग्निनारायणाचे प्रसादेंकरून उत्तम कुळाचें उद्धार करणारिण, महा पतिव्रतारूप व गुणसंपन्न असें कन्यारत्न प्राप्त होईल," असा आशिर्वाद दिला. काय काय सांगूं! इतका वेळ पाहिलेला प्रकार सर्व अक्षरशः माझ्या ध्यानांत आहे, आतां तर त्यापैकीं कांहींच दिसत नाहीं. फक्त पूर्वीचा हा रंगमंडप, तुह्मी आणि मी येवढें मात्र दिसतें. ती शृंगारपुरी कोठें गेली? विलासबाग कोठें गेला ? आणि मी कोठें आलों? हें काय सूत्रधार? तुमच्याजवळ खचीत बंगाली विद्या आहे. इतक्यांतले इतक्यांत सर्व नाहींसें करून, तुह्मी मात्र दगडासारखे उभे आहांत. आपण बंगाली विद्येत मौज दाखविली, पण आपण कोठें दृष्टीच पडलां नाहीं, आतां तें नाहींसें करून आपण मात्र दृष्टी पडतां, उपयोग काय ? मला तर अगदीं चरका लागला आहे. पुढें एवढेंच कसें संपलें ? सूत्रधार, मी पायां पडतों, आणिक एकदां तुमची ती नजरबंदी चतुराई दाखवा.

सू०—अरे वेड्या, ती बंगाली विद्या नव्हे. मी आ-

पल्या बुद्धीनें मानसाचे ठायीं कांहीं कल्पित कथाभाग रचून त्याप्रमाणें माझे पात्रांकडून हुबेहूब तीं सोंगें आणवून तो कथाभाग करून दाखविला; आणि तो चमत्कार तूं पाहत होतास त्या वेळीं मीही जवळ होतों. पण तुझें पाहतो कोण ? तूं त्या लाडूंच्या आणि नारळांच्या थाटांत होतास. पहा मी जवळ नाहीं. तर कथाभाग सभासदांच्या दृष्टीस कसा पडेल ?

वि०—वः! मोठें विद्वान आहांत! आजपर्यंत पुष्कळ कथाभाग मीं पाहिले व ऐकिले, पण असलें चरित्र कधींच माझ्या पाहण्यांत नव्हतें. पण कांहो ? आणखी थोडेंसें पुढें आहे कां ? कां अगदींच संपलें ? असलें तर तोळाभर द्या, म्हणजे त्याबद्दल कमिशन वेगळें देऊं, कारण, एखाद्याला जेवावयास बसविलें तर पोटभर जेऊं घालावें. तसें तुमचा खेळ अर्धाच पाहून आमची तृप्ती झाली नाहीं. तेव्हां आणखी तोळामासा असेल तर द्या. अजून रात्र पुष्कळ आहे.

सू०—विदूषका, मी दाखवीत होतों तें चरित्र संपलें नाहीं. अरे हा तर पहिला भाग झाला, अजून गंमत ती तर पुढेंच आहे. तुझी मर्जी असल्यास पुढील भाग दाखवितों; पण तूं मदत करशीलना ? तुझी मदत अगोदर असली पाहिजे.

वि०—हो. ते खरें "दुर्जनं प्रथमं वंदे." सूत्रधार, तुह्मी सांगाल ती मदत करतों; परंतु आणखी एकदां गंमत दाखवा.

सू०– आतां पहिल्या भागांत काय काय झालें तो संदर्भ तझ्या ध्यानांत असेलच ? ह्मणजे पुढला भाग दाखवितों, नाहीं तर पुढें पाठ आणि मागें सपाट !

त्रि०–नाहीं नाहीं हो. अगदीं एकून एक संदर्भ माझ्या ध्यानांत आहेत! ह्मणजे पहिल्या भागांत इंद्रजिताची आणि रावणाची झाली मारामारी, तेव्हां मग पांडव मध्यस्थी पडून हिरण्यकश्यपूच्या घरीं तो खटला तोडला. मग तिकडलें लचांड फिरलें आणि रामकृष्णाची लढाई लागली. मग काय विचारतां ! ते कांहीं केल्यानें ऐकेनात; शेवटीं अस्मादिक तेथें जाऊन त्या दोघांचा सल्ला केला, आणि विडा देऊन त्यांना वाटेस लाविलेन् विचारतां काय! ( अंग पुढें करून ) पहा ही शालजोडी त्या कामांतच मिळाली.

सू०–शाबास ! वाहवारे वाहवा ! तुझ्या पुढें श्रम करून पालथ्या घागरीवर पाणी; काय संदर्भ ध्यानांत ठेविला ? ( आश्चर्य वाटून ) बरें असो. तूं तर बुद्धिवानच आहेस; परंतु मी तुला आणखी एक वेळ कथाभाग समजावितों. ऐकून घे.

( पहिल्या भागांत भुवनपालराजा संततीकरतां दुःखित होऊन विद्वान मंडळीच्या सांगण्यावरून त्यानें विलासबागेंत जाऊन पुत्रकामेष्टी यज्ञ केला. नंतर पूर्णाहुतीच्या पूर्व दिवशीं रात्रीं राजाच्या कुलो-

पाध्यायास स्वप्न पडलें, त्यांत अग्निनारायणांनीं दृष्टांत दिला कीं, भुवनपाल राजास मत्प्रसादेंकरून एक कन्यारत्न मात्र प्राप्त होईल, पुत्र होणें त्याचे प्राक्तनीं नाहीं; कन्या सर्व गुणसंपन्न होईल. याप्रमाणें स्वप्नांतील मजकूर उपाध्यायांनीं सर्वांस सांगितल्यावर दुसरे दिवशीं पूर्णाहुती करून सर्व ब्राह्मणांनीं राजास अशिर्वाद दिला. नंतर ब्राह्मणभोजन होऊन सैन्यासह भुवनपाल शृंगारपुरीस परत आला. अशी कथा पहिल्या भागांत झाली. तूं नाहीं का पाहिलेंस?

वि०—हो, हो. खरी गोष्ट. इतकें चरित्र मीं अवलोकन केलें खरें. आतां कृपा करून पुढील भाग दाखवा. आतां मात्र पक्कें लक्ष्यांत ठेवितों.

सू०—ठीक आहे; आतां दुसऱ्या भागास आरंभ करतों. चमत्कार पहा. त्या भागांत भुवनपाल राजास कन्यारत्न प्राप्त होणार आहे; तेव्हां तूंही सावध रीतीनें मदत कर.

वि०—ठीक आहे. ( असें ह्मणून सर्व निघून जातात ).

( पडदा पडतो. )

# भाग २.

## प्रवेश १.

### स्थळः—कचेरीची जागा.

### पात्रें.

भुवनपाल..................राजा.
सुविचार .................प्रधानजी
शौर्यसागर .............सेनापती.
त्रिविक्रमशास्त्री .......न्यायाधीश.
सितारामजोशी ........आश्रित.
इतर सर्व मंडळी........सभासद, कामगार वगैरे.

(स्वारी सिंव्हासनावर बसतांच.)

चोप०—नजररखो महाराज. सलाम. बंदेका मुजरा है सरकार निगारगो. (सर्व मंडळी बसल्यावर.)

त्रि०—कां? आज संपूर्ण सभाउदास कां बरें दिसते ? कोणी कांहींच बोलत नाहीं; सर्व आपापले ठिकाणीं मौन्यमुद्री कां ? सरकार तर फारच चिंतातुर दिसतात. (हात जोडून) एक आपण सुखी तर सर्व जग सुखी, आपलेंच मुख जर म्लान, तर मग इतरांचीं कशीं प्रफुल्लित असतील ? हें उघड आहे. आतां प्रायः औदासिन्य धरण्याचें कांहीं कारण नाहीं. भगवत्कृपेंकरून मानासिक हेतू पुर्ण होतील. आतां, " धीरसो गंभीर." करावें काय? जगीं सर्व सुखी कोण आहे ? कां जोशीबावा, असेंच कीं नाहीं ?

जो०—हो तर काय ? सांप्रत असेंच समजलें पाहिजे. ईश्वर देईल, करील तेव्हां कोणी पाहिलें आहे? सध्यां जाते आहे घटका ही खरी. म्हटलें असतां अजूनही ईश्वरी दया होऊं नये काय ? झाले, यज्ञ झाले, याग झाले, दान झालें, धर्म झाला, पण प्रभू अजून आमच्या सुखाकडे लक्ष देईना. तेव्हां निरंतर आमच्या धन्यासुद्धां आम्हांस दुःखसागरांत ठेवणें त्याला आवडलें आहे, यांत संशय नाहीं. असो, त्याची इच्छा. ( वाईट वाटल्यासारखें दाखवून ) म्हटलें असतां यज्ञ होऊनही सहा महिने झाले, तरी अजून तो रंग कांहींच दिसत नाहीं.

मा०—काय ? ईश्वरानें काय करावें ? पूर्वी आम्हीं वाहिलेंच नाहीं मग तो तरी देईल कोठून ? मला तर आतां अगदीं चैन पडत नाहीं. कांहीं दिवस राज्य सोडून अरण्यवास तरी करावा. काय अभाग्याला काय ? अरण्य आणि घर सारखेंच आहे. कारण, ज्या घरीं मूल नाहीं तें घर अरण्यांतच आहे.

सू०—महाराज हें काय ? असा उदासपणा धरून काय होणार ? आज एक वर्षांत आपलें लक्ष बिलकूल राजकीय कामांत नाहीं, तेव्हां फार काळजी वाटत आहे. कारण, थोरांस नेहमीं भय असतें. तसें गरिबांस नसतें. ( हात जोडून ) महाराज, सर्व दुःखाचा विसर करून पूर्वींप्रमाणें आम्हां दिनांचे पालनाकडे लक्ष्य असावें, प्रजा पालन करणें हाच राजाचा मुख्य

# भाग २.

## प्रवेश १.

### स्थळः–कचेरीची जागा.

### पात्रें.

भुवनपाल................राजा.
सुविचार ................प्रधानजी
शौर्यसागर ............सेनापती.
त्रिविक्रमशास्त्री .......:न्यायाधीश.
सितारामजोशी ........आश्रित.
इतर सर्व मंडळी........सभासद, कामगार वगैरे.

(स्वारी सिंव्हासनावर बसतांच.)

चोप०–नजररखो महाराज. सलाम. बंदेका मुजरा है सरकार निगारगो. (सर्व मंडळी बसल्यावर.)

त्रि०–कां? आज संपूर्ण सभाउदास कां बरें दिसते? कोणी कांहींच बोलत नाहीं; सर्व आपापले ठिकाणीं मौन्यमुद्री कां? सरकार तर फारच चिंतातुर दिसतात. (हात जोडून) एक आपण सुखी तर सर्व जग सुखी, आपलेंच मुख जर म्लान, तर मग इतरांचीं कशीं प्रफुल्लित असतील? हें उघड आहे. आतां प्रायः औदासिन्य धरण्याचें कांहीं कारण नाहीं. भगवत्कृपेंकरून मानासिक हेतू पुर्ण होतील. आतां, " धीरसो गंभीर." करावें काय? जगीं सर्व सुखी कोण आहे? कां जोशीबावा, असेंच कीं नाहीं?

जो०—हो तर काय! सांप्रत असेंच समजलें पाहिजे. ईश्वर देईल, करील तेव्हां कोणी पाहिलें आहे? सध्यां जाते आहे घटका ही खरी. म्हटलें असतां अजूनही ईश्वरी दया होऊं नये काय? झाले, यज्ञ झाले, याग झाले, दान झालें, धर्म झाला, पण प्रभू अजून आमच्या सुखाकडे लक्ष देईना. तेव्हां निरंतर आमच्या धन्यासुद्धां आम्हांस दुःखसागरांत ठेवणें त्याला आवडलें आहे, यांत संशय नाहीं. असो, त्याची इच्छा. ( वाईट वाटल्यासारखें दाखवून ) म्हटलें असतां यज्ञ होऊनही सहा महिने झाले, तरी अजून तो रंग कांहींच दिसत नाहीं.

रा०—काय? ईश्वरानें काय करावें? पूर्वी आम्हीं वाहिलेंच नाहीं मग तो तरी देईल कोठून? मला तर आतां अगदीं चैन पडत नाहीं. कांहीं दिवस राज्य सोडून अरण्यवास तरी करावा. काय अभाग्याला काय? अरण्य आणि घर सारखेंच आहे. कारण, ज्या घरीं मूल नाहीं तें घर अरण्यांतच आहे.

सू०—महाराज हें काय? असा उदासपणा धरून काय होणार? आज एक वर्षांत आपलें लक्ष बिलकूल राजकीय कामांत नाहीं, तेव्हां फार काळजी वाटत आहे. कारण, थोरांस नेहमीं भय असतें. तसें गरिबांस नसतें. ( हात जोडून ) महाराज, सर्व दुःखाचा विसर करून पूर्वीप्रमाणें आम्हां दिनांचे पालनाकडे लक्ष्य असावें, प्रजा पालन करणें हाच राजाचा मुख्य

धर्म आहे. आणि त्यांतच ईश्वर प्रसन्न होईल यांत संशय नाहीं. परंतत्री कामाची काळजी मनुष्यानें वाहून उपयोग काय ? लाभ, मृत्यु हानी हीं कलमें परमेश्वराचे स्वाधीन आहेत, त्याची काळजी आपण करून काय होणार ? तेंव्हां सरकार, आपणास सांगण्याचा म्हणजे माझा अधिकार आहे अशी गोष्ट नाहीं. आणि बोललों त्याची माफी असावी, परंतु माझ्यानें रहावत नाहीं म्हणून पूर्वीं क्षमा मागून नंतर विनवितों कीं, सरकारांनीं आमचे संरक्षणाकडे विशेष लक्ष्य देत असावें. कारण, आसपास बंडावा फार झाला आहे म्हणून मी ऐकतों.

से०—क्या बोलत हो ? [ प्रधानाकडे पाहून ] लंडीकी बिसात क्या ! आपने तरफ कुइ आख खोचके देखेगा तो सालेके तुक्के तुक्के बना देऊंगा. मगदुरक्या महाराज, [ हात जोडून ] ऐसें लुचें कुचें बंडवालेसें आपना क्या होनेका है ? सरकार, अबी इसे वक्त हमारे पास आढार लाख फौज हत्यारबंद तयार है, एबी कुच ऐसी वैसी नहीं, सब अछे अछे जवान, और कवाइतमेंबी बडे हुशार. सुनो खाविंद, और ऐसी हजार सवार बडे मजेसे रात दिन दुसमानकी रहा देखत है, किसिकीं पुण्याइ है अबाडी आनेकी ? [ अगदीं संतापून ] और साला कुइ आयगा तो मै कुच ऐसा वैसा है क्या ? [ मोठ्या जलदीनें ] ए देखो समसेर हमारी; ए क्या सोती है

क्या ? किदर है दुसमान ! अबी उसके नरडीका घोट लेताहूं.[ तरवार घेऊन उठतो. ]

मा०–हं हं सैनापति, ए क्या जुलुम ? तुम वैसे आदमी हो उसखातर सरकारकु कुच किसोकी पर्वा नहीं. हमारा सब भरोसा तुमारेपर है, केवके कबी वक्त आयगा तो, तुम आदमी जानकु जान देनेवाले सच्ची है. ( पुढें होऊन ) बहुत आछा, तुमारी तयारी बहोत ठिक है, अबी चिपी दुसमानका नाम निकाला तो, तुमकु एत्ता घुस्सा आया. आन् जोकबी खरोखर दुसमान आया, तो तूं क्या करोगे कुच समजता नहीं. लेकिन बहोत खुष. ( पाठ थोपटून ) सरकारी रोटी खाकें नोकरी वैसी करना चाहियें. (समजवून खालीं बसवितो इतक्यांत. )

वि०–( थरथर कांपून व हात जोडून ) नाहीं नाहीं, मममला ककक क्या मालुम आआआहे. (हात जोडून) मीमीमीमी मला लालालालाडू आआआआवडतो.

प्र०–( रागावून )अरे कोन हैरे ? एकोन सोंग आयों है हाकाल देव. ( चोपदार येऊन बाहेर घालवितो.)

सि०–कां शास्त्रीबोवा ? सेनापतीची वीरश्री पाहिलीतना ? तो तरवार घेऊन उठला तेव्हां तर "यः पलाय स जीवते" करणार होतों,परंतु तितक्यांत, आपला आश्रय शेजारीं होता ह्मणून दम धरला.

शा०–अहो माझीसुद्धां अशीच दशा झालीन् वि-चारतां काय ? पाय लट लट कांपूं लागले आणि जीभ वांकडी वळली. काय नेम? त्याची स्वारी अंगावर आली तर काय घ्या, त्याची होईल वीरश्री आणि आपली होईल मुक्ति.–त्या विदूषकाची पाहिली नाहीं कशी दशा झाली ? पण त्यानें ती बळेंच केली वाटते.

जो०–हो तर काय ? त्याला नेहमीं संवय आहे, तो ज्यांत त्यांत आहेच; पण आपल्याला कधीं प्रसंग नाहीं.

मा०–कां शास्त्रीबोवा, कसे कसे लोक मजजवळ प्रसंगास आहेत पाहिलेना ? त्यांचे बळावर तर मी बिनघोर आहें. आणि आजपर्यंत चिनधास्तपणें राज्य चाललें आहे.

शा०–खरी गोष्ट महाराज. सर्व मंडळी तर उत्त-मच आहेत, परंतु [ दोघांकडे बोट करून ] प्रधानजी आणि सेनापती, अशीं माणसें सर्व राशतांत नाहींत. ( पायांकडे बोट करून ) या पायांची इमानानें चाक-री करण्यासच त्यांनीं जन्म घेतला आहे.

मा०–खरें आहे. ( इतक्यांत दस बजे है महा-राज ग्याराका अम्मल है असा मोठ्यानें स्वर ऐकून,) " चला प्रधानजी, आतां मी जातों. तुह्मी ह्मणालांत तो सर्व विचार मला समजतो आहे, पण काय करूं? जिवाला स्वस्थच वाटेना ; मी आपल्याकडून मनाला आंवरण्याला पाहतों. परंतु तें स्थिर होऊन राजकीय

कामाकडे लागतच नाहीं, याला मी काय करूं ? आतां सर्व भरंवसा तुमच्यावर आहे. तुह्मीच मालक असें समजा, तुम्हला वाटेल तसा राज्याचा बंदोबस्त ठेवा. तुम्ही आहांत, सेनापती आहांत, झालें, कधीं कमी जास्त मोठी खोल विचाराची मसलत करणें झाल्यास शास्त्रिबोवांचा विचार घेत जा, म्हणजे झालें. मी आहें नाहीं सारखाच समजा. मी तरी काय करूं ? येथें आलों म्हणजे पुष्कळ प्रकारें मनाची समजूत करून कांहींसें तें आंवरून धरतों, परंतु पुनः वाड्यांत, रंग महालांत गेलों कीं जसेंचें तसेंच होतें. माझ्यापेक्षां "तिकडे फार गडबड आहे." असो, आतां संभाळा म्हणजे झालें, परमेश्वराचे मनांत जसें असेल तसें होईल. ( असें म्हणून स्वारी उठते. )

चोप०–निगा रखो महाराज. दौलत बढती होवो. ( स्वारी गेल्यावर सर्वांचे मुजरे होतात. )

शा०–चला प्रधानजी, आतां वारंवार सरकारास कां दुःख देतां ? ते अगदीं भ्रमिष्ट झाले आहेत, आणि त्यांतून इतके न होते, परंतु भुवनसुंदरीच्या पुढें त्यांचें कांहीं चालत नाहीं, रात्रंदिवस संपती नाहीं म्हणून दोघेंही शोक करीत बसतात, आणि काय ? तुम्हीच काय संभाळाल तें खरें. करावें काय ? आजपर्यंत त्या अन्नदात्यानें कोणास शब्दानेंही दुखाविलें नाहीं, आणि असा राजा आपणास पुनः मिळणार नाहीं. आपणच काय ! सर्व दुनिया त्याला आशिर्वाद देत आहे.

प्र०-खरी गोष्ट आहे शास्त्रिबोवा. मी आज वीस वर्षे काम पाहतों आहें, परंतु कधीं चकार शब्द वांकडा ? अहो मलाच काय ? लहानापासून मोठ्यापर्यंत स्वारी सारखी. कोणाला ह्मणजे यांचा त्रास अशी गोष्ट नाहीं. अहाहा ! असा प्रभू मिळावयाचा नाहीं. आज महाराजांना संतती नाहीं ह्मणून सर्व दुनिया शोकग्रस्त आहे. कारण, सरकार कोणाशींच वांकडे नाहींत. असो, अशा प्रभूची एकनिष्ठ चाकरी आमच्या हातून होवो ह्मणजे झालें.

सेना०-अजी क्या शास्त्रिबावा ? हमारे सरकारके बालकु जो कुच धका होवे, तो मै आपनी जान नहिं रखेंगा. क्या किशीकी मगदूर है ? के उनकें तरफ तेडी नजरसे देखेंगा. मै सच्च बोलताहूं कें, हरवक्त आयातों आघाडी हमारी मान. और सब पिच्छेकी बात.

शा०-( त्याचे डोळे वगैरे पाहून भितात ) सं सं सं सेनापती सच्ची बात.

जो०-( भीतीनें लटलट कांपून मनांतच )या द्वाडाशीं बोलण्याचा प्रसंग नको. हा मनुष्य आहे. एखादे वेळीं, वांकडें जाते व जीभ चुकते. पण हा गृहस्थ लागलींच बया साहेबांशीं प्रसंग घालणार ! !

सेना०-चलो आच प्रधानजी, देर बहोत होवी ह्यासें तीस कोसपर कोइ बंड वालेनें दंगा कराथा, वैसा मुजकूं कल संदेसा मालुम पडा, तो मै आच जाता हूं, केंवके हूशारि हमेश रखना चाहिये, तुम भी,

सब काम हुशारीसें बजाना चाहिये, कैंवके सरकारकी तबीयत वैसी भई, उसवास्ते. जाताहूं–( मुजरा करून जातो. नंतर सर्व कचेरी बरखास्त होते. )

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

वि०–कां सूत्रधार, तुह्मी कोठें बुडी दिली होती? आज काय दरबाराचा थाट!

सू०–अरे बुडी कशाची! मी तेथेंच होतों. झाला हा प्रकार कोणी दाखविला? मीच.

वि०–असें काय? काय बुवा सगळें पांचटच! थू थू थू थू थू. ( जीभ पुसून ) अहो सगळें अळणी अळणीच कसें वाढतां? कांहीं तरी फोडणी, अगर खुसखुसीत? सर्व पुरुषसुद्धां बायांसारखे.

सू०–अरे झालें काय? मला कांहीं यांतला अर्थ समजत नाहीं.

वि०–अहो, मघां अस्मादिकांची स्वारी जेव्हां पालखींत बसून कचेरींत गेली, तेव्हां तिथें निघाल्या लढाईच्या गोष्टी. तेव्हां मग सर्वांची बोबडी वळली एकतां काय? त्यांत कोणीच शूर नाहीं. मग झालों पुढें, आणि सेनापतीची तरवार घेतली हातांत. तेव्हां काय तो! बेट्याचें नांव तरी कोणी कारागिरानें ठेविलें आहे कोण जाणें! शौर्यसागर नांव. आणि अस्मादिकांची स्वारी जेव्हां चवताळली, तेव्हां सरकार

( मोठ्यानें हंसून ) मग पुढें नाहीं सांगत; तुह्मी भ्याल त्रिल एखादे.

सू०—अरे, असूंदे तें, रात्र फार झाली, गंमत दाखवितों ती पहा.

त्रि०—आतां नको ती गंमत; सर्व बायकांची गंमत कोणी पहावी ? कांहीं लढाई नाहीं, कांहीं नाहीं. सर्व भिक्षुकी खटला पाहून मघांपासून त्रास आला. यज्ञ पहा आणि लाडू खा. नको तें आह्माला, आह्मी निजतों आपले.

सू०—अरे आतां भिऊं मात्र नको. सर्व रक्तानें जमीन नाहवून तुला दाखवितों. सहस्रावधी वीर मरतील तें तूं पहा; सावध रहा.

त्रि०—आणि मग कांहो ? भुवनपाल राजाला कन्या कां पुढचे जन्मीं होणार कीं काय ?

सू०—अरे छेरे. तेंही पुढें दृष्टी पडेल. पण अगोदर धडाधडी आणि फडाफडी तर पहा.

( पडदा वर होतो. )

---

## प्रवेश २.

### स्थळः—सेनापतीची कचेरी.

### पात्रें.

शौर्यसागरसेनापती..सर्व फौजेचा मुकत्यार.
बहादरसिंग.........सेनापतीचा दुय्यम कारभारी.
प्रतापसिंग..........जमादार.

सुंदरसिंग............हवालदार.
भास्करराव........स्वारांचा सुभेदार.
विदूषक............मनरंजन करणारा.
छडीदार...........दौलतीची इशारत देणारा.

प्रता०—केव सेनापतीसाव, आज इतनेजलदीसे बंदेकू काहेकू बुलाना भेजा ? मै आपने वखतकू कवी चुकनेवाला नहीं. लेकिन आज बडीफजर मैं जरा हुक्का बिक्का पिये और छोटे लडकेकू लेंके वागमे इदर उदर फिरताथा इतनेमे ( हात जोडून ) आपका होकम सुनकर दवडते ह्या आया. ऐसा सुन्नेकू बंदेकू बुलानेका क्या काम ? एसुनाना चाहीये.

सुं०—हां, हां, ठीक बोलले.जमादारसाव, मेरेकुवी ऐसाच होकम आया, उसवास्ते ए देखो ? एसमसेर विमसेर वैसीच बगलमे लपेटकें दवडते ह्या आया.

भास्क०—जमादारसाव, मालकाची चर्या आज कांहीं वेगळीच भासत आहे. मला देखील असें जलदीनें बोलावणें कधीं नव्हतें. रात्रीं जागरण झाल्यामुळें, ह्मणजे सत्यनारायण.

जमादार०—( मध्येंच ) हं, हं, समजलों फेरक्या जागरण झाला ?

भा०—त्या कारणानें नुक्ताच उठून रात्रीं गस्तींत एक स्वार आला कां नव्हता, त्याची चवकशी करीत होतों, इतक्यांत जासूद येऊन थडकला. ( विदूषक हळूच येऊन )

वि०—अहो सुभेदारसाहेब, मला तर सरकारची बोलावण्यावर बोलावणीं! एकदां स्वार आला, एकदां जासूद आला, मग सरकार स्वारी स्वतः येईल कीं काय हें भय वाटून याच पायीं पळत आलों बगा. कारण, अस्मादिक आल्यावांचून कोणतेंही काम होईल कसें? आमच्यासारखे शहणे आह्मीच. सगळ्या राशतींत शहाणपणाचा झेंडा आमचाच फडकतो आहे.

भा०—( रागावून )कारे तूं कां येथें? कोण आहेरे छडीदार?

छ०—आज्ञा महाराज.

भा०—अरे कोणीकडे तुमचें लक्ष असतें? कचेरींत कामाच्या वेळीं ही काय गडबड! हा कोण आला आहे? हांकून दे.

छ०—आज्ञा सरकार. (ह्मणून विदूषकास हांकून देतो. )

भा०—सेनापतीसाहेब, ( हळूच नम्रतेनें) हुकुमाप्रमाणें सर्व हजर झाले आहेत. अवेळीं कचेरी भरण्याचें कारण मात्र समजावें.

ना०—देखो भास्कररावजी, तुमबी बडे पंडत होकर तलवारबहादर हो, तुमारेसारिखा बंमनोमे कोइ शूर होनेका नहीं. तुमारी हुशारी और इभ्रत देखकर दुश्मानकीं अक्कल गुंग होजातीहै, देखो भास्करराव सुबेदारिका काम एक तुमारे खातरचहै. और किसिकी मा नहि पाई.

भा०—शौर्यसागरजी, (मोठे आभार दर्शवून) ए सब आपकी मेहेर्बानी है, आबकी खुसिकी नजर होवेतो, माझें काम कुइ एखादा मजूर हेलकरी पण करेगा. उसमे क्या ? सब आपली कृपा पाहिजे. केव जमदारसाब, मी बोलतोंहे ए सच की झुट?

प्र० व ज०—सच है. भास्कररावजी, तुमारी बात बहोत मिठी है, देखो. (हात जोडून) सरकारकी मेहरबानकी सब बात है. (सेनापतीकडे तोंड करून आबके पछोमे आज दस बरस मैनेबि नोकरी किई. लेकिन एक दिनबी आबकी तेडी नजर नहीं देखी, गरिबकी दया बी मनमे बहोत. मैं क्या कहु कुच भगवान जानताहै.

सुं० व हा०—आजी जमादार, क्या बात बोलत है? शौर्यसागर महाराजसारिखा आबी आदमी होने का नहीं. मै दौलतसे कमती हो सच्च, लेकिन मेरी उमर बहोत जादी है. शौर्यसागर महाराजकू मैनें बहोत छोटे और नंगे बी देखे है, उस दिनसें तबियतकी रहा जैसी है वैसी है. ऐसा गरिबका पालनवाला मालक आबी होने का नहीं.

भा०—खरी गोष्ट. हवालदारसाहेब, असे सेनापती आहेत ह्मणूनच आज राज्याची व्यवस्था ठीक आहे. नाहीं तर सरकार असे विदेही झालेले, मग आपली दशा कशी झाली असती ? यांच्या नांवाप्रमाणें यांची करणीही आहे. नांव जसें शौर्यसागर त-

से पराक्रमही आंगीं आहेत, किंबहुना जास्त. केव ह-वलदार, मै बोलताहूं हें खरें कीं खोटें ?

सु० व हा०–(हंसूं आलें ह्मणून तोंडास पदर लावून ) सच्च भास्कररावजी. लेकिन तुमाला जर हा-मारी भाषा बोलतां येत नाहीं तर बोलतां कशाला ? ( विदूषक हळूच लपत येऊन मनाशींच. )

वि०–काय रांडलेक शुद्ध बोलतात ? फुकटचे प-गार मात्र तेवढे! कोणाला पांचशे रुपये, कोणाला सा-तशे रुपये, पण विद्येच्या नांवानें शंख. मग यांचेपेक्षां मी बरा. माझ्या तरी "एम ए बिए" आणि सी इ. कडेये, येथपर्यंत परीक्षा झाल्या आहेत; किंबहुना प्र-धानाचें काम आपण चालवूं इतकी हुशारी आहे.पण आपला उगीच नाटकाचा शोक लागला ह्मणून यांत शिरलों, नाहीं तर एव्हांना बारिस्टर होऊन किंबहुना जजही झालों असतों. उगीच इंग्रजी सोडून या मरा-ठी राज्यांत आलों. मी पूर्वीं असें समजत होतों कीं, नाटकांत बहुधा बरेच शिकलेले आणि विद्वान लोक असतील. पण तें सारें लटकें झालें. या गांवीं आपले ज्यांनीं उठावें त्यांणीं नाटकें करावीं. एकाला सुद्धां कांहीं संस्कृत अभ्यास, किंवा इंग्रजी अभ्यास, अरे राम ! नांव देखील घेण्यास नको. असो, आतां विदू-षक महाराज, वेड्यांचे गांवांत आलों आहोंत; तेव्हां आपणही वेडेंच बनलें पाहिजे. ( उघडपणें )

चि०–खरें. खरें. भास्कररावजी, आपण बोललां

तेंही खरें, आणि हवालदार बोलते तेंही शुद्ध. मी मघांपासून आपल्या मुखांतून तारा तुटत होत्या त्या ऐकत होतों. ( इतक्यांत सेनापती आपल्याकडे पहातात असें पाहून हळूच पळून जातो. )

**सेना०**—सुनो जमादार, आज इत्ने सुभेकु तुमकू और सुंदरसिंगकू, भास्कररावकू बुलाना भेजनेका काम इतना कहताहूंकें, आपने शहरके नजीक नजीक बंडवालेनें बहोत धूम मचाइ है, और कल ऐसा संदेशा मालूम पराके आपनें रामघांटपर जो खेडा गांव है ओबी दुसमानने लुटालिया. और उनकी रहा शृंगारपुरिपरबी जरा जरा दिखती है. उसवास्ते सब लोककू सावध रहनेका होकम फर्माना. और किसकू मालूम कोई वक्त कैसा आवेगा तो ? उसखातर तुम सबलोक बहोत तयारीसे रहना. कल रातकु मैनें बाहदरसिंगके सात दस हजार फौज देकर उस्कूं बंडवालेकें तरफ दवडा है.

**प्र०**—क्या मगदूर सालेका! ( मिशांवर हात फिरवून ) हमारी समसेर समूरकू मालुम नहीं है. चलो, अब कुच फिकीर नहीं है, दुसमानका आबी समाचार लेताहूं. ( हत्यारें सांवरून ) चलो, हवालदारसाब, हुशारी रखना चाहिये, और जो कबी ( सेनापतीकडे हात जोडून ) आबका होकम होय तो आबीके आबी रामघाटपर दवड करताहूं, और ए हारामके नडिका घोट लेताहूं.

सुं०-हा. आजी काहेकूं आव जातेहो, बंडवालेकीं, विसात क्या ! ए बहादरसिंग गयाहै, वोच उसकीं कतल कर देयगा. ओबी कुच ऐसा वैसा आदमी नहीं है, एबी बहोत ठिक सिपाई है.

भा०-सच्च, जमादार साब. सेनापती महाराजानीं बहादरसिंगाची योजना तिकडे केली हें ठीक केलें. आणि कदाचित् सर्वांचा सल्ला असेल तर मागाहून मीही जाऊन समाचार घेतों. माझेही हात फार वळवळ करताहेत, ह्मणजे रामदुर्गावर लढाई झाल्यापासून आलिकडे तरवारीचें पोट फार दिवसांत भरलें नाहीं. याकरतां सर्व मिळून मला रजा द्यावी.

सेना०-आजी काहेकूं भास्करराव तुमारी तयारी? ए ऐसें कंगाल बंडवालेपर तुमारा और हमारा जानेका क्या काम है. लेकिन सबनें आपापने हुशारीसे रहना, इतनी बात सच्च है. ( इतक्यांत छडीदार पुकारतो. )

छ०-सेनापती शौर्यसागर महाराजकी दवलत बढती होवे.

सेना०-जमादार, छडीदार मध्येंच कां पुकारला? ( इतक्यांत छडीदार आंत जवळ येऊन ) महाराज, बहादरसिंगकी सवारी, बहोत दवडती बहार आइ है.

सेना०-अरे, उसकूं आने देव आंदर. [ आज्ञा सरकार ह्मणून छडीदार जातो आणि बहादरसिंग आंत येतात. ]

[बहादरसिंग आले पाहून सर्व ताजीम देतात.]

बहा०—[ बसल्यानंतर ] सुनो शौर्यसागर महाराज, आब बैठनेका वक्त नहीं. दुसमान शहरपर आकर उने मोर्चा लगादिया, अब्बी शहरपर तोफ सुरू होवेगी. ए दुसमान कोई ऐसा वैसा बंडवाला नहीं, ए चंद्रपुरीका राजा है, और उसके सात दो लाख फौज बडी जबरदस्त तयार है. कल रातकूं मै आपके होकमसे दस हजार फौज लेके रामघाटपर गया, और उसके सब लोक उसवक्त बडे गाफल रहथे उतनेमें मै जाकर व्हा हल्ला करदिया. और दो घंटमे दस हजार फौजके तुकडे बनाकर पचास उंट व्हाजवा हिरके छिन लिये फेर जरा ए लोक सावध होकर उनें हमारा आछा समाचार लिया. इतनेमे सुरज निकला और मैंने देखा तो अपने सब लोक बहोत लाचार हुवे है. फेर मै आपने सब लोककु लेकर व्हासे जो भाग आया तो रामदुर्गपर सब लोक रख दिये, और मै ए रस्तेसे आपके पावके पास हजर हुवा हूं, दुसमानबी रामघाटके रस्तसे शहरके हत्तीदरवाजे नजीक आकर उने मोर्चा लगादिया है. चलो, चलो, क्या देखते हो ? महाराज, आज जलदी तयारी करो.

सेना०—आछा बहादरसिंग तुम घबरो मत. कुछ फिकीर नहीं. चंद्रपुरके राजाका मै आबी समाचार लेताहूं. सुनो भास्करराव, तुम पचास हजार स्वार ले-

के, और प्रतापसिंग जमादारनें पचास हजार पायदल लोक लेके, और सुंदरसिंगनें दोसों तोफ–तोफखाना लेकें व्हां हत्तीदरवाजेपर जाकें आधी पाव घंटेमें तयार रहना. और बहादरसिंग, तुम एक लाख फौज लेकर सब गांवकोसके उपर और चारो दरवाजेके उपर बंदोबस्त करना. पिछेसे मैभी हत्तीदरवाजेपर मदतकूं आताहूं. चलो कचेरी बरखास करो. सब लोक हुशारीसे आपापने होकम माफक काम करना चाहिये. नहीं तो मै किसिकी, इदर उदर सुन्नेवाला नहीं. कबी किसिकी, कसर मेरे नजरमे आयीं, तो तोफके आगे देउंगा. चलो, भगवानका नाम लेकर निशान ठोक देवो. मै जरा महाराजजी, और सुविचार प्रधानजीकी, वाडेमे जाकर मुलाकत लेताहूं, और पिछेसे आबी तुमारे मदतकूं आताहूं.

( जमादार, सभेदार, बहादरसिंग सर्व मंडळी आज्ञेप्रहुकूम करतों असें ह्मणून कचेरी बरखास्त होते. )

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

वि०–( बाहेर येऊन ) कां सूत्रधार ! कोठें आहे आमचा घोडा ? घोडा नाहीं तर बैल आणा. चला, आटपाहो मंडळी व्हा तयार. चला, सूत्रधार माझी कंबर बांधा पाहूं. बळकट म्हाटानें बांधा, नाहीं तर लढाईत सुटेल बिटेल एखादी ! ती तरवार

आणा, कट्यार माझ्या पागोट्यांत बांधा, आणि ही बंदूक गळयांत आडकावा; ह्मणजे आह्मी पंचहत्यारी शिपाई बनलों ! चला, सूत्रधार शत्रूनीं फार गडबड केली हत्ती दरवाज्यावर. आपण तर बा ज्याची पोळी खाल्ली, त्याची टाळी वाजविणार. नाहीं तर यज्ञ झाला तेव्हां लाडू खायला तेवढे पुढें पुढें, आणि आतां तुह्मी मागें हटतां नाहीं ?

सूत्र०—अहो फक्कड शिपाई, आह्मी किती झालों तरी जातीचे ब्राह्मण; तेव्हां आह्मी लाडूच खाऊन रहावें, आणि लढाईंत जाणें हें तुझ्या सारख्या शूराचें काम.

वि०—हें काय विचारावें ! अहो, (हळूच) मी जात नव्हतों, पण सेनापतीला मी नाहीं ह्मटल्याबरोबर त्याची कंबरच खचली, अन् तोंड चिमणीसारखें केलें. मग मला बोवा दया आली. णाणि चंद्रपुराच्या राजास जिवंत धरून आणतों ह्मणून जो प्रतिज्ञा करून निघालों, तो आपले घरीं जाऊन तिसऱ्या मजल्यावर आंधारांत लेप गुरगुटून हा वेळपर्यंत निजलों होतों. अजून सुद्धां ती अंगांतली वीरश्री गेली नाहीं, हें पहा आंग कुड् कुड् कुड् करतें आहे.

सू०—शाबास! एकून अजून लढाईला प्रारंभ नाहीं तोंच तुला थंडी भरून आली, मग चंद्रपुराच्या राजास जिवंत कसा धरणार ?

वि०—छेबा, तसें कांहीं नाहीं, मी आपला. मी कधीं बोललों चंद्रपुरच्या राजास धरीन ह्मणून ? पण

कांहो ? लढाई झालीच नाहीं का अजून ? आणि सेनापतीच्या कचेरींत बेत ठरून हत्तीदरवाज्याकडे सर्व गेले ते ? मी आपला दोन घटका लेपांत जाऊन बसलों आणि तितक्या वेळांत लढाई चिढाई झालीही असेल ह्मणून आतां बाहेर आलों, एकून लढाई व्हायची आहे अजून ?

सू०—अरे, सांगतों श्रवण कर. सेनापतीचा कचेरींत सर्व बेत ठरून सर्व मंडळी बंदोबस्तास गेली, आणि सेनापती राजवाड्यांत गेले हें तर तूं पाहिलेंस?

वि०—हो, हें येथपर्यंत मी पाहिलें, पण पुढें ?

सू०—मग सेनापती राजवाड्यांत जाऊन त्यानें राजा व इतर मंडळीस झालेली हकिकत सांगून व त्यांना सावध रहाण्याविषयीं इशारा करून आपण हत्ती दरवाज्यावर बंदोबस्तास गेला. तेथें आतां सर्व प्रकारें लढाईची कडेकोट तयारी झाली आहे. तिकडें चंद्रपुराचा राजाहि आपल्या सर्व सेनेसहवर्तमान तयार आहे, आणि आतां उभयपक्षीं रंजूक झडून महा अनर्थ होणार आहे. ईश्वर करो आणि आपल्या प्रभूस जय येवो ह्मणजे झालें. आतां मीही तिकडे जाण्यासच निघालों आहें, तूं येत असलास तर चल मजबरोबर.

वि०—आपण नाहीं हो बुवा. ( कानावर हात ठेवून ) आपण आतां तिकडे कशास यानें ? आतां आह्मी शयनं च मे करणार.

सु०—बरें, तूं जर तिकडे येत नाहींस, तर चमत्कार तुला येथंच दाखवितों, अवलोकन कर.

( असें म्हणून निघून जातात. )

---

## प्रवेश ३.

### स्थळः—चंद्रकांत राजाचा डेरा.

### पात्रें.

**चंद्रकांत**....................चंद्रपुरीचा राजा.
**सिंहबल** ....................त्याचा प्रधान.
**धैर्यशील**....................सेनापती.
**हनमंतसिंग**..................जमादार.
**हुकमतसिंग**..................हवालदार.
**रणछोडराय**..................सुभेदार.
**विदूषक** ....................मनरंजन करणारा.

**( चोपदार, भालदार** वगैरे. )

**सिं०**—( चंद्रकांत महाराज बसले आहेत असें पाहून ) सरकार मीं सिंहबल वंदन करतों.

**चं०**—शाबास सिंहबला! कल्याण असो. कसें काय? शत्रूकडील सर्व मान कसें काय? त्यांचा तर मोठा कडेकोट बंदोबस्त दिसतो; शिवाय त्यांचे जवळ फौज आपल्यापेक्षांही तिप्पट दिसत आहे.

**सिं०**—खरी गोष्ट महाराज, आज सकाळपासून पहात आहां कीं, अशी लढाई माझ्या व किंबहुना आपल्याही आठवणींत झाली नसेल, अशी झाली. प-

रंतु शेवटीं संध्याकाळीं यशाचा झेंडा तिकडेसच लागला. फुकट आपले चाळिस हजार पायदळ, तीन हजार घोडेस्वार आणि सत्याण्णव तोफा यांचा मात्र नाश झाला. कसेंही झालें तरी त्यांच्याकडे आपल्यापेक्षां चौपट फौजेचा भरणा आहे, आणि आपण वास्तविक निर्बळ, तेव्हां कसा टिकाव लागतो ? एरवीं आपले लोक आहेत तितकेच केवळ निवडक व शूर आहेत, परंतु करतात काय? सकाळपासून अस्तमानपर्यंत इतका जरी आपला मोड झाला, तरी एक मनुष्य देखील आपली पाठ दाखवून पळाला नाहीं. तसेच दम धरून निकरानें लढून मेले.

चं०—मग पुढें विचार काय ? सेनापतीला तरी बोलावून पाठवा; आणि त्याबरोबर जमादार, सुभेदार वगैरे मंडळीसही विचारास बोलवा. ह्मणजे काय तो एक निश्चय करतां येईल; नाहीं तर मग शत्रूस पाठ दाखविण्याचा प्रसंग कपाळीं येईल !

सि०—खरी गोष्ट. आज्ञेप्रमाणें सर्वांस बोलावणें धाडतों. ( असें ह्मणून जासुदास सर्वांचे डेऱ्यांत पाठवितो. नंतर प्रधान आणि चंद्रकांत बोलत बसले आहेत तोंच सर्व मंडळी येतात. )

धैर्य०—वंदन करतों महाराज.

चं०—कल्याण. धैर्यशिला बसावें. ( नंतर सर्व मंडळी सरकार वंदन करतों महाराज वंदन करतों असें ह्मणून खालीं बसली. )

सिं०—पाहिलें का सरकार ? आज सेनापतीचें मुख तर पहा, काय श्रमानें निस्तेज झालें आहे !

चं०—हें काय विचारावें प्रधानजी! आज सर्व लढाईचे श्रम काय ते यांचेच माथीं. आणि आजच्या तडाक्यांत हाच होता ह्मणून कांहीं आपण अजून या जाग्यावर आहोंत; नाहीं तर एव्हांना रामघाट ओलांडून जाणें झालें असतें. असो. ( धैर्यशिलाकडे वळून ) धैर्यशिला, आतां पुढें काय तजवीज ? आपला टिकाव लागेल का ? कारण एक चतुर्थांश नाश तर आजच झाला, शत्रूकडील दम तर चौपट दिसतो आहे, तेव्हां विचार ?

धैर्य०—सरकार, आपण अगदीं याविषयीं काळजी करूं नका. आज जग पूर्वींच माझी मसलत चुकली, नाहीं तर आजच शृंगारपुरीचा राज्याभिषेक आपणास केला असता. असो, त्यांचे चौपट सैन्य आहे, आणि माझें एक पट आहे तरी सरकार उद्यां चमत्कार पहाल काय होतो तो.

हन०—आजी काहेकू फिकिर सरकार करतेहो ? ( हात जोडून ) ससूरकी मगदूर क्या, मेरी समसेर क्या सोईहै ? कल देखलेउंगा सालेकू कैसा शौर्यसागर और वीर्यसागर.

हुकमत०—आजी काहेका शौर्यसागरले बैठेहै, जमादार, कल मेरे आघाडी आनदेव दुसमानकू. फेर मै देख लेताहूं, नहीं तो आबी सरकारनें होकम दि-

रंतु शेवटीं संध्याकाळीं यशाचा झेंडा तिकडेसच लागला. फुकट आपले चाळिस हजार पायदळ, तीन हजार घोडेस्वार आणि सत्याण्णव तोफा यांचा मात्र नाश झाला. कसेंही झालें तरी त्यांच्याकडे आपल्यापेक्षां चौपट फौजेचा भरणा आहे, आणि आपण वास्तविक निर्बळ, तेव्हां कसा टिकाव लागतो? एरवीं आपले लोक आहेत तितकेच केवळ निवडक व शूर आहेत, परंतु करतात काय? सकाळपासून अस्तमानपर्यंत इतका जरी आपला मोड झाला, तरी एक शिपाई देखील आपली पाठ दाखवून पळाला नाहीं. तसेच दम धरून निकरानें लढून मेले.

चं०—मग पुढें विचार काय? सेनापतीला तरी बोलावूं पाठवा; आणि त्याबरोबर जमादार, सुभेदार वगैरे मंडळीसही विचारास बोलवा. ह्मणजे काय तो एक निश्चय करतां येईल; नाहीं तर मग शत्रूस पाठ दाखविण्याचा प्रसंग कपाळीं येईल!

सि०—खरी गोष्ट. आज्ञेप्रमाणें सर्वांस बोलावणें धाडतों. (असें ह्मणून जासुदास सर्वांचे डेऱ्यांत पाठवितो. नंतर प्रधान आणि चंद्रकांत बोलत बसले आहेत तोंच सर्व मंडळी येतात.)

धैर्य०—वंदन करतों महाराज.

चं०—कल्याण. धैर्यशिला बसावें. (नंतर सर्व मंडळी सरकार वंदन करतों महाराज वंदन करतों असें ह्मणून खालीं बसली.)

सिं०—पाहिलें का सरकार ? आज सेनापतीचें मुख तर पहा, काय श्रमानें निस्तेज झालें आहे !

चं०—हें काय विचारावें प्रधानजी! आज सर्व लढाईचे श्रम काय ते यांचेच माथीं. आणि आजच्या तडाक्यांत हाच होता ह्मणून कांहीं आपण अजून या जाग्यावर आहोंत; नाहीं तर एव्हांना रामघाट ओलांडून जाणें झालें असतें. असो. ( धैर्यशिलाकडे वळून ) धैर्यशिला, आतां पुढें काय तजवीज ? आपला टिकाव लागेल का ? कारण एक चतुर्थांश नाश तर आजच झाला, शत्रूकडील दम तर चौपट दिसतो आहे, तेव्हां विचार ?

धैर्य०—सरकार, आपण अगदीं याविषयीं काळजी करूं नका. आज जरा पूर्वींच माझी मसलत चुकली, नाहीं तर आजच शृंगारपुरीचा राज्याभिषेक आपणास केला असता. असो, त्यांचें चौपट सैन्य आहे, आणि माझें एक पट आहे तरी सरकार उद्यां चमत्कार पहाल काय होतो तो.

हन०—आजी काहेकूं फिकिर सरकार करतेहो ? ( हात जोडून ) ससुरकी मगदूर क्या, मेरी समसेर क्या सोईहै ? कल देखलेउंगा सालेकूं कैसा शौर्यसागर और वीर्यसागर.

हुकमत०—आजी काहेका शौर्यसागरले बैठेहै, जमादार, कल मेरे आघाडी आनदेव दुसमानकूं. फेर मै देख लेताहूं, नहीं तो आजी सरकारनें होकम दि-

या तो, आभी शृंगारपूरकूं बत्ती लगा देताहूं. (चवताकून ) ए लेंडीकू तुमारी समसेर काहेकू नंगी करतेहो. कल देखलेव, कैसा तमासा उडा देताहूं. मेरे आगे आना चाहिये, फेर शौर्यसागर और कौर्यसागरकी ( तरवार उगारून ) कत्तल उडा देताहूं. क्या बोलत हो ?

सिं०-नहीं हवलदारसाब, ए बात सच्ची. लेकिन, महाराजका दिल बहोत घबरागया है उसवास्ते जरा आछा बिचार करना चाहिये.

रण०-( मध्येंच तोंड घालून ) नहि एमा शूं मेरी बात सांभळो. दुसमान पछी गयो, एमा शूं थाय. ए बात जुदी. आपने शूं. कोइबी वखारे आपेच एने आपूं बिजोशूं. ( इतक्यांत विदूषक हळूच शिरकाव करून आंत येतो. )

वि०-शाहावारे वा ! काय मराठी दरबारर आहे! सुभेदार साब, तुह्मी हुंडीचें दुकान सोडून, ही तरवारबहादरी कव्हांपासून मिळविली ? एकून मराठी राज्यांत वशीला असला ह्मणजे झालें. त्यास हवी ती हुद्याची जागा मिळते. पल्टणीचे सरसुभेदार झालांत पण तरवार तरी धरतां येते काय ? पुढें यावरून कवायतींत तर अगदीं हुशारच असाल. फुकटचीं नांवें मात्र धैर्यशील आणि सिंहबल, पण हातानें मांजरसुद्धां धरवणार नाहीं. (मनाशींच) एकून मांझेंच दैव फुटकें म्हणायचें. पूर्वी भुवनपाल राजाकडे

कांहीं लोक हुशार असतील ह्मणून त्यांचेकडे मदतीस गेलों पण तिथें काय ? शत्रु हत्तीदरवाज्यावर आले तेव्हां मग शिपाई लोक तरवारी पाहूं लागले. कोणी घोडे कोठें चरतात म्हणून पाहूं लागले. असे हुशार बरें, इकडे आलों तर इकडे अगदीं कडेकोट सर्वच शिकलेले ! मघां पहाना, चंद्रकांत राजाचा आणि प्रधानादिकांचे कोणत्या प्रसंगाचें बोलणें, आणि त्यांत हे रणछोडराय, एमोशूं एमोशूं करीत होते. तेव्हां पलटणीचे सुभेदार काय उपयोगीं ? मुख्य सुभेदारच असे, तर मग पलटण किती हुशार असेल ! अरे राम ! यापेक्षां इंग्रजी बरी, एकसुद्धां लोक कवायतीवांचून नुमता शोभेला ठेवणार नाहींत. असो, आपलें काय जातें ? आपण मौज पहाण्याचे धनी. ( उघड ) सुभेदारसाव, राग येऊं देऊं नका. मी आपला थट्टेनें बोललों. नाहीं तर चंद्रकांताचे राशतींत आपल्यासारखे शूर दुसरे कोणीच नाहींत. ( असें ह्मणत लपून बसतो.)

सिं०–सरकार, आतां मी एक पोक्त सल्ला काढला आहे, आणि त्या विचारानें कार्य फत्ते होईल यांत संशय नाहीं. एरवीं समोर लढाई देऊन ह्मणजे आपण जय मिळवूं असा रंग आतां राहिला नाहीं. कारण आपला किती दम होता तो शत्रूस समजला. आतां उपयोग नाहीं. तो रंग पहिल्या तडाक्यातच उडाला असता तर असता; आतां साधन नाहीं. ह्म-

णून मी जी युक्ती काढली आहे, तिनेंच घर घ्यावें. धर्मशास्त्रांत तरी साम, दाम, दंड आणि भेद, असे चार मार्ग सांगितले आहेतच कीं नाहीं ? त्यांतलाच एक मार्ग मी योजला आहे.

चं०-प्रधानजी, कोणता मार्ग योजिला आहे तो सांगा पाहूं. तुमची बुद्धि मोठी खोल आहे, आणि मसलत अशी तुह्मीच योजावी.

ब०-हो, हो, तें खरें सरकार. मागें तरी सुंदरपुरीच्या लढाईंत प्रधानजींचीच युक्ती उपयोगीं पडली.

हन०-हो, अशी कांहीं युक्ती असेल निकालना, नहीं तो हाम समशेर लेके तयार खडे हैच है. और क्या?

हुक०-आजी काहेकू उगत और बिचार. कल कत्तल कर देताहूं सबकी, उसमे है क्या. उसकू आनेतो देव आघाडी, फेर मेरीबी हात चलाखी देखो.

चं०-आजी हुकमतसिंग, तुमारी बात बहोत मिठी लगती है, लेकिन क्या करना, दुसमानकी तयारी आपनेसें बडी जादी है, और ए आंदरसें और गांवकोसपरसें, मार छोडते है, आपनेकू ह्या कुच आडोसिकी जागा नहीं. और मेरी बात सुनो ? आप आपने जागा छोडके ह्या आये है, ए कारणसे आपना दम जग कमती हुवा है. और दुसमान आपने जगापर खडा है, उसवास्ते उनका दम जबर दिखता है. इतना है तोबी आप कुइ डरनेवाले नहीं, लेकिन प्रधा-

नजीकी उगत कुच सबके मनमे आई, तो उस रस्तेसे करना, ऐसा मेरा विचार है. और ए कुच नहीं हुवा तो बडी फजर सब भरोसा तुमारे उपरच है.

हुक०–(हात जोडून) आछा खावंद. मै क्या हो-कमकाबंदा है और ए शीर सरकारके पावपर रखाहै चाहे मारो और तारो.

चं०– हं प्रधानजी बोला पाहूं, काय विचार यो-जिला आहे ? रात्र फार होत आली.

सिं०–महाराज, संकट येऊन शत्रूस पाठ दाखवू-न जाण्यापेक्षां मतलबानें एखादी गोष्ट साध्य करून घ्यावी हेंच योग्य. आणि शास्त्रही या प्रकारास अनुमोदन देतें कीं, असाध्य गोष्टीस साम, दाम, दंड, भेद करून साध्य करून घ्यावी. आतां हें जर प्रा-यः खरें आहे, तर प्रस्तुत आलेल्या संकटास भेदच करून निवारण करावें हें रास्त आहे. कारण भुवन-पाल राज्याची सैन्यसंपत्ती फार उत्तम आहे व त्यां-च्या मंडळीची जूटही अति उत्कृष्ट आहे; तेव्हां भे-द केल्यावांचून कार्यसिद्धि होणार नाहीं. इतक्यावर सर्वांचा व आपला हुकूम होईल तसें.

चंद्र०–ठीक आहे. प्रधानजी हाच विचार योग्य. कां धैर्यशीला, तुझें मत कसें ?

धै०–माझें मत काय आपला हुकूम होईल तसें. आपण मसलतीनें कार्यसिद्धि करा अगर आमचे हात

ह्मणाल तर आम्हीं गार्दीचे बंदे आहोंत, शीर हाता-वर घेऊनच आहोंत.

ह०–आजी काहेकू मतलब और गतलब. हमारा तो समसेर बिनाकुच मतलब नही. केव होकमतसिंग ? ( मिशांवर ताव देतो. )

होक०–जी जमादार. क्या बोलताहो? सरकारके आगे कुच बंदेका चलता नही. नही तो मतलब बि-तलब ( तरवार उपसून ) ए देखौ. होकम हुवा तो आबी घंटेमे [ अर्धेच बोलून.]

रण०–शूं मतलब शूं बोलेच, महाराजानें आवे कह्यां, शूं समसेरनें काम छे.?

चंद्र०–प्रधानजी, त्यांचें हें बोलणें आणि विचार कांहीं उपयोगी नाहींत, सर्व हुकुमाचे नौकर. दूरवर पाहणें ही आपणास काळजी. कोणता आणि कसा भेद करावा सांगा पाहूं ?

सिं०–ती मी सर्व तयारी केली आहे. आपण हूं म्हणा ह्मणजे झालें.

चंद्र०–अहो माझा हूं तर आहेच. आणि मी तु-मच्या बाहेर नाहीं. पण कसा घाट केला आहे हें तर कळूं द्या.

सिं०–विचार असा केला आहे, त्यांचे मंडळींत सर्व जण तर हुशार, शूर व शहाणे आहेतच ; पण त्या सर्वांत बहादरसिंगासारखा शूर व भुवनपालाचे कृपेंतील विश्वासू असा दुसरा कोणी मनुष्य नाहीं.

ह्मणून त्यासच मीं आपलासा केला आहे. आणि जर हें राज्य हस्तगत करून देशील, तर तेवीस लक्षांची तुला जाहगिरी देऊं, असें मी कबूल केलें आहे. नंतर त्यानें युक्ति सांगितली, “ कीं उद्यां हत्तीदरवाज्यावर सर्व आमचे लोक लढाईस येणार आहेत, वरकड सर्वे दरवाजे व राजवाडा, भोंवतालचा गांवकोस व शहरांतील सर्व बंदोबस्ताचें काम मजवर सोंपविलें आहे. हत्तीदरवाजावर तुमची त्यांची लढाई सुरू झाली कीं पंचवीस हजार फौजेसुद्धां तुम्ही विलासदरवाजानें खुशाल शहरांत या. मी तुम्हास अटकाव करणार नाहीं. नंतर प्रथम राजवाड्यावर हल्ला करा, म्हणजे भुवनपालसुद्धां हस्तगत होईल. झालें, हें काम करतेवेळीं वरकांती मात्र मीं लढेन, परंतु आंतून तुमची मदत करीन. राजा हस्तगत झाल्यावर बहुधा सर्व दाणादाण होईलच. कदाचित शौर्यसागर कांहीं कमी जास्ती करील, तर मी एक लाख फौजेसुद्धां तुमच्या पाठीस आहेंच, ” सरकार हें त्याचें भाषण ऐकून मी नुमती सनद तेवीस लक्षांची त्यास लिहून दिली आहे आणि सांगितलें कीं, पुढें राज्य हस्तगत झालें, कीं लागलीच आमचे सरकार सनदेवर सहीशिक्का करून देतील.” महाराज, असा घाट करून ठेविला आहे. तेव्हां उद्यां धैर्यशील हत्तीदरवाजा संभाळील, आणि मी हें काम करीन.

चंद्र०—ठीक ठीक प्रधानजी, शाबास! याचें नांव

काम! चला तर देवाचें नांव. करा उद्यांची तयारी. ( इतक्यांत विदूषक येतो. )

वि०—वा ! प्रधानजींनीं खूप बाईल बुद्धि सांगितली. काय राव !! नांव तेवढें सिंहबल, आणि बल तर उंदराचें देखील नाहीं. वाहवा ! ( प्रधानाकडे पाहून ) शूर लोक अशीं बायकासारखीं राज्यें कमावतात काय ? सामर्थ्य असेल तर बाहुबळावर कमवावें, नाहीं तर तळ हातांत पाणी घेऊन जीव द्यावा. मी मघांपासून सर्व बेत ऐकिला आहे. हा पहा जातों आतां. भुवनपालास सांगून बहादरसिंगाचा पूर्वींच बंदोबस्त करतों. (जाऊं लागतो.)

सिं०—अरे कोण आहेरे ? याला अडकवून ठेवा उद्यांपर्यंत; नाहीं तर हा फितुरी मनुष्य आहे. झालेलें सर्व वर्तमान तिकडे जाऊन सांगेल. ( विदूषकास पहाऱ्यांत ठेवितात. )

चंद्र०—ठीक आहे. आतां मी अंमळ निजतों. रात्र फार झाली. तुह्मी सर्वांनीं ( मंडळीकडे पाहून ) प्रधानजींनीं विचार केला आहे. त्याप्रमाणें मदत ठेवावी आणि शृंगारपुरीवर उद्यां आपला यशाचा झेंडा चढवावा ! इतक्यांत ( दसघडी बजगई ग्याराका अमल है महाराज. [ घड्याळवाला पुकारतो. ] ( नंतर सर्व मंडळी मुजरे करून आपापल्या डेऱ्यांत जातात. )

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

वि०–( कण्हत व कुंथत ) आग आईग ! अरे देवा !! ( लंगडत ) आतां काय करूं ?

सू०–अरे कोण आहे तें ? कोण ? विदूषका, तूं आहेस कां ? कारे, असा कण्हत कुंथत विव्हळतोस कां ? कोठें मार मिळाला कीं काय ?

वि०–महाराज, नमस्कार असो तुह्माला. हा तुमच्याच संगतीचा प्रकाश. पूर्वीं वाटलें कीं, तुमचे संगतीनें कांहीं लाभ होईल, पण हा एवढा मात्र लाभ झाला. " अरे देवा ! आतां हा पाय कसा नीट होतो ? पाठीवर हळदचोळ तरी कोण घालील ?

सू०–अरे पण झालें काय ? त्या सपाट्यांतून वांचून आलास एवढाच लाभ समज. फार वेळ ह्मणत होतास, " कीं आपल्याला नको असें सर्व बायकांचें नाटक. आह्मी आपले जातों, कांहीं धडाधडी नाहीं, फडाफडी नाहीं, सर्व अळणी अळणी. " घे आतां. ठीक झालें कीं नाहीं ? पूर्वीं चांगले यज्ञांत लाडू खात होतास ते तुला आवडलेत नाहींत. आतां ठीक आहेना ? तरी पूर्वीं मी सांगत होतों, लढाईच्या गोष्टी दुरून कानानींच ऐकाव्यात, पण ऐकतों कोण? आतां पाय मोडला, विव्हळ सावकास; आमचें काय गेलें ? ज्याचें तो फळ भोगतो.

वि०–( मोठ्यानें दोन्ही पायांवर उडी मारून ) सूत्रधार, मी का लंगडा झालों कीं काय ? अहो अ-

शा सत्तावीस लढाया जिंकल्या आहेत,' हें पहा सर्टिफिकिट. तुमच्या मनांत हात पाय मोडून आलों असेन ? पण हा अस्मादिक समुद्रांत गेला तरी कोरडा निघणार. बरें असो, आतां काहो ? सूत्रधार, कशी काय हाकिकत झाली ? शृंगारपुरीची अगदीं दुर्दशा झाली ह्मणून ऐकतों.

सू०—अरे दुर्दशा ह्मणजे काय, तुला नाहीं कां माहित ? मग तूं कोठें होतास तर मग इतका वेळ ?

वि०—छेहो, मी नव्हतों ह्मणून तर खरें, मी उगच चंद्रकांत राजाकडील कसा काय थाट आहे तो एकदां जाऊन पहावा ह्मणून आदल्या दिवशीं रात्रीं त्यांचे डेऱ्यांत जाऊन लपून बसलों होतों. तेव्हां आपल्या बहादरसिंगास फितवलें वगैरे सर्व मजकूर प्रधानांनीं राजास सांगितला, मी लपून बसलों होतों तरी मला वाईट वाटून मी त्यांचे समोर जाऊन उभा राहिलों, आणि त्यांच्या तोंडावर त्यांची निंदा करून सांगितलें कीं, मी हा मजकूर आतां भुवनपाल राजास जाऊन सांगतों आणि बहादरसिंगाचा पूर्वीच बंदोबस्त करतों. असें ह्मटल्याबरोबर त्यांनीं मला धरून बंदींत ठेवलें. नंतर आज तीन दिवस हातापायां पडतां पडतां आज मोकळा झालों. पुरे, गांवांत जावें तर जिकडे तिकडे धराधरी आणि मारामारी, चहूंकडे गडबडच. तेव्हां कोठें जावें अशा विचारांत गुंग झालों तों इतक्यांत आपली भेट झाली.

सू०—( कपाळास हात लावून ) अरे द्वाडा ! ! लपून बसून असा मजकूर ऐकला होतास ? तर मुक्काम्यानेंच तेथून उठून गांवांत यायचें होतेंस, आणि अगोदर प्रधानास व राजास तो मजकूर सांगितला असता, तर बहादूरसिंगाचा मुद्दलच बंदोबस्त झाला असता; आणि तुला या कामाबद्दल चांगलें बक्षीस मिळालें असतें. अरेरे ! घालविलीस मसलत. त्या बहादूरसिंगानेंच एवढा घात केला ! !

वि०—काय घात झाला ? कसें काय झालें ? हो सांगा एकदां.

सू०—सांगा काय? "मूर्खापुढें वाचली गीता !" तुला कांहींच ज्ञान नाहीं. मग काय सांगा ?

वि०—नाहीं सूत्रधार, तुमच्या पायां पडतों. एकदां सांगा.

सू०—अरे ही गोष्ट कांहीं खरोखर नाहीं झाली. नाटकरूपानें या रंगमंडपीं मींच हें सर्व करून दाखविलें. आणि सांगा काय ? नीट शुद्धीवर ये. आपण काय करतों आहोंत ?

वि०—हो, हो, तुह्मी आणि मी दोघेंही हें चरित्र कल्पित करून दाखवितों आहों, आणि सर्व सभासद पाहताहेत, खरी गोष्ट.

वि०—पण काहो ? यांहीं भागांत हंसपालिका कोठें दृष्टि पडली नाहीं अजून ?

सु०—अरे, इतका वेळ हंसपालिकेचे नादानें तरी

तूं चांगली मदत करावीस, ह्मणून तसेंच सांगत केली पण आतां मात्र—तिसऱ्या भागांत तुला हंसपालिका खचित दाखवितों इतका वेळ झाला हा पहिला आणि दुसरा भाग झाला. त्यापैकीं प्रथम भाग सर्व तुझ्या ध्यानांत असेलच, आणि दुसऱ्या भागांत शेवटीं बहादरसिंग फितूर होऊन शत्रूच्या प्रधानास वाड्यावर जाण्यास वाट देणार वगैरे मतलब तूं ऐकिलाच आहेस. पुढें काय झालें तें थोडक्यांत सांगतों श्रवण कर.

"दुसरे दिवशीं खरोखरीच सिंहबल शहरांत शिरून प्रथम राजवाड्यावर हल्ला केला. त्या वेळीं सर्व शहरांत गडबड होऊन गेली. जो तो एकमेकास मारीत सुटला, चहूंकडेस पळापळी झाली; घरोघर दरवाजे बंद झाले, रस्त्यानें मारामारीशीं गांठ. भर दोन प्रहर दिवस आलेला, लोकांनीं मारलें ह्मणून राजाकडेस शरण जावें तों तेथें पूर्वीच बहादरसिंगानें सर्व शिपाई फितवलेले. मग काय विचारतोस? सर्व शहरांत हलकल्होळ झाला.

वाड्यांत गडबड झाल्याबरोबर भुवनपालही महालांतून पाहूं लागला, तो सर्व शहरांत मुडद्याशीं गांठ! चहूंकडे भयाण दिसूं लागलें. हत्तीदरवाजावर तर अगदीं कहरच गुदरला. हजारो हत्ती मले, लक्षावधी फौजेचा अगदीं चुराडा झाला. तोफांचा धूर अष्टदिशास अगदीं भरून गेला आहे असें पाहिलें." विदूषका, अशी वेळ कधींच कोणाचे दृष्टी पडली

नसेल. याप्रमाणें बहादरसिंगानें फितूर करून चंद्रकांत राजाचा यशाचा झेंडा शृंगारपुरीवर लाविला आणि भुवनपाल स्त्रीसहवर्तमान कोठें नाहींसे झाले याचा पत्ता नाहीं. तसेच शौर्यसागर वगैरे सर्व मुत्सद्दी मंडळी कोठें नाहींशी झाली याचाही ठिकाण नाहीं. विदूषका, याप्रमाणें दुसऱ्या भागांत चरित्र झालें.

वि०—सूत्रधार, अरेरे! काय हें सांगितलेंत? एकून शृंगारपुरीचें राज्य चंद्रकांतानें घेतलेन? अरे राम राम राम! भुवनपालावर केवढा हा प्रसंग!!! सूत्रधार, पुढें काय झालें, आणि हंसपालिका कशी दृष्टीस पडणार, हें चरित्र करून दाखवानात? अजून रात्र फार आहे. मी तर अगदीं आनंदानें तुह्मास मदत करीन. कारण मला फार चटकाच लागला आहे. मलाच काय सर्व सभासदांची सुद्धां हंसपालिका दृष्टि पडण्याविषयीं उत्कंठा आहे.

सू०—ठीक आहे. विदूषका, मी आतां तिसरा भाग दाखवितों. तूं मात्र कंटाळूं नकोस. (असें ह्मणून निघून जातात.)

दुसरा भाग समाप्त.

# भाग ३.

## प्रवेश १.

### स्थळ–मोहनबाग.

### पात्रें.

भुवनपाल.........................राजा.
भुवनसुंदरी......................राणी.
हंसपालिका....................प्रासादिक कन्या.

भुवन०सु०–प्राणनाथ, सूर्य माध्यान्हास आला, आतां तरी क्षणभर कोठें विश्रांती घ्या येऊं द्या त्या मेल्यांना, आले तरी जीवच घेतीलना ? घेऊंद्या एकदां. म्हणजे यांतून सुटलों तरी, मागून येतील, मागून येतील या धाकानें आतां किती पळ काढावा ? काल दोनप्रहरपासून, आज दोनप्रहरपर्यंत एकसारखें आपण मागें पाहत पुढें पळतों आहोंत, प्राणप्रिय, शेंपन्नासकोस शृंगारपुरी मागें राहिली असेल, आतां कशाचें भय ?

भु० पा०–सखे, भुवनसुंदरी, नाहींगे नाहीं. आपण सुमारें दहा पांच कोसच ह्या वेळपर्यंत आलों आहों, तेव्हां शत्रूपासून फार लांब आलों नाहींत. कदाचित् पाठलाग करीत आले तर ? या करतां निदान शेंपन्नास कोस तरी गेलें पाहिजे. ( जवळ पोटाशीं धरून ) प्रिये, तुला कधीं सूर्यकिरण माहीत नाहीं, व दहा पांच पावलें पादचारी चालण्याची सु-

ह्यां संवय नाहीं; तेव्हां अर्थातच शंभर कोस आलेंसें वाटतें.

भु० सु०—महाराज, शत्रू पाठलाग करीत आले तरी चिंता नाहीं. परंतु आतां माझ्यानें पुढें पाऊल टाकवत नाहीं. उन्हानें जीव घाबरा झाला, तृषेनें प्राण व्याकुल होतात, सर्वांगावर धूळ उडाली आहे, आतां दम धरवेना. ( राजाचे तोंडाकडे पाहून ) माझें मेलें असो. पण आपली काय ही दशा ! ! मुखावर तीव्र उन्हानें लाली आली आहे, सर्वांगास घर्मानें स्नान झालें आहे, नको, नको, महाराज, आतां पळणें पुरें करा. आपले श्रम पाहून माझी काय अवस्था होत असेल याचा विचार करा. ती पहा, ती जवळच एक झाडी दिसते आहे, तेथें चला. ह्मणजे या कठोर हस्तानें ( पायाकडे किंचित पाहून ) आपल्या सकुमार पायांचीं थोडीशी सेवा करीन. मेले दुष्ट शत्रू मागून आले तर महाराज, एवढें मात्र करा कीं, ( हात जोडून ) अगोदर सौभाग्यवती मला जाऊं द्या. आणि नंतर पुढें ईश्वराची इच्छा.

भु० पा०—मृगनयने, तुझ्या कोमल शब्दानें माझें अंतःकरण दुःखी असतांही आनंदीत होतें. अहाहा ! तुजसारखी रूपानें आणि गुणानें उत्तम स्त्री मला पुनः मिळेल काय? (तोंडावर हात फिरवून) सखे, कसेंही संकट आलें तरी ( पोटाशीं धरून ) माझे आवडतीस मी सोडीन काय ? तुजसारखी प्रिय वस्तु या जगां-

त मला दुसरी नाहीं. किंबहुना प्राणसुद्धां तुजपुढें तुच्छ आहेत. शाबास! तुझ्या पातिव्रत्यानें तुझें कल्याण होईल. धीर सोडूं नकोस. मी तरी इतकी पळण्याची तसदी तुला दिली नसती, परंतु बिनहत्यारी असल्यामुळें थोडी काळजी वाटते. असो, कसाही प्रसंग आला तरी प्राण आहेत तोंपर्यंत तुझ्या केसास धक्का लागूं देणार नाहीं; स्वस्थ हो. आणि हळू हळू ती समोर झाडी दिसत आहे तेथें जाऊन विसावा घेऊं चल.

**भु० सुं०**—ठीक आहे प्राणनाथ, माझाही हेतू तसाच आहे.

( दोघेही चालूं लागतात. )

**भु० पा०**—अगे भुवनसुंदरी, हे पहा आपण आतां माडींत शिरलों, आतां कसें गार वाटतें तें ?

**भु० सुं०**—होय, मलाही अगदीं थंड वाटत आहे. अहाहा ! ज्यानें हें स्थळ बांधलें असेल त्याचें कल्याण होवो.

**भु० पा०**—ये इकडे, माझ्या मागून येहो.

**भु० सुं०**—होय. ही आलें पहा. ( एकमेकांचा हात धरतात ).

**भु० पा०**—प्रिये, पाहिलीस का किती झाडी दाट आहे ? असें वन माझे कधींच पाहण्यांत नाहीं. हे आम्रवृक्ष पहा किती उंच आणि विस्तीर्णपणें पसरले आहेत! ह्या जांभळी, पेरु पहा, ह्या सिताफळी, त्याचे

पलिकडेच रामफळी, आणि ह्या उजव्या हाताकडेस सहस्त्रावधी केळी पहा, काय एक जात लाविल्या आहेत !

भु० सुं०—पण महाराज, तें झाड कशाचें ? अग बाई ! असें झाड नव्हतें मी पाहिलें. फळें तरी केवढालीं आहेत ! त्याचें नांव काय सरकार ? [बोटानें दाखविते. ]

भु० पा०—हा वेडे ! शेंकडो वेळ तें फळ खाल्लें असशील ! पण नांव नाहींना ध्यानांत ? तें पपूनस नव्हे कां ?

भु० सुं०—हो, हो. खरें, मी बाई नांवच विसरतें.

भु० पा०—तें असूंदे. पण हीं तुझ्या डाव्या हाताकडेच लहान असून ओळीनेंच झाडें लाविलीं आहेत ह्यांचीं नांवें काय ?

भु० सुं०—खरेंच कीं हो प्राणनाथ, हीं झाडें मोठीं गंमतीचीं दिसतात. आणि फळें तरी काय शानदार आहेत ! एकूण हीं फळें पाहण्यासारखीं खरीं. नाहीं तर मेलीं मघांचीं ! काय मेलीं हिडिस्स् ! फार मोठीं फळें शोभत नाहींत. प्राणनाथ रंग तरी काय ! थेट माझ्या काचोळीसारखाच आहे.

भु० पा०—खरीच हीं पहा [ दोन फळें तोडून ] हीं दोन फळें आणि तुजजवळील दोन अगदीं [हृदयाजवळ नेऊन] सारखींच दिसतात. तीं तरी तांबडीं काचोळीवर असल्यामुळें हुबेहूब नारिंगेंच दिसतात.

भु० सुं०—अहाहा ! काय तरी पण ! [राजाच्या हातास पलीकडे करून ] अगदीं वेडच लागलें दिवसेंदिवस. खऱ्या भावानें विचारलें तरी थट्टाच मेली !

भु० पा०—अग, थट्टा कसली यांत ? तुझे अवयवच तसे रेखले आहेत.

भु० सुं०—बर हों पण, आपले माझे असूंद्या रेखलेले. तुझाला काय करायचें आहे त्यांच्याशीं ?

भु० पा०-मला काय करायचें आहे ? तुझे अवयव तुलाच लखलाभ असूंदे. पण तूं मात्र मला हवीस.

भु० सुं०—माझे अवयव तुह्मास नकोत ? मग मी तरी कशास व्हावी ? आतां मात्र माझ्या अवयवांस कधीं हात लावाल तर संभाळून असा.

भु० पा०—हा वेडे ! आला का रागोपंत पुनः ? [ जवळ घेऊन ! ] तूं पाहिजे ह्मटलें म्हणजे तुझे अवयव नाहीं का आले त्यांत ! अवयव आणि तूं दोन आहांत का ? नाहीं. तूंही माझी आणि तुझे सर्व अवयवही माझेच आहेत. ( समजवितात. ) जरा कांहीं बोललें कीं लागलीच गाई पाण्यावर आल्याच! उगी, हें काय!(आपल्या शेल्यानें तिचे डोळे पुसून)असें भलतेंच मनांत समजून दुःखी व्हावें हें काय ? हेंच कां तें शहाणपण ! आतां पुनः नाहीं असें बोलणार. झालें, आतां गेलाना राग ?

भु० सुं०—( गालांत हंसून ) आला होता कधीं तो गेला?

भु० पा०—बरें तर, आतां थोडे अंजीर, द्राक्षें, नारिंगें हीं घेऊन त्या पलिकडील कारंज्यावर जाऊं येतेस का ?

भु० सुं०—हो. आपल्याला क्षुधा लागली असेल; पण बाई बोलावं कोणी ? माझा मात्र तीळ तीळ जीव तुटतो आहे. पण इकडे कोठें आहे ध्यानीं मनीं!

भु० पा०—हीं पहा, हीं शेल्यांत आपल्या दोघांपुरतीं फळें घेतलीं. चल आतां पाण्याजवळ जाऊं.

भु० सुं०—महाराज, मला वाटतें त्या मधल्या संगमरवरी कारंज्यावर जावें. तेथें पाहिली का काय मौज दिसते आहे ? सहस्रधारा किती बाई उंच पडतात ह्या ! अहाहा ! आपला विलासबागही यापुढें तुच्छ आहे सरकार.

भु० पा०—अग कसचा विलासबाग ह्यापुढें ! आतां भर दोन प्रहर झाले आहेत. परंतु येथें हिंवाळ्यासारखी थंडी वाजत आहे. आणि जागोजागीं कारंजीं उडत असल्यानें, केवळ पावसाळ्याचाच भास होतो आहे. ते पहा, ते कारंज्याजवळ मोर कसे आनंदानें नाचत आहेत ते. लांडोरी तर आनंदानें त्यांना आलिंगन देण्यास सिद्ध झाल्या आहेत. चहूंकडे सुगंध वायू दरवळून गेला आहे. हंस, चाप, बहिर, साळुंक्या, पोपट, भारद्वाज इत्यादि पक्षी आ-

नंदानें वृक्षावर बसले आहेत. कान दे, कालि-ला काय सुस्वर गायन करीत आहेत! अहाहा! प्रियसखे, केवळ नंदवनाचीच उपमा यास! या बागे-ची पूर्वी कीर्ति फार वेळ ऐकली होती. आपला सु-विचार प्रधानजी नेहमीं याची तारीफ करीत असे; आपल्या शृंगारपुरींत धनपाल ह्मणून जो सावकार आहे त्याचा हा बाग असें वाटतें. आणि याचें नांव ही मोहनबाग असें माझे ऐकण्यांत आहे. खरोखरींच बागेंत आलें ह्मणजे माणसास मोहनीच पडते. हा तयार झाला तेव्हां दोन तीन वेळ धन-पाळ मला विनंति करण्याकरतां आला होता कीं, "एकदां माझे बागेला पाय लागावेत" पण मी आज येऊं, उद्यां येऊं असेंच सांगितलें. असो, बागेंत आ-ल्याबरोबर आपल्या सर्व श्रमाचा परिहार झाला. प्रिये, आतां चला त्या कारंज्यावर फराळ करूं.

भु० सुं०—चला लवकर. ( असें ह्मणून दोघेही फराळ करावयास जातात. )

( फराळ झाल्यानंतर. )

भु० सुं०—सरकार, तें पाहिलें कां तुह्मीं? तें प-हा. येथें उंच उभें राहून पाहिलें ह्मणजे पलिकडे अगदीं गर्द एकसारखे अशोक वृक्ष लागले आहेत, आणि मधें मोठें विस्तीर्ण सरोवर दिसतें आहे. त्यांत कमळें तरी किती प्रफुल्लित झालीं आहेत! अहाहा!

महाराज, त्या गर्द छायेंत सरोवराचे कांठीं आपण स्वस्थ विश्रांती घेऊं चला.

भु० पा०—भुवनसुंदरी कोठें आहेग ती छाया ? ( उठून उभा राहून ) हं, हं. खरेंच, फारच रमणीय स्थळ आहे. चल आपण तिकडे जाऊं.

( दोघेही जातात. )

भु०सुं०—सरकार, मी म्हटलें तशी आहेना जागा?

भु०पा०—वा:!जागा काय फारच सुंदर आहे.पण ती एक गंमत पाहिली कां ? ( बोटानें दाखवितो. )

भु० सुं०—कुठें आहे हो ? हं, हं. पाहिलें. ती दाट वेलाचें घर असल्याप्रमाणें जागा झाली आहे ती?

भु० पा०—हो. त्या वेलाच्या घराजवळ शेकडों हंस पक्षी एका ठिकाणीं जमले आहेत, आणि जेवण करतात असें वाटतें.

भु० सुं०—खरेंच महाराज. एके ठिकाणीं कांहीं खाण्याचा पदार्थ ठेवून ते सर्वत्र खात आहेत असें वाटतें. चला, आपण तिकडे जाऊं येतां ?

भु० पा०—कशाला ? येथें बसून नाहीं कां दृष्टी पडत ?

भु० सुं०—पण तुह्मी नाहींना तिकडे येत ? नाहीं तर मला तरी रजा आहे कां ?

भु० पा०—हो. तूं जाऊन पहा जा. मी येथेंच बसतों.

भु० सुं०—बरें तर. मीच जातें. ( दोन तीन पाव-

लें पुढें जाऊन ) पण बाई मला भय वाटतें. ते मेले डसतील चिसतील नाहीं तर ! तुझी चलानात बरोबर.

भु० पा०—अग, मी अगदीं जवळ आहें. आणि तूं तरी त्यांचे जवळ जाऊं नकोस, लांबून पहा काय आहे तें ह्मणजे झालें.

भु० सुं०—बरें तर. मीच जातें. ( हंसपक्ष्यांजवळ जाऊन ) अहाहा ! ( मनांत ) कायग बाई रत्न हें ! वाः ! किती सुंदरपणा ! सुरेख आहे बरं कां. [टाळी वाजवून] अहाहा ! आंगावर रत्नखचित बाळ लेणीं घातलीं आहेत ! पण हें कन्यारत्न कोणा भाग्यवंताचें असावें? अहाहा ! पक्षी पहा, कोणी पंखानें छाया धरतात, कोणी चंचूनें अन्न मुखांत घालतात. दूध पाजितात. आणि शेकडों राजहंस पक्षी हिचें ममतेनें पालन करतात. वा:! काय आश्चर्य !! कोण भाग्यवंत माय इला व्याली असेल ? अहाहा ! कांति केवळ सुवर्णाप्रमाणें चमकत आहे. नेत्र किती पाणीदार आहेत ! शाबास! याचें नांव स्वरूप. नाहीं तर आह्मी जन्मास येऊन व्यर्थ. अहाहा ! बाळाचें हास्यवदन पाहून उचलून घ्यावेंसें वाटतें. अरेरे! माझ्या स्तनांतून दूधही येऊं लागलें. काय हा चमत्कार ! ! कसेंही असो, आतां प्राणनाथास हिकडे हाक मारून, या बाळास उचलून आणावें. अहाहा ! केव्हां पोटाशीं धरून चुंबन घेईन ? देवा ! असें सुख माझे प्रारब्धीं लिहिलेंच नाहींस कां ? (असें ह्मणून भुवनपालास हाक मारते.)

भु० पा०—(धांवत येऊन) कांगे घाबरलीस कां?

भु० सुं०—अहो घाबरलें नाहीं. पण त्या राजहंस पंक्तींत एक कन्यारत्न फारच उत्कृष्ट आहे, आणि हे सर्व हंसपक्षी तिचें ममतेनें पालन करीत आहेत. मला तें पाहून फार गहिंवर येतों आहे. एकवार त्या बाळकास मजजवळ द्याल तर माझी हौस मी पुरवून घेईन. प्राणनाथ, तुमच्या पायां पडतें. एकदां त्या कन्येस माझे जवळ द्या. पहा, माझे स्तनांत पान्हा माईना. द्याहो द्या.

भु०पा०—देतों. गडबड करूं नको. युक्तीनें काम केलें पाहिजे. हातचें कार्य जाईल. [ असें म्हणून हळूच जवळ जातो. नंतर मनांतच ] अहाहा! काय ईश्वरा, आम्हाकरतांच हें रत्न पाठविलेंस काय? मृत्युलोकीं असें रूप तर कोठें पाहण्यांत नाहीं. असें कन्यारत्न कोण माय टाकून गेली असावी? कोणास हें बाळ नकोसें झालें? अहाहा! मला या बाळाचें चुंबन मिळेल काय? माझे मनाची स्थिती अगदीं बदलून बाळ पाहतांच मोह उत्पन्न झाला. आतां कसें करूं? बरें, उचलून घेईन तर हे इतके राजहंस पक्षी तिचें संरक्षण करीत आहेत हे तिला उचलूं देतील काय? अहाहा! हें बाळ जर माझे हातीं आलें, तर जगदंबे तुझे आभार माझ्यानें फेडवणार नाहींत. आणि कोण जाणे, तसेंही तुझ्या मनांत नसेल कशावरून? पण मी खचीत सांगतों कीं,

जगदंबे, ही कन्या जर तुझ्या कृपेनें मिळाली तर दुसरें कांहीं नको. माझें राज्य गेल्याचाही तुजवर शब्द नाहीं; असो. आतां मी तर तुझ्या भरंवशावर बेलाशक ह्या पक्षी मंडळींत शिरतों. यश देणारीण तूं समर्थ आहेस. [ असें ह्मणून कन्या उचलून आणण्याकरतां जातो. ]

भु० सुं०—[ कन्या आली पाहून ] अहो द्या. मजवळ द्या. द्या लवकर.

भु० पा०—अग पण ! मला एक मुका तर घेऊंदे. [ मुके घेऊन ] चला ही घ्या तुह्माजवळ. [ भुवनपाल देतो आणि बाळ हंसत हंसत भुवनसुंदरीजवळ जातें. ]

भु० सुं०—या बेटा या. तुझी आई कुठ आहे ? [ जवळ घेऊन पदराखालीं थान पाजते डोळ्यावाटे आनंदाश्रू वहातात. आणि ह्मणते. ] जगदंबे, जयसुमंगले, हें बाळ मलाच दिलेंस काय ? अहाहा ! असें रत्न राज्यावर असतां दिलें असतेंस तर काय आनंद झाला असता आणि राज्य तरी कशास गेलें असतें ? प्राणनाथांचा जीव सुचीत नसल्यामुळें राज्यांत फितूरपणा झाला. आणि जीव सुचीत नसण्याचें कारण काय तें संततीच. ही जर पूर्वी दिली असतीस तर असें कां झालें असतें ? बरें, या रत्नास ( मुके घेऊन ) तरी काय मिजास मिळाली असती ! ( बाळाकडे पाहून ) बाळा, छकुड्या, आतां तुला रत्नख-

चीत पाळणा कोठून आणूं ? अहारे दैवा ! आमच्या बरोबर आतां आमच्या तान्हुल्यास दुःख काढावें लागेल. अरेरे ! एवढें मात्र दुःख वाटतें.

भु० पा०—प्राणप्रिये, तुला कां वेड लागलें कीं काय ? बाळाचें दैव काय आपण धुऊन पाहिलें आहे? तिच्या दैवानें पुनः राज्य मिळणार नाहीं कशावरून! आणि इच्या चिन्हावरून तर ही पृथ्वीची स्वामिणी होईल असें वाटतें. असो. आतां जगदंबेच्या कृपेनें एव्हढें रत्न आपणास पचो ह्मणजे झालें.

भु० सुं०—पचो ह्मणजे काय महाराज, ही काय भलतीच शंका ?

भु० पा०—अगे, शंका इतकीच कीं, ही लेंक कोणाची आहे कोणास ठाऊक ? एकादा आला आणि त्यानें माझीच ह्मटली तर ? मनुष्याची कन्या हंसपक्ष्यांनीं संरक्षण करण्याचें कारण काय ? पक्षांच्या स्वाधीन होऊन ह्या स्थळीं ही कशी आली ? कोणत्या जातीची आहे वगैरे सर्व खुलासा समजल्यावांचून हिचें आपण तरी पालन कसें करावें ही मोठी काळजी पडली आहे.

भु० सुं०—महाराज, हें रत्न कोणी माझें म्हणून जर बळेंच घेऊं लागेल तर मी कधीं देणार नाहीं. आणि हिचा माझा जर आतां वियोग झाला, तर मी आपले प्राण ठेवणार नाहीं. बरें, जातीविषयीं आपण म्हणतां, तर हें बाळ अजून अगदीं अज्ञान

आहे, आणि पक्षी संरक्षण करीत होते तेव्हां तें अगदीं शुद्ध आहे. एव्हांपासून आपण पाळणपोषण केल्यास जाती दोष बिलकूल नाहीं. खेरीज तुह्मी असा विचार करा कीं, बाळाचें तेज केवळ सुवर्णकांतीप्रमाणें आहे, तेव्हां असें तेज अन्यजातीचें खचीत नसतें. एक ब्रह्मबीज किंवा राजबीज. यावांचून अन्यजात नाहीं यांत संशय नको.

**भु० पा०**—ठीक आहे, जगदंबा तुझे इच्छेप्रमाणें करो. आतां तुला आणि मला दिवसभर फारच श्रम झाले आहेत; तेव्हां पलिकडे गर्द छायेंत अंमळ निद्रा करूं चला.

**भु० सुं०**—ठीक आहे. छकुडी आणि मी शेजारीं निजतों, ( असें ह्मणून कन्येसह राजा राणी वृक्ष छायेंत निजतात. )

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश २.

### स्थळः—शृंगारपुरींतील राजकचेरी.

### पात्रें.

चंद्रकांत........................चंद्रपुरीचा राजा.
सिंहबल........................त्याचा प्रधान.
धैर्यशील........................सेनापती.
हनमंतसिंग........................जमादार.
हुकमतसिंग........................हवालदार.

**रणछोडराय**................सुभेदार.
दुल्यानाईक................रामोशी.

## [ कित्येक कामगार मंडळी वगैरे. ]

[ चंद्रकांतराजा सिंहासनीं बसल्याबरोबर ]

**चोप०**—निगारखो मेहेरबान सलामदौलत वढती होवे. [ असा पुकारतो. नंतर]

**सिं०**—सरकार, [ हात जोडून ] वंदन करतों.

**चं०**—कल्याण, सिंहबला बसावें. माझे मनांत कांहीं विचारावयाचें आहे.

**सिं०**—आज्ञा सरकार. बंदा हजर हजर आहे.— [ असें ह्मणून खालीं बसतो. ]

( इतक्यांत सर्व मंडळी मुजरे करून आपापल्या जागीं बसतात. )

**सिं०**—सरकार, आज तबियतीची रहा कांहीं वेगळीच दिसते आहे, परंतु तसेंच कांहीं असल्यास या दासाजवळ चोरूं नये. कारण, ज्या परमेश्वरानें आज ही सिंहाच्या कबजांतील आपणास गादी दिली, तो परमेश्वर काय यत्किंचित दुःख असल्यास परिहार करणार नाहीं ? सर्व काळजी त्याला आहे. तस्मात् हृद्गत गुप्त ठेवूं नये. ( पायांकडे बोट करून या गादीच्या चाकरीकरतां शिरकमल हातावर घेतलें आहे.

**धैर्य०**—खरी गोष्ट. प्रधानजी, कालपासून सरका-

रची कांहीं चमत्कारिकच वृत्ति झाली आहे, आपण यथा योग्य प्रश्न केला.

हन०–आजी सरकार, कोनसा संकट मनमो हुवा बंदेकू कह देव. ( हात जोडून ) कुइ दुसमाननें तेडी नजरसे देखे हैक्या ? मगदूर क्या सालेकी. आबी कोन माईका पूत ए शृंगारपुरीपर देखेगा ? क्या बिसाद. एक दफे संकटका मैनातो बोल देव.

रण०–एमांशू संकट छे ? आज अठवरसने आठदाडा थया. आवे संकट येशुछे ? केंम जमादारसाब मेरी बात सांबळो.

हुक०–आजी रणछोड राय, सरकारके मनमें ए दुसमानका डर मालूम पडता है. लेकीन, मेरे गांवसे एक रामोशी कल आयाथा. उन्नें ऐसा कहदिया, के भुवनपाल भुवनपाल करकें कुई राजा बहोत दिन ह्यासे नजिक जो मोहनबाग है नही ? वामें रहताथा. आर, आज छवरस हुवा रामेश्वरकुबी बहोत आदमीनें उसकु देखे. और आबी ऐसा संदेसा हैके, वो बनारसकें आयली तरफ कुइ विश्रांत बनकरके बडा जंगल है वामे रहाहै. और उसकें सात कुई आच्छी खुप सुरत एक लडकी बी है. वैसा संदेसा मेरें सुन्नेमे कल आया. ओ रामोशी बी आज ह्या रहा है. लेकीन सरकारका होकम होयगा तो, उसकु बी ह्या बुलालेताहूं.

चं–( हुकमतसिंगाचें बोलणें लक्ष्य देऊन एक-

ल्यावर ) अजी हुकमतसिंग, बहोत अछी बात तुमनें कह दिई. यही कारणसें मेरी तबियत आच्छी नहीं और कुच दुसरा संकट नहींहै. भुवनपाल जो कबी जानसें आज तलख शाबूत है. तो उसकूं ठार करनेका इलाज जलदी करना चाहिये केंव हनमतसिंग?

हन०—सच्च महाराज. ठार हुवा तो पिछे सच बात हो चुकी.

चं०—कां सिंहबला, ऐकलेंना ? या घोरानेंच माझें अन्नपाणी सुटलें. कारण, जरी राज्य घेऊन आपणास आठ वर्षें होत आलीं, तरी तो जरी खरोखरी जिवंत असेल, तर पुनः बंड करण्यास राहणार नाहीं. याकरतां अगोदरच बंदोबस्त करावा हें उत्तम. कसें धैर्यशीला?

धैर्य०—खरी गोष्ट महाराज. शत्रु लांब आहे ह्मणून स्वथ निद्रा घेऊं नये, तसा अग्नि आतांशींच पेटला आहे ह्मणून विझविण्याचा अवकाश करूं नये, सर्प लहान आहे ह्मणून जिवंत सोडूं नये, विष काय थोडकेंच आहे ह्मणून भक्षण करून त्याची परीक्षा पाहूं नये. कां प्रधानजी, खरें कीं खोटें ?

सिंव्ह०—शाबास धैर्यशीला ! ( सरकाराकडे पाहून ) मग पुढें काय विचार करावयाचा तसा हुकूम व्हावा.

चंद्र०—हुकूम काय, हुकमतसिंगाला सांगून तेव-

ह्या रामोशाला येथपर्यंत आणवा. म्हणजे काय तो पक्का शोध लागेल.

सिं०–आज्ञा सरकार. ( असें ह्मणून हुकमतसिंगास सांगून दुल्यानाईक रामोश्यास कचेरींत आणवितात.)

दुल्या०–[वांकून व हात जोडून ] मी खानाजाद आपला दुल्या मुजरा करतों सरकार.

चं०–कारे दुल्या, मी विचारतों तें खरें सांगशीलना ?

दु०–जी सरकार, ( थोडा भिऊन ) ह्या पायापं कंदी खोटं नाहीं बोलणार. ( असें ह्मणून थरथर कांपूं लागतो. )

चं०–अरे, तूं भिऊं नकोस विचारतों तेवढें सांग ह्मणजे झालें.

दु०–व्हय सरकार. मी आंदुगरच पायापं आरज केलाया मंग नई जाओ वा राहो.

चं०–अरे, भुवनपाल राजाची तुला कांहीं खबर आहे कां ?

दु०–व्हय मायबाप. म्हंजे बगा, आमचा एसबा नाइक हैकी नइ, त्यानं बगा त्याला धरल होत, पन त्यो लई फस्ट चोलनार बगा. त्यान गोड बोलूनशनी एसबाला दिला बाल्यान् काय ? तो एसबाची लय हुशार महाराज, पन बगा जशी मोहनी पडावी की नई, अशी बगा त्याला मोहनी पडली. याच कारन नाहीं तुम्ही उमंगला ? त्या बेट्याबरोबर बगा

आठ धा वरसांची एक कार्टी है बगा. ती लय नाजुक है; आन जनू आक्शी नक्षीतर. लय चमका मारती बगा. मी काय सांगू. आमच्या एसबाला आक्शी मोहनीच पडली बगा. आन तीबी लय नकरा करतीया. एकदा हातांत तीरकामटा घेतला, कीं मंग म्होर जातो कोन ? आमच्या गांवांपून नऊधा कोसते हायती. आन तित तरी उंगीच बसलेत का, लय खटपट करत्याती. आमचा एसबाबी त्यांत है. आन दुसरें बगा सारे मिळून नऊ शंभरा रामोशी जमल्याती; मंग काय करनार हैती कोनासनी ठाऊक. पन एव्हढं माहित है कीं, त्या कार्टीनं आमच्या एसबाला लय वचन दिल या. मंग म्होर त्यांच्या मनांत काय वाटतया तें एक आई काळूबाई जानत असल बगा. पन आपण काइ त्या मंदी अगदीं नाहीं बगा, आइच्यान माझे गळ्याच्यान मी सरकारच्या पायांपं खोट नाहीं बोलनार.

चं०—अरे, पण तूं त्यांत नसशीलच, मग इतक्या शपता कशाला वहातोस ? पण अगोदर इतकें सांग कीं, तूं येथें कशाला आला होतास?

दु०—मी व्हय? माझी सासरवाडी नव्ह कां इत ? भल्या नाईक आन सोनचानाईक माज सासरे आन म्हाळसाई सासू. त्यानाबी जरा इतकेदी राग आला होता. पन बगा आतांशी लय नरम आल्याती. नाहीं तर आक्शी जीवपरान तोडला, पन त्या चच्यांनीं मा-

ड्या बायलस आखर नाहीं धाडलं नाहीं धाडलं. आतां न्यायास मी आलोया. मंग धाडल्यात कीं नाहीं कोन जान.

चं०-अरे दुल्या, तुझी बाईल जर तुझ्या बरोबर पाठविण्याची तजवीज केली, तर तूं एक आमचें काम करशील कीं नाहीं ? शिवाय त्या कामाबद्दल असें बक्षीस देईन कीं, जन्माचें कल्याणच होईल. पण काम फार जपून केलें पाहिजे.

दु०-महाराज, काम करीन कीं नाहीं याची खातरी ( हुकमतसिंगाकडे वळून ) यांना इचारा. कारण हे आम्ही एके गांवचे. पण आतां मात्र तें लय भारांसुद झालें. नाहीं तर आमच्या मंदी लगोऱ्या खेळत होते.

हु०-[ अब्रू जाते ह्मणून दुल्यास दाबून ] सरकार, ए अदमी बहोत इमानी है ; और आप जो कुच्छ होकम करोगे, वो ए बहोत इमानसे करेगा. छाहेसो होकम बोलदेओ. दुल्याकूं जामीन मै रहताहूं.

चं०-ठीक आहे. प्रधानजी, हुकमतसिंगाची खातरी आहे त्यापेक्षां दुल्याला असें असें कानांत सांग. ( चंद्रकांत प्रधानाच्या कानांत सांगतो. आणि प्रधान दुल्याच्या कानांत सांगतो. नंतर उघडपणें )

सिं०-दुल्या, संभाळ नीट विचारानें काम कर. गुलामा बेमालुम काम केलेंस तर जन्माचें दरिद्र घालवीन. पण मी तें दुसरें काम सांगितलें तें ध्यानांत आ-

हे ना ? ( हळूच दुल्यास एकीकडे नेऊन ) हें पहा तिला असें सांग कीं असा श्रीमंत व खुपसुरत आहे कीं, तुझ्या अमोल तारुण्याचें सार्थक होईल. अरे तुला सांगावें असें नाहीं; कसेंही करून तिला आणून माझ्या स्वाधीन कर, ह्मणजे झालें काम. एवढें होण्याकरतां वाटेल ती थाप दे आणि लागेल तितका खर्च कर. ह्या घे तुला खर्चण्याकरतां शंभर मोहरा. झालेंना ? ही गोष्ट लोक तुला मला माहीत. सरकारास कळवूं नको हो.सरकारचें काम कर ह्मणजे तिकडूनही तुला बक्षीस मिळेल. आणि माझें काम केलेंस तर मी तुला जें मागशील तें देईन. ( असें सांगून त्याला लावून देतो. )

चं०—कां रे सिंहबला, नीट समजून सांगितलेंसना दुल्याला ?

सिंह०—महाराज, त्याविषयीं आपणास आतां काळजी नको, काम झालेंच असें समजा. ( इतक्यांत 'दस बजगये ग्याराका अमल है महाराज' असें घड्याळवाला पुकारतो.

चं०—प्रधानजी, आतां मी जातों. फार संभाळून व्यवस्था ठेवीत जा. आणि सर्वांस सावधागिरीविषयीं ताकीद द्या.

सिं०—ठीक आहे महाराज. ( नंतर चंद्रकांत राजा उठतो. )

( कचेरी बरखास्त. )

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

वि०—कां सूत्रधार, पाहिलेना हे दुष्ट लोक ? त्या बिचाऱ्या भुवनपालास मारेकरी घालीत आहेत. सिंहबलाचा डोळा तर त्या हंसपालिकेवर आहे असें वाटतें. अरेरे ! आतां तिकडे विश्रांतिवनांत काय अनर्थ होईल कोण जाणें. तें सारें असो, ती नवरी माझ्याशीं ठरली असतां सिंहबलानें मध्यस्थी घातला आहे. तेव्हां कसें करावें ? सूत्रधार, तुह्मी एवढें काम करतां कां ? लवकर विश्रांतिवनांत जाऊन हंसपालिकेस सांगा कीं, माझ्या गांवीं तुला योग्य एक नवरा पाहिला आहे. नांव विचारलें तर विदूषकपंत कावडी वाहणारे असें सांगा. आणि लवकर जुळवून टाका ह्मणजे झालें. कारण, यंदाच्या सालांत रात्रीं सूर्यग्रहण आलें आहे. तेव्हां लग्नास गणगोत्र पाहतां येत नाहीं.

सू०—शाबास ! बृहस्पती शाबास ! तुझी गोष्ट काय ! तूं आकाशांतील चंद्रसुद्धां मागशील.

वि०—अंः ! त्या चंद्राला काय करतां ? मला मुखचंद्र असला तर द्या.

सू०—बरें, पुरे आतां. विश्रांतीबागेंतील प्रकार पाहण्यास येतोस का तूं ?

वि०—हो, हो, खरी गोष्ट. मी अगदीं विसरलोंच होतों. चला तर चला लवकर. दुल्यानाईक

तिकडे पोंचला नाहीं, तोंच आपण पुढें जाऊं. ह्मणजे ठीक पडेल. पण कांहो ? आगगाडींतून येतां कीं भाड्याचे मेणे करूं ?

सू०—अरे, आपल्याला इतकी यातायात नको, तो सर्व प्रकार तुला येथेंच करून दाखवितों.

वि०—ठीक आहे, तर मग दाखवा लवकर.

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३.

### स्थळः—राजपुत्राचें मंदिर.

### पात्रें.

सौंदर्यसागर.......... चंद्रकांत राजाचा मुलगा.
प्रेमसागर ............त्याचा जिवलग मित्र.
भालचंद्रभट...........उपाध्ये.
मन्याबा ............प्रीतींतील हुजऱ्या.

( देवडीवाले व खिजमतगार वगैरे. )

प्रेम०—क्कां मन्याबा, सरकार स्वारी काय करीत आहे ?

मन्या०—जी म्हाराज. सरकार व्हय, सरकाचं चिन्ह आज कांहीं न्यारच दिसतया ह्माराज. लयि वेड्यावानी झालेत्न. मी बगा तुमासनीच पाह्या निघालो होतो बगा, तो ह्योच आपल दर्शन झालं.

प्रेम०—अरे कसें काय ? कांहीं कमी जास्ती झालें कीं काय ?

मन्या०–कमी जास्ती काय पुसतां ह्मराज ? आज मंगाशी किवों कचेरींतून सुटीतच आल, आन मंग महालांत पाय ठेवला आन येड इन्न बोलू लागलेन काय !

प्रेम०–( घाबरून ) अरे तर मंग ? ते आहेत कोठें ? चल चल लवकर.

मन्या०–इतक घाबरूं नका म्हाराज. त्यांना कंद्दी मंदी अस होत असत बगा. ( कांहीं स्मरल्यासारखें करून ) मंजे बगा त्याला लयद्दी झाल. तुमासनीबी ठाव असल. ती दिल्लीची एक लय नामी गानारीन आली होती. आन तिच्या संगती तिची एक नऊधा वर्षांची पोरगी होती, तिला बगितल्यान बी सरकाची परकत अशीच झाली होती बगा, (हळू) अहो करत्यात काय ? ह्मटलं ह्मनजे हे जवानीच दिवस. ह्या दिसांत जर आसं न होईल, तर मंग का म्हातारपनी होईल ? तुमीच सांगानात ?

प्रेम०–खरें आहे, मन्याबा, तुह्मी म्हणतां ही गोष्ट खरी. अहो आधींच पंधरावें सोळावें वर्ष, त्यांत खाण्यापिण्याला यथास्थित. मग कां बरें असें होऊं नये ? कांहीं कोणत्या गोष्टीची तुम्हा आम्हासारखी काळजी कां आहे ? बरें, तें असो, आतां मी आंत जाऊन प्रकृतीचा तालामाला पाहतों.

मन्या०–बरं तर. मीबी वांयच घरीं जाऊनशानी भाकरबिकर खाऊन येतों. तुह्मी मात्र मी येईपर्यंत

हालूं नका. मी बगा ह्याच पावलीं आलों. ( असें ह्मणून मन्याबा घरीं जातो, आणि प्रेमसागर मंदिरांत प्रवेश करतो. )

प्रेम०–( सौंदर्यसागराचे खोलीजवळ जाऊन मनांतच. ) एकदम आंत जाऊं नये. सौंदर्यसागर काक करीत आहे, हें जरा दाराआड उभें राहून पहावें आणि नंतर आंत जावें. ( असा विचार करून दाराआड उभा राहतो. )

सौंद०–आतां कसें करूं ? ( खोलींत दुसरें कोंणी नसतां मनाशींच मोठ्यानें बोलतो. ) अरे माझे अकलेचा आणि विद्येचा क्षणांत भंग होऊन कामरंग ध्यानींमनीं भरला, आतां हें काम चंग बांधून कोण फत्ते करील ? ह्या रोगास " वंग " खाऊनही गुण येणार नाहीं, तर मनांत जिचें स्वरूप भरलें आहे, तिचा संगच केला पाहिजे. अहाहा! भालचंद्रानें किती तिच्या स्वरूपाचें वर्णन केलें ! मला ती हंसगामिनी प्राप्त होईल काय ? (पुनः आपल्याशींच) अरे सौंदर्यसागरा, तूं घरांत बसून मिळेल कीं नाहीं, मिळेल कीं नाहीं, असा सहस्त्र वेळां जरी जप केलाल, तरी प्राप्त होईल काय ? नाहीं, तर अंमळ घराबाहेर नीघ, जिवाचा धडा करून एकदां विश्रांत वनाजवळ प्रवासास्र ज़र, आणि तिच्या भेटीचा यत्न तेथें राहून कर. विश्रांतवनाच्या आसपास राहिल्यानें ती चारुगात्री एकदां दृष्टी तर पडेल ! हो हो,

( टाळी वाजवून ) झालें आपलें कार्य. अरे, तिला शिकारीचा फार नाद आहे, ह्मणून मघां नाहीं कां भालचंद्रानें सांगितलें? खरी गोष्ट. त्या वनाच्या आसपास आपला डेरा देऊन राहिलें कीं कामच झालें. वा! छान युक्ति निघाली. चला आतां करा तयारी. बरें, पण आतां बरोबर कोण कोण असाम्या घ्याव्यात ? आपण तिकडे जाऊन काय करूं आणि काय नाहीं, त्याचा मागमूस बाबास लागतां कामानये. (कांहीं स्मरण केल्यासारखें करून) हो, मी इतक्या विचारांत कां पडलों ? आपला प्रेमसागर बरोबर घेतला कीं कार्य फत्ते. कारण तो शहाणाही आहे, आणि मोठा धूर्तही आहे. शिवाय विश्वासू पुरा. झालें मन्याबा आहेतच, आणि त्या कामाच्या खटपटीला भालचंद्र फार हुशार आहे. त्याला बरोबर घेतलाच पाहिजे. शिवाय त्याला त्या देशांची माहितीही पुरी आहे. ठीक झालें. चला. हे इतके कपडे बरोबर, आणि ही छोटी बंदूक व हीच तरवार. झालें, मन्याबाला सांगून परवांचा भाला आणवूं. झालें, आतां काय राराहिलें ? कांहीं नाहीं. बरें, तर हा निघालों. (दोन तीन पावलें चालून. ) अरे, पण बाबास कोठें विचारलें ? आणि आईला तरी! आतां ही पंचाईत झाली. त्यांना विचारलें, आणि त्यांनीं जर नाहीं ह्मटलें, कीं झालें मग गेला सर्व बेत पाण्यांत. ( असा विचार करीत आहे, इतक्यांत. )

प्रेम०—( मनांत ) आतां आपण आंत जावें. याला कोणतें वेड लागलें हें आपण ओळखिलें. चिंता नाहीं. ( असें ह्मणून आंत जातो.)

सौं०—( प्रेमसागर आला पाहून. ) प्रेमसागरा येरे बा ये. ठीक आलास. माझीही तयारीच आहे. हा निघालों पहा.

प्रेम०—अरे, निघालास कोठें? आहे काय आणि नाहीं काय? असा वेड्यासारखा कां करतोस? नीट शुद्धीवर ये.

सौं०—( दचकून शुद्धीवर येतो. ) कोण प्रेमसागरा, तूं आहेस कां? मी हा नुक्ताच झोंपेंतून उठलों ह्मणून असें बोललों. ये, येथें बैस. ( डोळे चोळल्यासारखे करून. ) कसें काय ठीक आहेना? कांहीं कमी जास्ती नवी बातमी.

प्रेम०—होय. नवी बातमी आहे. म्हणूनच आपणास कळविण्यास आलों.

सौं०—कोणती नवी बातमी आहे, एकदां सांगा पाहूं,

प्रेम०—म्हणजे नवी खबर अशी आहे, आमचे सरकार तुह्माला माहीत असतीलच. त्यांचे पदरीं कोणी हुकमतसिंग ह्मणून मोठे पगाराचे हवालदार आहेत. त्यांच्या गांवाहून कोणी काल एक रामोशी आला होता.

सौं०—(आपल्याच कार्यासंबंधी ह्या बातमीचा रंग

दिसतो असें जाणून मोठ्या आनंदानें.) बरें, मग पुढें काय झालें ?

प्रेम०—पुढें मग असें कीं त्यानें कांहीं भुवनपाल राजाचा पत्ता लावून देतों ह्मणून सांगितलें, आणि ते अमूक ठिकाणीं आहेत, व त्यांचे बरोबर एक सुंदर तरुण मुलगी आहे, वगैरे मजकूर त्यानें इत्थंभूत सांगितला. मग आमच्या महाराजांनीं त्यास तीस हजार रुपये देऊं करून तूं आपल्या सर्व मंडळीसुद्धां मिलाफानें भुवनपालास ठार मार, ह्मणून सांगितलें. याप्रमाणें दुल्या रामोशी प्रतिज्ञेचा विडा उचलून गेला. आणि हा सर्व झालेला मजकूर भालचंद्रभटानें जाऊन आमच्या सरकारचे चिरंजीव सौंदर्यसागर महाराज यांस सांगितला, आणि भुवनपालाच्या सुंदर कन्येची त्यानें बरीच तारीख केली असें वाटतें. अतां सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, भालचंद्राचा मजकूर ऐकून सौंदर्यसागर महाराज विश्रांतवनास जण्यास निघाले आहेत, आणि आईबापास विचारण वगैरे सर्व ठेवलें गुंडाळून.

सौं०—( लाजून व यानें आपला सर्व बेत पाहिला असें जाणून. ) अरे जरी सौंदर्यसागर निघत होता, तरी प्रेमसागरास बरोबर घेतल्याशिवाय निघत नव्हता. हें तर खरें. असो आतां थट्टा पुरे. परंतु आतां पुढें कसें करावें हें सांग. आपल्या सिंहबल प्रधानानें तर दुल्या रामोशास पन्नास हजार रुपये

देऊं केलेत, आणि असें सांगितलें आहे कीं, सरकारच्या हुकमाप्रमाणें भुवनपालास राणीसह ठार करून तें सुंदर रत्न आहे तेवढें आणून माझे स्वाधीन कर." प्रेमसागरा, त्या सुंदरीवर त्याचा डोळा आहे, आतां कसें करूं ? मला तर भालचंद्रानें सांगितल्यापासून चैन पडत नाहीं. माझे मनांतून भुवनपालास व त्याचे सुंदर लेकीस दुल्या रामोशी तेथें जाऊन पोंहचला नाहीं, तोंच जाऊन आपण आश्रय द्यावा, असें आहे. मग तुझा विचार कसा ? पहा व्यर्थ आपल्या बाबानें त्यांचें राज्य हरण केलें. आणि अजून हो त्या विचाऱ्याची पाठ सोडीत नाहींत. आतां कसें करावें? तो भुवनपाल किती सुज्ञ, न्यायी आणि राज्य काय सुंदर रीतीनें चालवीत होता! नाहीं तर आमचे बाबा! ज्यांना संतोष ह्मणून कसा तो स्वप्नींही नाहीं. कितीही संपत्ती असली तरी दुसऱ्याचें हरण करण्याची इच्छा आहेच. बरें, हरण केल्यावर तरी व्यवस्था, तर तेंही नाहीं. आज आठ वर्षांत प्रजा अगदीं जर्जर करून सोडली. आणि मसलत काय ती सिंहबलाची. मग तो कांहींका सांगेना, तें ग्राह्य ! अरे मुख्य राज्याच्या कामास प्रधान काय तो निस्पृही, न्यायी, धूर्त आणि इमानी असा पाहिजे. तेव्हां यांपैकीं कोणताही गुण सिंहबलाचे अंगीं आहे, हें तुला ठाऊकच आहे. असो. माझे मनांतून तें सुंदर रत्न त्या दुष्टाचे हातीं न लागो असें आहे. अरे, भालचंद्र परवां काशीहून

आला कीं नाहीं ? त्यानें सर्व प्रकार सांगितला. भुवनपाल कोठें आहे, व त्याचे कन्येचे गुण वगैरे सर्व दृष्टीनें पाहून मला सांगितले. बाकी दुसऱ्या कोणास त्यानें ही गोष्ट कळविली नाहीं. परंतु इतक्यांत मागून तो दुल्या रामोशी कां न यावा ? त्यानें हा सर्व नाश केला. आतां तो जाऊन तेथें पोंहचला नाहीं तोंच आपण पुढें गेलें पाहिजे.

प्रेम०—ठीक आहे. सरकार माझेही मनांतून तेंच आहे. हा मी निघालों, करा तयारी. आणि बाबांस फक्त शिकारीला जातों असें सांगून चला ह्मणजे झालें. लांब जातों ह्मटलें तर धाडणार नाहींत. बरोबर सरंजाम सडाच पण अगदीं निवडक घ्या. न जाणो वेळ आहे, प्रसंग आहे. बरें, अगोदर माहितगार मनुष्य आपला काय तो भालचंद्र त्याला बोलवा; ह्मणजे आज पाहांटेस कुच.

सौं०—ठीक आहे. प्रेमसागर, फार चांगली युक्ति काढलीस. ( असें ह्मणून भालचंद्रास बोलावणें पाठवून त्यास आणविलें. )

भा०—कां सरकार? ( हात जोडून ) आज फार जलदीचें बोलावणें आलें ? मी देवघरांत एकादशणी करीत होतों. मला असें झालें कीं एकादशणी आटपेल कधीं आणि मी जाईन कधीं. कां बरें चित्तही फार व्यग्र दिसतें ?

सौं०—अरे व्यग्र काय? मघां तूं सांगितल्यापासून अंगाची लाही होऊन गेली आहे. असें सुंदर रत्न प्रधान आपलेंसें करणार काय? पाहतों आतां चमत्कार! ( मिशांवरून हात फिरवून ) भालचंद्रा तूं लवकर घरीं जाऊन आपली तयारी कर. आज पहांटेस येथून कुच.

भा०—पण महाराज, थोरले सरकारची कांहीं परवानगी वगैरे?

सौं०—अरे, परवानगी काय! शिकारीस जातों ह्मणून आजच रजा घेऊन ठेवितों.

भा०—ठीक आहे. मजकडून अगदीं तयारी आहे. कारण, माझ्या मनासारखीच गोष्ट होत आहे. मग कां आळस? ज्या दिवशीं त्या हंसपालिकेस पाहिलें त्या दिवसापासून दोन वेळां रोज ईश्वरास प्रार्थना कीं, ईश्वरा, कृपा करून असलें रत्न आमच्या सौंदर्यसागर महाराजांना मिळो. सरकार, [ हात जोडून ] आपण समक्ष पाहिल्यावर मी बोलतों याची खात्री होईल, अहाहा! धन्य विधात्याची! काय बांधा! आणि काय तें तेज!! मनोरथ पूर्ण झाले तर जोडा खरोखरी साजेल. [ सौंदर्यसागराकडे पाहून ] महाराज, हुबेहुब आपण मदन आणि ती रतीच शोभेल.

प्रेम०—अरे, पण तें सारें असो. आज पहांटेस तूं, मी व महाराज आणि चार हत्यारबंद स्वार

असे उजाडले नाहीं तों येथून बारा कोसांवर गेलों पाहिजेत. कां महाराज ?

सौं०-हो. तूं बोलतोस याचप्रमाणें आपल्या तिघांकरतां उत्कृष्ट तीन घोडे निवडून घेतों, आणि एक मन्याचाकरतां. झालें, चार घोडेस्वार अगदीं तयार व विश्वासूक असे घेतों. ह्मणजे झालें काम ?

भा०-हो. चल आतां प्रेमसागरा, आपल्याला तयारी केली पाहिजे.

प्रेम०-चल मीही आलोंच. [ असें ह्मणून सर्व निघून जातात, व सौंदर्यसागर बापाकडे रजा घेण्यास जातो.)

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ४.

### स्थळः-विश्रांत वनांतील किर्र झाडी.

### पात्रें.

एसबानाईक ........... .. ........रामोशी.
खंडबानाईक ........................रामोशी.
सटवोजीनाईक........................रामोशी.
दुल्यानाईक ........................ रामोशी.
भुवनपाल ........................राजा.
भुवनसुंदरी ........................राणी.
हंसपालिका ......................कन्या.

(किसेक पुष्कळ रामोशी.)

दुल्या—कां एसबा, आवतन्या परमान संमदे लोक जमल्यात, आतां झोर कसा काय इचार ?

एस०—आपला विचार व्हय ? आपुनचा काळुबाईच्यान सांगतो, आपल्यापून कंदी अस काम व्हायच नाहीं. कां, आपून त्याच कस झाल तरी अन्न खाल्लया. आन त्याच्यावर हत्यार धरन ? आपन नाहीं अस करनार.

खं०—अरे, काय बिव्या ! संमद बायलवानीच इचार बोलतोस ! अरे कशाची शपत आन कशाशी आन. असी येळ मंग झोर येईल कां ? आज तीस शंभरा किर्तीरे दुल्या !

दुल्या—अरे, तीस शंभरा नव्ह, तीस हजार, मंज बगा, धाशंभरा मंज एक हजार. तेव्हां समद्या किती किती शंभरा ? तुह्मीच हिसब करा आतां.

खं०—तो हिसाब सटवाजीला इचारा संमदा. त्यो लय या कामामंदी फस्ट है. दोन साल नाहीं कां झाली, ती वरनगांवची चोरी केली ती ? ती वरनगांवची ? तवा बगा संमदा हिसाब त्यानच आकशी ठेवला होता.

दुल्या—हो खर राव. कारे सटव्या, अरे धाशंभरा एक आन धाशंभरा एक तवा संमद किती झालरे ?

स०—काय राव, हिसाच करत्याती. संमद्या इस शंभरा नाहीं कां झाल्या ?

दु०—खरं हो खर राव. सटव्या कंदीरे इतका फस्ट झालास ? अरे आतां हें एवढं काम लक्ष्य देऊन कर बग. मंग चंद्रकांत राजापं माझी आकशी वग है बग. त्यो योक हुकमत्या नाहीं का तित ? तसा तुला करून टाकीन.

खं०—तें राहूंद्रे. झोरचं झोर काय होईल तें काळूबाईची इच्छा. अंगुदर बोलन काय चाछया, याचा इचार करा.

दु०—हो, खरं राव. कां एमबा, तुह्मी राव आंकशी वड्नच आनलया. रात्र तुमच्या मनांतल तरी कळूंद्या. धानधाइस शंभरा तुमी द्या मग तर झाल.

स०—अरे दुल्या, तुला एकदां सांगितलं कीं, मपून कांहीं ही गोष्ट व्हायची नाहीं. मंग कां उंगीच तरास देतोस? घा शंभरा नग. आणि वीस शंभरा नग अरे, संमद दिल तरी नग. ज्याला राव एकदा आपल झटलं त्यावर आपन काय कंदी हत्यार धरनार नाहींत. मंग त्या पाइ तुमासनी राग आला तरी चिंता नाहीं. तुह्मी जान आन तुमच्च कर्म जान.

खं०—अहो एमबा, अस माथ नका फिरूं देऊं. आट घा वरसांत बगा आईकाळूबाईला बली मिळाला है कां ? तुमीच्च इचार करा ? आन आज राव राजा आनि रानी दोनी बी चांगली मिळत्यात ते डावलता

काय ? आन आईकाळूबाईचा राग व्हईल तवा मंग.

स०–अहो एसवा. ऐकानात का पन ! त्या मंदी लय हित है बगा. अहो तीस हजार रुपये मिळतील आन काळूबाईला बली व्हईल आन संमदच होईल काय. अहा, दोघांसनी द्याव बली आन पोरगी परधानाच्या सवाधीन करूं, मंज त्येची पन्नास हजार मिळतील. ते सार तुमी मनावर धरल मंज व्हतय बगा.

ए०–ते राव पन्नास हजार किव्हां शंभर हजार मिळोत, पन अस कंदी आपल्यापुन व्हायच नाहीं. आन काळूबाईचा धाक मला घातला, त्योबी अकशी खरा नाहीं. आसा मानसाचा बली दिल्यान कुट देवी परसन होती काय ? काय राव ! तुमासनी वाटल तस करा जा, मी आपला जातों बगा. ( निघून जातो. )

दुल्या–कसं काय राव ? एसबानी तर आपल्यासनी सोडल. आतां म्होर कसा काय इचार ?

खं०–इचार काय, तो गेला मंगून आपन ची बांगड्या भरायच्या ? अहो, चला राव आईकाळूबाईचे नांवान काम फत्ये करूं या, आन है काय त्या मंदी. चला नाहीं तर नाहीं. त्या चित्याचें नशिबीं नाहीं, त्याला आपन काय कराव ? चला.

दुल्या–खरं बुवा तुमी बरीक खर सूर. आमच्या मंडळीमधें एक तुह्मी किंवा एक सटवाजी.

खं०–खरच गड्या. सटवाजी तर अकशी लय फस्ट है. असो आतां चला. रात्र उलिशी उरलिया.

स०—चला तर चला. ह्या काळूबाइचं नांव.

दु०—पन अक्शी पाय नका वाजवूं. नाहीं तर ते जाग होतील. ( असें ह्मणून ज्या ठिकाणीं भुवनपाल होता, त्या ठिकाणीं गेले.)

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ५.

### स्थळः—अरण्यांतील पर्णकुटी.

### पात्रें.

भुवनपाल..................राजा.
भुवनसुंदरी..................राणी.
हंसपालिका..................कन्या.
दुल्यानाईक..................रामोशी.
खंडबानाईक..................रामोशी.
सटवाजीनाईक..............रामोशी.

( दुसरे पांच पन्नास रामोशी वगैरे. )

दु०—कारे सटव्या, बेस येल है कीनइ? वर आतां संमंद्य झोपी गेलेत. हं बगतोस कां? हान फटकान् काय?

स०—अरे वाहवारे गवश्या! देविपं न्यायच कीं हितच?

खं०—अरे सटव्या, या दुल्याला कीनइ अक्शी सुमरन राहत नाहीं. मंगा म्हनाला कीं, राजाला

आन् रानीला देविपं न्यायच आन् कार्टीला परधानापं न्यायच. आन् आतां म्हनतो हाना फटका. कां, हैत की नइ शान ?

दु०—खर गड्या. मी मंगालों होतों खरा. पन आतां म्होर कस काय करन तें आपलं इचारान.

खं०—अरे, आतां चऱ्हाटं हैतच आपल्याजवळ. आंवळा वगता काय ?

स०—व्हय राव. हो आवळतो बगा. [ असें ह्मणून राजा व राणी निद्रिस्त असतां एकदम सर्वांस बांधून टाकतात. ]

भु० पा०—महाराज, काय गडबड आहे हो ? अहो, दगा हो दगा. सावध व्हा. हंसपालिके, बेटा सावध हो.

भु० सुं०—अरे, कोणरे हे दुष्ट! अरे आह्मास कां बांधतां ? कांहीं द्रव्य किंवा पोशाक कांहींच नाहीं आह्मांजवळ ? मग व्यर्थ कां धरतां ? संशय जात नसेल तर झाडा घ्या. पण विनाकारण आंवळा आंवळी करूं नका. [इतक्यांत हंसपालिका जागृत होते.]

हं०—आई, कांग रडतेस ? झापत चावळतीस होय ? घाबरूं नकोस. मी बाबांस जागें करतें.

भु० पा०—बेटा हंसपालिके, आपल्यावर आज कांहीं तरी महत् प्रसंग आहे. बेटा, आह्मास कोणी दुष्ट लोकांनीं बळकट बांधून टाकिलें आहे.

हं०—बाबा, असें आहे काय ? ही पहा मी उठलें. (असें ह्मणून उठण्यास जाते तों देह बांधलेला.) बाबा, घात हो घात. हें पहा मलाही बळकट खें-चून टाकिलें आहे. बाबा, कोण हे दुष्ट लोक आहेत?

भु० सुं०—अगे बेटा, तुलाही बांधून टाकिलें काय? अरेरे ? आतां पुढें वाट कशी ? [असें ह्मणून भुवन-सुंदरी करुणास्वरानें रडूं लागते.]

हं०—आई, नकोग रडूं. आतां काय करूं मी ? बळकट बांधलें गेलें. नाहीं तर दाखविला असता च-मत्कार! आई कुठें आहेस तूं ? मला कांहींच दिसत नाहीं. आणि त्यांत हे दुष्ट मेले डोळ्यांत धूळ टाक-तात! अरेरे! शंकर कसा कोपला आह्मावर ? या ठिकाणीं आज सहा वर्षें निर्वेध रीतीनें दिवस असतां त्यास आणखी दुःख द्यावें असें वाटलें काय ? या वे-ळेस कुळस्वामिनी सुमंगला तरी कशी झोंपी गेली ? (असें ह्मणून त्या दुष्ट लोकांस विचारते.) अरे तुह्मीं असे पुरुष असतां भितरे स्त्रीसारखे कां लपून घाला घातला ? मर्द असून आह्मी निद्रिस्त असतां धरणें हें शूराचें काम काय ? छी ! थू तुमच्या तोंडावर ! अरे, तुह्मी कोण आहां हें मी ओळखिलें. मेल्यांनो, द्रव्याचे आशेनें निमकहरामी झालांत काय ? अरे या अरण्यांत तुमच्या विश्वासावर, तुह्मी साह्य कराल ह्मणून आह्मी निर्भय असतां, असा विश्वासघात के-लात काय ? जळो तुमचे तोंड तें! मेल्यांनो माराल

एकदां एवढेंच कीं नाहीं ? तुमच्या हातीं तो चंद्रकांत काय देणार आहे धूळ! अरे या अनाथ झालेल्या राजास आश्रय दिला असता तर तुमचें जन्माचें कल्याण झालें असतें. असो. आतां उगीच हाल कां करतां ? चला एकदां तुमच्या मनांत काय करणें असेल तें करून द्या. नाहीं तर सामर्थ्य असेल तर मला एकदां मोकळी सोडून पहा. मग पहातें तुमचा पराक्रम. अरे मी तर राजकन्या स्त्रीजात आहें, आणि तुम्ही शेंपन्नास रामोशी हत्यारबंद आहांत. पण मग तुम्ही पराक्रम पहा. असो, आतां तुम्ही सोडणार आहां, ही गोष्ट स्वप्नींसुद्धां नको. परंतु तुम्ही कोण आहांत एकदां ओळख द्या. कोण एसबा, तुम्ही आहांत कां यामधें ? छिः! तुम्ही नसाल. तुमच्या हातून अशी गोष्ट नाहीं कधीं व्हायची, ही माझी खातरी आहे. हो, मेला दुल्या असेल दुल्या. तोच गुलाम परवां शृंगारपुरीस गेला होता ह्मणून एसबा सांगत होता. त्याचेंच हें कृत्य. शृंगारपुरीस गेला होता तेव्हां तिकडून कांहीं मसलत करून आला असेल. होय. तोच असावा. कोण ? दुल्या ? तूं आहेस यामध्यें ? मग असा बोलेत कां नाहींस ? वा ! ठीक केलें! शाबास !

दु०—( सर्वांस सांगतो. हळूच ) अरे, आतां अगदीं बोलूं नका. जर कां दादा आतां यांला सोडाल, तर दादा मंग गठडीच तुमची. ठाव नाहीं ? एकदां त्या कार्टीच्या हातीं तिरकामटा गवसला कीं मंग क-

शाला राव इचारता! आपून इतकं जन हौत पन मंग गठडीच. आइच्यान.

खं०-अरे दुऱ्या, पन सोडूं तवान? आव राव. आसच चला घेऊन काळूबाईच्या देवळापं मंज झालं काम.

स०-व्हय राव. असच करा दादा. लय नामी ऊगत काढली.

दु०-चला तर चला, मंग कां उशीर ?

खं०-अरे उशीर बिशीर काय नाहीं. हें आवळलं बगा.

स०-अहो पन दादा, आंदुगर कस काय? काटीला मी व दुलबा संभाळतो. आन तुह्मी सार जन दोघांसनीं घेऊन काळूबाईपं जा म्हंज झाल. कां दुलबा?

दु०-खरं दादा. लय बेस उगत. का खंडबा? हूं. होऊंद्या आन् काय.

खं०-बेस. हा मी निघालों. ( असें ह्मणून खंड्या रामोशी व दुसरे सर्व दोघां राजा राणीस घेऊन जातात. आणि सटवाजी व दुल्या हंसपालिकेजवळ राखण बसतात. )

( पडदा पडतो. )

वि०-कां सूत्रधार, झोंप झाली कीं नाहीं? वः! ही का गुलाबी झोंप का साखरी झोंप ?

सू०-शाबास! झोंपेंत मी आहें कां तूं?

वि०-अहो, तर हे सभासद मघांपासून वाट पाहतात कीं, विश्रांतवनांत दुल्या रामोशी चंद्रकांतराजा-

चा हुकूम घेऊन गेल्यावर पुढें काय झालें ? शिवाय सौंदर्यसागर मोठ्या थाटानें निघाला होता त्याचें काय झालें, हें सर्व पाहण्यास डोळ्यांत तेल घालून वाट पाहत आहेत. आणि तुम्ही आपले स्वस्थ झोंप घेतां ना ? वः ! एकदम संदर्पचे संदर्पच तोंडांत टाकतां !

सू०—अरे, सौंदर्यसागर निघून पुढें काय झालें तें तुला दाखवितों. पण दुल्यानें येऊन काय गोंधळ केला, हें तूं इतका वेळ पाहिलें नाहीं कां ? अरे, हा मागचाच प्रवेश झाला तो ? त्यांत दुल्या आणि सटव्या हंसपालिकेजवळ राहून खंड्या व सर्व रामोशी भुवनपाल राजास व राणीस घेऊन काळूबाईचे देवळांत मारण्यासाठीं नाहीं कां गेले ? आणि तें पाहिलें नाहीं का ? आतां झोंपेंत तूं असतोस कीं मीं ?

वि०—हो हो. खरें. मी हें पाहिलें खरें. पण त्या वेळेस किंचित डोळे झांकून अंमळ जागा होतों, म्हणून तें असें झालें. आतां मात्र नीट लक्ष्य देऊन टपत बसतों. होऊंद्या पुढें काय होतें तें. चला आटपा लवकर, रात्र फार झाली.

सू०—ठीक आहे. पहा आतां चमत्कार.

( निघून जातात. )

---

## प्रवेश ६.

### स्थळः—अंबराई.

### पात्रें.

सौंदर्यसागर............चंद्रकांताचा पुत्र.
प्रेमसागर ............त्याचा जिवलग मित्र.
मन्याबा ............प्रीतींतील हुजऱ्या.
भालचंद्रभट............उपाध्ये.
एसवा ................रामोशी.

मन्या०—महाराज, जागा लय नामी दिसतीया. हितच्च उतरा आतां. सांजवी झालिया.

भा०—होय सरकार, उतरण्याची जागा आतां हीच. मग पुढें असें स्थळ नाहीं. आतां हें येथून सारें विश्रांतननच लागलें. येथेंच डेरा द्यावा. कारण, जागा फार दाट छायेची आहे. शिवाय त्या पवनगंगेचें पाणी काय सुंदर आहे! एकदां तुह्मी प्यालांत तर पुनः या जाग्यावरून हालवणार नाहीं. वः! जागा पण जागा!

सौं०—अरे भालचंद्रा, तूं सांगशील तसें करायचें. कारण, या देशाची व रस्त्याची माहिती तुला आहे ह्मणून. कां प्रेमसागरा?

प्रेम०—होय खरी गोष्ट. आतां रानांत सर्व आधार भालचंद्राचाच. उतरा येथेंच. ( सर्व खटला तेथें उतरून डेरे वगैरे देतात. )

**सौं०**—प्रेमसागरा, दोन प्रहरीं भोजनास उशीर झाल्यामुळें आतां क्षुधा बिलकूल नाहीं. थोडें पाणी मात्र स्वच्छ आणून दे ह्मणजे झालें.

**प्रेम०**—सरकार, कोणासच क्षुधा नाहीं. आतां बिछान्याशीं गांठ. हें पाणी आणलें, घ्या. (सौंदर्यसागर पाणी पितो.)

**सौं०**—भालचंद्रा, आतां सर्व जण निजा लवकर. पण पहांटेस चंद्राचा उदय झाल्याबरोबर भुवनपाल राजा ज्या पर्णकुटींत राहतो, तो मुक्काम गांठायचा बरें.

**भा०**—ठीक आहे. सरकार, येथून कोशभर त्यांची पर्णकुटी आहे. सकाळीं सर्व खटला येथेंच ठेवून आपण तिकडे जाऊं. आणि त्या सर्वांसच घेऊन भोजनास इकडे येऊं ह्मणजे झालें. मी समजलों. तुम्हाला कां ओढ लागली ती, पण आतां सकाळपर्यंत कसें तरी काढा; म्हणजे तिची भेट होईल. आपण आतांच तिकडे गेलों असतों, परंतु रात्र अंधारी, आणि त्यांत हें भिल्लांचें रान.

**सौं०**—ठीक आहे. आतांची रात्र कशी तरी जाईल. ( असें म्हणून सर्व निजतात. )

**मन्या०**—(कोणी रडत आहे असा कानोसा घेऊन) कोण हायरे झाडींत ? अरे जबाब दे. कोन रडतो है तित ? ( जबाब मिळत नाहीं असें पाहून. )अरे पाहऱ्यावर कोन है ?

सिपाई–जी, मन्याचा दादा मी हजर हैकी पाहऱ्यावर.

मन्या०–अरे पलिकड झार्डीत कोनी रडतया असा सुगावा लागतोया. कोन है तपास कर.

सि०–जी व्हय करतो. ( असें ह्मणून जातो, आणि तपास करून परत येतो. ) मन्याचादादा, अहो मन्यायादादा.

मन्या०–कारे कोन है ?

सि०–तित एक रामोशी है रामोशी. आन् तोच रडतोया बगा.

मन्या०–कां बरें ?

सि०–लय बगा इचारलं पन आक्शी तो बोलतच नाहीं बगा. ( भालचंद्र व प्रेमसागर गलबा काय ह्मणून जागे होऊन येतात. )

भा०–अरे शिपाई, दोघे चवघे जाऊन धरून आणा इकडे, ह्मणजे सर्व शोध लागेल.

सि०–व्हय महाराज, ( असें ह्मणून आणखी दोघे चवघे जाऊन रामोश्यास धरून आणतात.

मन्या०–कारे आणलास कां धरून ?

सि०–जी व्हय. हा बगा दादा. काळा डूस आन दांडगा है बगा.

भा०–कारे रामोशी, कां रडत होतास, आणि तुझें नांव काय ?

रामो०—जी महाराज. ( हात जोडून ) माझं नांव एसव्या बगा.

भा०—अरे, रडत कां होतास ?

एस०—तें नका महाराज इचारूं. तें जें दुःख झालंया तें एक माझं मलांच माहीतं. आन एक भगवान नारायनं जानंत असल बगा.

प्रेम०—अरे पण सांग, तुला काय आहे दुःख ? आमच्या हातून निवारण होण्यासारखें असल्यास करूं. [ इतक्यांत फारच गलबा झाला पाहून सौंदर्यसागर उठून बाहेर येतो. ]

सौं०—अरे एसव्या, इतक्या रात्रीं तूं एकटाच कां रडत होतास ? तुझें काय दुःख असेल ते मी दूर करतों, पण सांगशील तर खरें.

एस०—(हात जोडून) सरकार, दुःख काय सांगूं ? भगवनानं मला मरन दिलं असतं तर बरं झालं असत. पण तें होनार कुठून? ज्याचं अन्न खाल्लं त्याचा उपकार बी फिटला नाहीं बगा. आन आखर बिचारा व्यरथं हकनाक मारला गेला. अरे राम ! राम ! असा परानी आतां नाहीं द्रिष्टी पडनार. ( डोळ्यांत पाणी येऊन मोठ्यानें. ) लय मोठ्या मनाचा. बिचाऱ्याला अभिमान तर नाहींच. आन मी, राजा व हा रामोशी असा परकेपनाच त्यानं मनंता धरला बगा. हाय हाय आकशी माझा मायबाप. तीबी माउली तशीच. तिनं ह्मनाव "एसव्या, अरे तूं रामोशी हैस तरी हरकत

नाहीं. मी तुला पोरावानींच समजतें." ह्माराज, फार काय सांगूं परत्यक्ष आई मेली, तवा बी असं अनखर वाटल नाहीं बगा. पन आज दाही दिसा उदास झाल्या. संमद्यापरीस त्या पोरीचा लय आक्शी जीव परान माझ्यावर अस बगा. तिन ह्मनाव "एसबा, अरे तूं माझा भाऊच आहेस. तुझ्या बळावर तर आह्मी आरन्यांत दिवस काढतोया. अरे, भगवान आपल्याला या दुःखांतून सोडवील." असं ह्मनाव बगा. काय सांगूं ह्माराज. एक एक तिच गुन लिवीन ह्मटल तर धरतरी पन पुरनार नाहीं. ( पुन्हा मोठ्यानें रडतो. ) ह्माराज, तुह्मी तिला बगितली नाहीं. आक्शी असमानातल नक्षीतर बगा. आन तोंड तर जनू चंद्रमा. लय चेस.

सौं०—तें सर्व आह्मी समजलों एसबा. पण त्यांचं झालें तरी काय ? आणि तूं कां रडतोस ?

**एस०**—महाराज, तुमासनी संमदी हकीकत सांगतों. [ असं ह्मणून झालेला सर्व वृत्तांत सांगतो. ]

**प्रम०**—असें काय? एसबा, हे आह्मी निवालों पहा. काळूबाईचें देऊळ कोठें आहे, तेवढें मात्र दाखीव. अरे, दोन प्रहररात्रीं बळी देणारना ? मग काय चिंता आहे? आतांशी तर एक प्रहरच रात्र झाली आहे. भुवनपाल व भुवनसुंदरी खचीत जिवंत असतील. चला लवकर.

**सौं०**—ठीक आहे. परमेश्वरकृपेनें ते जिवंत मात्र

असले पाहिजेत. त्यांचा सर्वांचा समाचार मी एकटाच घेतों.

भा०—महाराज, अगोदर भुवनपालास वांचवावें आणि नंतर त्याचे कन्येचा शोध करूं. कारण, एमवाच्या सांगण्यावरून तिच्या जिवास कांहींच धोका नाहीं.

प्रेम०—खरी गोष्ट. अगोदर त्या काळूबाईच्या देवळांत जाऊन भुवनपालास व त्याचे स्त्रीस सोडवायचें, नंतर दुसरा विचार. चला व्हा तयार, निघा लवकर.

सौं०—स्वारांना आणि गारदी लोकांना हत्यांरानिशीं निघण्याचा जलदी हुकम करा; आणि मी तर हा तयारच आहें. (असें ह्मणून सर्व तयार होऊन काळूबाईच्या देवळाकडेस जातात.)

(पडदा पडतो.)

(पडद्याबाहेर.)

वि०—कां सूत्रधार, मोठी अजब करणी आहे बा ईश्वराची! मारत्यापेक्षां तारता विशेष खरा. माझा तर बा आतां जीव खालीं पडला. ते जेव्हां सौंदर्यसागर आणि प्रेमसागर तिकडे भुवनपालास वांचविण्यास गेले, तेव्हां मला डोळा लागला. नाहीं तर मी विचार केलाच होता कीं आपण जाऊन सर्व रामोश्यांस बळी द्यावे, आणि भुवनपालास राणीसहवर्तमान सोडवावें.

सू०—वाः! आपण काय शूर शिपाईच, आपण

इतकें केलें असतें खरें, आणि कदाचित नसतें झालें तर तुम्ही आपला स्वतःचा बळी दिला असता.

वि०—अहो, वाहवा हो ऐटबाज ! एकूण तुम्हाला आमचें बोलणें सर्व मिथ्याच वाटतें काय ? ठीक तुम्हीच असें बोलूं लागल्यावर, मग आमची बायको काय ? ती बोलेलच चालेल. काय हा संशय !! बरें, असूंद्या तें आतां. पण पुढें काय झालें ?

सू०—अरे, आतां दाखवितों पुढला चमत्कार. लक्ष्य मात्र दे.

वि०—हो लक्ष्य आहेच. तुमचें चालूंद्या. (असें म्हणून सर्व निघून जातात. )

---

## प्रवेश ७.

### स्थळः—विश्रांतवनाचे आसपास.

### पात्रें.

हंसपालिका..................भुवनपालाची कन्या.
क्षेमावती ............कृपासागर ऋषीची कन्या.
सावित्री ............क्षेमावतीची सखी.

(दुसऱ्या कित्येक ऋषिकन्या.)

हंस०—अहाहा ! परमेश्वरा, तूं अनंत आहेस. तुझी लीला अनंत. तुझी कृपा अनंत. पहा, या पूर्वी दोन घटकांचे अगोदर मजवर कोण संकट होतें ? परंतु या घटकेस त्या सर्व संकटांतून पार पडलें. देवा, तुझी करणी अगाध आहे ! ( डोळयांवाटे अश्रुपात

येऊन. ) नारायणा, जयसुमंगळे, तुला सर्वांचीं अंतः- करणें समजतात. सत्याचें सत्य आणि असत्याचें असत्यच तूं ठरविशील, यांत संशय नाहीं. आतां माझी खातरी झाली. कसें झालें तरी शेवटीं तुझ्या घरीं न्याय खोटा होणार नाहीं. प्राणीमात्र चराचर जें जें कांहीं करतें, त्या सर्वांवर तुझी सत्ता असते. आह्मां मानवांचा अभिमान व्यर्थ आहे. असो, जगदंबे, असें तुझें कृपाळू अंतःकरण असतां बिचाऱ्या भुवनपालावरच कां तुझी वक्रदृष्टी ? त्या बिचाऱ्यानें काय तुझा अखंड अपराध केला आहे ? त्याविषयींच मन कठोर कसें झालें ? अगे, आजपर्यंत अनंत भक्तांचें संकटीं रक्षण केलेंस, आणि तेवढा भुवनपालच आणि ( माझी आई ) भुवनसुंदरीच तुला जड झाली काय ? अगे फार कशास, मागच्या भक्तांचीच तुला उपमा कशास देऊं, आतांच पहाना एक घटकेचे अगोदर मीच किती संकटांत होतें ? ते मेले दोघे [ दुल्या व सदऱ्या ] मजवर पापदृष्टी ठेवून बलात्कार करणार होते. अरेरे ! स्मरण झालें कीं अंगावर शहारा येतो. मेल्यांनीं अगदीं मला भ्रष्ट करण्याची वेळ जवळ आणली होती. काय दुष्ट मेले ! आनंदांत तरी काय आले होते ! काय त्यांचीं स्वरूपं तरी ! ! एक ह्मणे तुला चांदीचे गोट करीन, दुसरा ह्मणे पुतळ्यांचें गांठलं करीन, मूर्ख बेटे ! कांहींच ज्ञान नाहीं. त्यांना असें समजेना कीं, ही कशी झाली तरी राजकन्या

आणि आपण रामोशी. तेव्हां ही आपली गोष्ट मान्य करील काय ? पण हे विचार त्यांच्या कशाचे मनांत येतात ? मूर्खच ते. एक ह्मणे माझे जवळ बैस. एक म्हणे माझ्याशीं पाट लाव. काय दुष्ट ते ! मेल्यांचीं कृत्यें तरी किती अघोर ! ! स्मरण झालें कीं अंगावर कांटा येतो. असो जगदंबे, अशा वाघांच्या सपाट्यांत सांपडलें असतां, त्यांच्या बुद्धीस तूंच प्रेरणा केलीस. तेव्हां ते गुलाम आपापसांतच म्हणूं लागले कीं, " मी बायको करीन, दुसरा म्हणे ही बायको मी करीन." असें म्हणून एकमेक परस्परांच्या हातानेंच ठार मेले. जगदंबे, ही लीला कोणाची ? तुझीच. झालें, ते मेले म्हणून त्यांच्या हातांतून सुटलें, आणि पुढें कोठें कोणत्या प्रधानाकडे घेऊन जाणार होते, त्या काळजींतूनही सुटलें. आदीमाये खरेंच सांग. ह्या गोष्टी तुझ्या कृपेवांचून झाल्या काय ? नाहीं. मग तेवढ्या माझ्या बाबांवरच (भुवनपाल) व आईवरच कां तुझी वक्रदृष्टी ? तर जगज्जननी असें करूं नको. त्यांना कोठें धरून नेलें असेल, तेथें त्यांना खुशाल ठेव, आणि आम्हा दीन मायलेंकराची जलद भेट कर. पहा, माझ्यावांचून त्यांचे प्राण कंठीं आले असतील, अरेरे ! ( दुःख स्मरण होऊन ) आतां मी आई ह्मणून कोणास हांक मारूं ? आई, तुला तरी मजवांचून क्षण जाईल काय ? आई, मी इतकी मोठी व पराक्रमी झालें, तरी तुझें स्तनपान नित्य केल्यावां-

चून माझें पोट भरत नसे. ( डोळ्यांवाटे प्रेमधारा चालतात. ) आतां प्रेमपान्हा मला कोण पाजील ? बाबा, तुला तरी मला एकटीला त्या दोघां मांगांजवळ टाकून पुढें कसें जाववलें ? अरेरे ! मी चुकलें ! तूं तरी काय करशील ? मला टाकून तूं सुखानें कां गेलास? नाहीं. आपण सर्वत्र निद्रिस्थ असतां दुष्टांनीं कावा साधिला. त्यास तूं काय करशील ? बाबा, तुला त्या दुष्टांनीं आतां कोठें नेलें असेल, आणि काय दुःख दिलें असेल ? हायहाय ! तुमचें वृत्त मला कसें समजेल ? आतां मी लेंकरानें काय करावें ? बरें, त्यांतून मी कोणत्या देशांत व अरण्यांत आलें आहें, हें कांहींच समजत नाहीं. तुह्मी कोठें असाल ? परमेश्वरा, ह्या घेळेस जर मला मार्ग दाखविशील तर तुझे मोठे उपकार होतील. देवा ! एकदां मातापितर आहेत तोंपर्यंत मला नेऊन पोंहचीव. मग पहातें त्या दुष्टांचा चमत्कार ! ! अरेरे ! आतां कशाची ही गोष्ट घडते ! आतां माझे आईस मी पुनः भेटेन काय ? येथेंही दुष्ट लोकांची वस्ती असली तर पुनः काय प्रसंग येईल कोण जाणें ! असें दुःख सागरांत ढकलणें होतें, तर मग असें स्वरूप तरी द्यायचें नव्हतेंस. आतां एकटी राहीन तर निर्भय मला कोण राहूं देतें ? सुमंगले, माझ्या मनांतील विचार तर तूं जाणतच आहेस कीं, भालचंद्रभट म्हणून कोणी विद्वान ब्राह्मण काशीयात्रेहून परत आपले गांवीं जात होता, आणि एक दिवस

आमच्या पर्णकुटींत वस्तीस राहिला होता, त्यानें ज्या मनमोहनाचें स्वरूप वर्णन केलें, ती मूर्ति माझ्या मनांत भरली आहे. आणि त्याच वेळीं मीं शपत नाहीं कां वाहून घेतली ? कीं लग्न करीन तर त्याच राजविंड्याबरोबर करीन, नाहीं तर इतर पुरुष मला बावा ( भुवनपाळ ) समान आहेत. सुमंगले, हा सर्व भाव तुला ठाऊक आहेच. मग एकटी येथें राहीन तर मनांतील हेतु साधेल काय ? कोणीही येऊन मजवर अनर्थ करील. असो. सर्व लाज तुला आहे. ( असें मनाशींच बोलत इकडे तिकडे फिरत आहे इतक्यांत. )

( क्षेमावती व सावित्री प्रवेश करितात. )

क्षे०—सावित्री, अहाहा ! कायगबाई वसंतऋतूची मौज ! जिकडे तिकडे आम्रमोहराचा सुगंध भरून राहिला आहे. मोगऱ्यापेक्षां मोतियाची काय बहार ! मन कसें वेडेंच होतें बाई. शेजारींच जाईजुई पहा, त्यांचा अभिमान हरण झाल्यामुळें अगदीं नम्र होऊन भुईवर पसरल्या आहेत. मला वाटतें मोतियास शरणागत होऊन नमस्कार करीत आहेत. सावित्री तुला कसें वाटतें ?

सा०—खरंच बाईसाहेब. त्यांत नवल तें कोणतें ? मोतिया तरुण दशेस येऊन आनंदानें प्रफुल्लित झाल्यावर जाईजुई कां बरें नम्र होणार नाहींत ? कोणालाही तारुण्यसुख नकोसें आहे काय ?

क्षेमा०—अगे, संपूर्ण वृक्षांस नूतन पल्लव आल्यानें

काय शोभा दिसत आहे! अहाहा! खरोखरीच विश्रांतवन असें यथायोग्य नांव या वनास साजतें. गुलाब, मदनबाण, केतकी, चंपक, गुलेनार, गुलछबू, मर्वा, पाच, बकुली, कितीग हे पुष्पवृक्ष! चहूंकडे दर्वळ सुटला आहे. अहाहा! कोण्या प्राण्यास सुख होणार नाहीं? सावित्रे, ये आपण पलिकडे गर्द छायेंत जाऊं. तिथें जागा तरी किती निर्मळ आहे पाहिलीसना? भोंवतालीं ताडमाड अशोकादिवृक्ष असून छाया किती घनदाट आहे! तसेंच न्याहाळून पहा, एके अंगास पवनगंगा काय स्वच्छोदकानें वहात आहे! अहाहा! मन काय आनंदीत होत आहे! पण सावित्रे, अंगाची अगदीं दुप्पट आग होऊं लागली. कायग हा चमत्कार!! अगे असें हें शीतळस्थळ असतां मलाच कां आग होते?

**सा०**—बाईसाहेब, अशा नुसत्या मनोरम स्थळानें मनमोहनाखेरीज मनोरमा स्त्रीची शांति कशी होईल? उलटा दाह मात्र होणार. कारण, या वेळेस या मनोल्हादक स्थळीं काम बळीस जिंकणारा प्रिय उत्तम पुरुष सन्निध असता तरच तुह्मी सुखी झालां असतां.

**क्षे०**—अग बाई! तूं तर ताळच सोडलास. आपल्या बोलण्यामधीं पुरुषाचेंग नांव कशास?

**सा०**—बाईसाहेब, मी कांहीं तुह्मांला लावून नाहीं बोललें. जें खरें आहे, तें बोलण्यास ब्रह्मदेवाची

१३

तरी भीड कशास व्हावी ? अहो, तरुणीस तरुणाचे संगतीखेरीज वरकड सर्व विलास मिळाले, उपयोग काय ? उलटें विरहदुःख विशेष मात्र होतें. मंदिरांत तांबुलाची तयारी, फराळाची तयारी, पुष्पशय्येचा थाट, जोडीनें पाट, ताटाशेजारीं उभयतांचें ताट, इतकें करून ह्मणाले पहात आहे नेत्र लावून वाट, जसें दुःखास्पद, तसेच सर्व प्रकार.

क्षे०–अहाहा ! एकूण तूं चतुर मैत्रिण खरी. शाबास ! सारख्यास सारखें समवयस्क मिळाल्याखेरीज हृद्गत मोकळें होत नसतें. आतांच पहा, माझ्या मनांतील पेटलेल्या कामाग्नीस तुझ्या भाषणसितोदकानें अंमळ शांत केलें. नाहीं तर कामाग्नीची आणि विरहाग्नीची गांठ पडून एकदम तुंबळ युद्ध झालें असतें. मग त्या वीरश्रीच्या युद्धापुढें म्यां अबलेनें काय वाट केली असती ? असो. सावित्री तपोधन महाराजांचा जो पुत्र माधव नामा, त्यानेंच माझ्या मनास वेडें केलें आहे. सावित्रे, आतां कसें करूं ? बाबांचें आणि तपोधनांचें उभें वांकडें. तेव्हां माधवाचें नांव काढिलें कीं, मग माझें काय होईल आणि काय नाहीं. बाबांचा राग तुला माहित आहेच.

सा०–खरें बाईसाहेब. इतक्या जरी आडचणी आहेत तरी परमेश्वरकृपेनें आपला सर्व हेतु पूर्ण होईल. चला आपण त्या रम्य स्थळीं बसूं.

क्षे०–चल जाऊं. पण अगे सावित्रे, ती पाहिलीस

कां तिथें कोण बसली आहे ती ? अहाहा ! कितीग सुंदरपणा ! वः ! ही कोण असावी ? सावित्रे, तेज पाहिलेंस कां ? अहाहा ! शुद्ध लक्ष्मीच. चल, आपण जवळ जाऊन विचारूं चल. ( **क्षेमावती** आणि **सावित्री** हंसपालिकेजवळ जातात. )

**क्षे०**—हे सुकुमारे, तुझें सुंदरत्व पाहून मी स्त्री असतांही मोहयुक्त झालें, मग पुरुष तर होतीलच. सखे, ह्या बोलण्याचा राग न आणतां तूं आपलें नांव व ज्या शुद्ध उदराचे ठायीं जन्म धारण केलास त्यांचीं नांवें आणि येथें किमर्थ आलीस हें सर्व कृपाकरून सांग. माझे मनांतून तुजशीं सख्य करावें असें आहे, पण बाई तूं मनावर घेशील तेव्हां, कांग सावित्रे ?

**सा०**—सत्य आहे. त्यांनीं तरी ( हंसपालिकेकडे पाहून ) आतां निमूटपणें सांगावें हेंच योग्य.

**क्षे०**—सावित्रे, मुख पहा, पौर्णिमेच्या चंद्रतुल्य असतां मला वाटतें कांहीं तरी चिंता व शोक प्राप्त झाल्यामुळेंच असें फिक्कट झालें असावें. केश पहा, आज किती एक दिवस त्यांना स्नेहस्पर्श मुळींच झाला नसावा असें वाटतें. ही जर आपलें सर्व वृत्त कळवील, तर बाई मला मोठा अप्रातिम आनंद होईल.

**हं०**—अहो प्रियकरणी, मी तर आपलें सर्व वृत्त सांगतेंच, पण त्यापूर्वीं आपलें कळावें अशी माझी इच्छा आहे.

क्षे०—ठीक आहे. कसंग सावित्री ? आपलेंच वृत्त अगोदर सांगावें.

सा०—ठीक आहे. आपलें अगोदर सांगितलें ह्मणून काय हरकत आहे ?

क्षे०—अगे सुंदरी, श्रवण कर. या अरण्यास विश्रांतवन असें ह्मणतात. कारण, हें तसेंच शोभायमान आहे. कसाही प्राणी संतप्त येथें आला तरी तो शांत होतो, पण बाई कामानें संतप्त झालेला मात्र शांत होत नाहीं हो. तो विशेष संतप्त होतो, असो. या वनास पवनगंगेनें आपला आश्रय दिला आहे, यामुळें बहुत साधुवृंदें येथें आनंदानें पर्णकुटींतून नांदतात. पण बाई चोरट्यांचा अड्डा मोठा या ठिकाणीं परवांच येथें एक येथून तीन चार कोसांवर कोणी प्रवासी राजाराणी पर्णकुटींत राहत होते, त्यांना चोरट्यांनीं मारलें ह्मणून ऐकिलें, असो. सांगण्याचें कारण इतकेंच कीं, आह्मीही येथून नजीकच पर्णकुटींत राहतों. माझ्या पित्याचें नांव कृपासागर, मी त्याची कन्या, आणि ही माझेच शेजारीं राहते, ही तपस्व्याचीच कन्या आहे, हिचें नांव सावित्री आणि माझें नांव क्षेमावती. झालें सर्व, आतां तुझें वृत्त सांग, तुला मैत्रिण करण्यास आह्मी फार उतावळ्या झालोंत.

हंस०—ठीक आहे. आतां माझें वृत्त ऐका. (असें ह्मणून झालेलें सर्व वृत्त सांगते.) ऐकलेंना बाई ? जगदंबेची मर्जी,

क्षे०—अरेरे! एकूण तुह्मावर हा प्रसंग ना? असो, परमेश्वर सर्व पार करील. तूं आतां आह्माबरोबर आमचे घरीं चल. ह्मणजे मजवर जो माझ्या बाबांचा लोभ आहे, तोच तुजवर होईल. आणि त्यांचे कृपेनें तूं सर्व आनंद पावशील. काळजी करूं नकोस. तुझ्या चिन्हावरून तुझे दुःखी दिवस सर्व सरले आहेत असें वाटतें.

क्षे०—आतां यापुढें उत्तरोत्तर तुझें कल्याणच होईल. शाबास! हंसपालिके चल आतां आह्माबरोबर.

हंस०—ठीक आहे. तुमची अमृत वाणी श्रवण करून मला अतिशय संतोष झाला. परमेश्वर तुमचें कल्याण करो. चला आतां कृपासागर महाराजांचे पायावर मला घाला, चला.

सा०—चला, बाईसाब, चला. हंसपालिके, चल बाई.

क्षेमा०—हीं मी निघालें. [ सर्व जणी निघून जातात. ]

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

वि०—कां सूत्रधार, खूप मजल पोंचविली बुवा. ज्याला आश्रय नसेल त्याला आश्रय. बिऱ्हाड नसेल त्याला बिऱ्हाड. हा धंदा केव्हांपासून पत्करला? बरें, तें असो. पण कांहो? ते सौंदर्यसागर आणि प्र-

मसागर वगैरे काळुबाईच्या देवळाकडे गेले. आणि मग पुढें? तो सगळा फराळ केला वाटतें ? वः! भारी बुवा चुकतां. चुका तरी किती काढाव्यात ? जेवायला बसलां तरी तुम्ही हातानें घास घेऊन तोंडांतच घालतां, केवढी बरें चूक ही ? वः ! हें काय ?

सू० शाबास ! मुलगा काय, मुलगा पण मुलगा ! शुद्ध बृहस्पती. अरे, सौंदर्यसागर तिकडे गेल्यावर पुढें काय झालें तें दाखवितों. लक्ष्य दे.

वि०–ठीक आहे. दाखवा लवकर. [ निघून जातात. ]

---

## प्रवेश ८.

### स्थळः–काळुबाईचें देऊळ.

### पात्रें.

भुवनपाल ....................राजा.
भुवनसुंदरी...................राणी.
खंडवानाईक..................रामोशी.
सौंदर्यसागर............चंद्रकांताचा पुत्र.

(इतर सर्व रामोशी व सौंदर्यसागराचे सर्व लोक वगैरे.)

भु० पा०–हे जगज्जननी, हे त्रिपुरसुंदरी, हे हंसवाहिने, हे आदिमाये, हे कुलस्वामिनी, हे ब्रह्मांडरक्षके, हे वागेश्वरी, हे तुळजापुरवासिनी, जय सुमंगले मातोश्री, आपली स्तुति सहस्त्रमुखी जो शेप तोही

वर्णन करतां करतां श्रमलो, तर या अल्पमती पामरानें एका मुखानें काय वर्णन करावें! अहाहा! मातोश्री, इच्छामात्रेंकरून निमिषार्धांत सकल ब्रह्मांड उत्पन्न करून पुनः लयास नेतेस ही तुझी शक्ति. ब्रह्मा, शंकर, विष्णु, हीं बालें पालखांत निजवून त्यानांही झोंके देतेस तेथें आह्मा दिन दुर्बल मानवांची कथा काय! तुझी कृपादृष्टि जिकडे फिरेल तिकडे खडेही पद्मराग होतील. मुके बृहस्पतिवत् भाषणें करतील, पंगु पर्वतशिखरें चढतील. अहाहा! काय तुझा महिमा! क्षणांत रंक, क्षणांत राव, हा सर्व तुझ्या इच्छेचा प्रकार. मातोश्री, मनुष्यदेहांत कोण्याही प्राण्यानें आपल्या असलेल्या ऐश्वर्याचा अभिमान करूं नये. कारण, सुखामागें दुःख व दुःखामागें सुख, मनुष्यास समान लागलेंच आहे. तुझ्या इच्छेनें कोण दिवस कसा प्राप्त होईल याचा कांहींच नियम नाहीं. मीच पहा, काय माझें ऐश्वर्य होतें? किती सत्ता, किती मिजास, किती सुख (डोळयावाटें ढळढळां पाणी वाहतें) मातोश्री, तो मी आज या दुष्ट रामोश्यांचे हातीं लागून तुजसमोर बळी यावा काय? मी राज्यावर असतां कोणाशीं दुष्टबुद्धीनें वागलों नाहीं. या हातानें कोणाचें वाईट केलें नाहीं. प्रजेचें तर पुत्रवत् पाळण केलें. असलेल्या संपत्तीचा कधीं गर्व केला नाहीं. गोब्राह्मणांचे ठायीं निरंतर लीन होतों. परस्त्रीस पापदृष्टीनें कधीं

डोळा उचलून पाहिलें नाहीं. मातोश्री, हें सर्व तूं जाणतच आहेस. सर्वांची अंतरसाक्ष तूं आहेस. मी स्वमुखानें काय सांगूं? असें असतां या अनाथावर इतकी क्रोधदृष्टी कां केली? जगदंबे, ह्या अनाथ लेंकराकडून काय अपराध घडला? बरें, जरी झाला असेल, तरी क्षमेचा पूर्ण सिंधु तुजजवळ भरला आहेना? त्यांतून एखादी कृपालाट मज पाप्यावर सोडून मला पावन कां नाहीं केलें? हा दीन कृपाकटाक्षास पात्र नाहीं काय? आजपर्यंत सहस्त्रावधी भक्तांस संकटीं धांवून कृतकृत्य केलेंस, आणि हा भुवनपालच तुला जड झाला काय? मातोश्री, अजूनही तुझें अंतःकरण दयेनें द्रवेल तर तूं काय एक करणार नाहींस? पुराणें तुझी ब्रिदावली गातातना? पूर्वीं हरिणी पाडसासहवर्तमान अरण्यांत विहार करीत असतां, पारध्यांनीं एका आंगानें जाळें लाविलें, दुसरें अंगीं आपण धनुष्य घेऊन उभा राहिला, तिसरेकडे अग्नि पेटविला, आणि चवथे बाजूस शिकारी कुत्र उभें केलें. अशीं एकदम चहूंकडून संकटें उभीं राहिल्यावर जगदंबे, त्या वेळेस तूं किती रूपें धारण केलींस? अशा संकटांतून बिचाऱ्या पाडसासह हरिणीस मुक्त केलेंसना? त्या वेळीं, सश्याचें रूप घेऊन कुत्र्यास कोणी पळविलें? कृपामेघ होऊन अग्नि कोणी विझविला! सर्प होऊन पारध्याच्या आंगठ्यास कोणी दंश केला? अग्निरूपानें जाळें कोणी जाळलें?

जगदंबे, हरिणीसारखा कृपादानास हा दीन पात्र नाहीं काय ? (असें ह्मणून करुणास्वरानें रडूं लागतो.)

खं०—अरे बिव्या ! तूं तर लयच हातपाव पसरलेस. हां बघतां कायरे ? हाना फटका. बिव्याला एक घटकेची फुरसत दिली, म्हन लयच डवल लावला-या. अरे वारे गवश्या. चला याची मान वांकवा देवीच्या पायापं, आन् हाना फटका.

सर्व रामोशी—जी व्हय खंडबा. (ह्मणून सर्व रामोशी हत्यारें वगैरे सांवरून आंगावर धांवतात.)

भु० सुं०—अरे, खंडबा, (धांवत व रडत करुणा स्वरानें) अरे नकोरे मारूं. तुझ्या पायां पडतें. खंड्या नकोरे नको. (मोठ्यानें रडते.) अरे तुला मी सर्व आंगावरील डागिने देतें. तुझें जन्मभर दास्यत्व करीन. अरे देरे दे एवढें चुडदान दे. अरे तुझ्या पायां पडतें, खंडबा, अरे तुझ्या इतक्या विनंत्या केल्या तरी तुला दया येत नाहीं कां ? अरे आह्मीं तुझा अपराध तरी काय केला ? जन्मभर आमचें अन्न खाऊन आम्हावर हत्यार धरतोस हे झाडे कोठें फेडशील ? तूं मागशील तें तुला देईन परंतु माझ्या प्राणनाथास सोडून दे.

सौं०—प्रेमसागर, आतां कां अंत पाहतां ? उठा आणि ध्या सर्वांचा समाचार. भालचंद्रा, त्यांचें दुःख मला आतां पाहवत नाहीं, ती बिचारी साध्वी पहा. त्या खंड्याचें किती अर्जव करती आहे, परंतु त्या दु-

ष्टास कांहीं तरी दया येते कां ? अरे लुच्चा ! ( खंड-बाकडे पाहून. ) हा आलों पहा आतां. गुलामा त्यांचें बदला आतां तुलाच देवीजवळ बळी देतों.

प्रे०—चला सर्व चला. आतां छपून बसणें उपयोगीं नाहीं. या सर्व चोरांना यथास्थित बक्षिसें दिलीं पाहिजेत.

भा०—हो. मी निघालों पहा. पण अगोदर तरवार कशी धरावी, शेंड्याकडून कीं बुडख्याकडून ?

प्रे०—वारे वा ! खूप तरवारबहादर आहेस ! आतां प्रसंग जवळ आला, आणि तूं तरवार धरण्यास शिकणार ? शाबास !

सौं०—त्याला काय भिक्षुकाला माहीत. मोठे शूर सुद्धां प्रसंगीं घाबरतात मग त्याचें काय !

मन्या०—कां राव उगीच गडबड? चला व्हा ह्मोर. ( सौंदर्यसागराकडे पाहून. ) तुह्मी सरकार अंदुगर खंडबाला उडवा, आन परमसागरजी आन मी संमद्यांचा समाचार घेतोंन् काय ? व्हा ह्मोर. बाहेरल्या अंग संमद सिपाई आन सवार उभ केलेत, काय बिसाद है कोनी पळून जाईल !

सौं०—ठीक केलें, मन्याबा, चांगला केलास बंदोबस्त, हे आह्मी उठलोंच. (असें ह्मणून सर्व देवळांत प्रवेश करतात. )

भु० सुं०—अहो दादांनो तुमच्या पायां पडतें. अरे खंडबा, येऊं देरे माझी गरिबाची दया; अरे तुला

मारणेंच आहे तर प्राणनाथांचे अगोदर मला माररे! ह्मणजे मी सौभाग्यावती मरेन. एक घटकेकरितां वैधव्य कां देतां? अहो तुह्मा सर्वांना सांष्टांग नमस्कार करितें. (असें ह्मणून खंडबाची दाढी धरते.)

खं०—चल सोड. मोठी आलिया गिन्यान सांगाया, तुला अंदुगर मारून मग माझी बाईल कोन व्हईल?

भु० सुं०—अरे मेल्या! प्राणनाथास अगोदर मारून मग मला छळणार काय? तुझ्या तोंडाला आग कां लागेना. दुष्टा, काय करूंरे. (मोठ्यानें आक्रोश करते.) हर हर हे परमेश्वरा! हे दीनदयाला, हे कृपासिंधो, हें भक्तवरदायका, हे दुष्टमर्दना, धांवरे धांव. (भुवनपालाकडे पाहून.) प्राणनाथ, आपण मला सोडून जातां! मागें माझी वाट काय? हे मेले मला भ्रष्ट करण्यास इच्छितात. प्राणप्रिया, हीं अक्षरें आपल्या कर्णांस कशीं रुचतात? अहो या वेळेस तुमची मातोश्री सुमंगला कशी हो झोंपीं गेली? आतां काय करूं (असें ह्मणून भुवनपालाचे कंठास मिठी घालते.)

भु० पा०—(भुवनसुंदरीच्या कंठास मिठी घालून व तिला पोटाशीं धरून.) सखे भुवनसुंदरी, काय करूं? माझा कांहींच उपाय चालत नाहीं. तुला सोडून मी सुखानें कां जातों? आतां रडून काय होणार? आई सुमंगलेची मर्जी उगी! हें काय? शेवटचीं अक्षरें ध्यानांत ठेव, मी गेल्यावर तुला लागलींच या

दुष्टांनीं मारलें तर उत्तमच झालें. नाहीं तर तुला र-क्षण करणारी व पातिव्रत्य संभाळणारी एक मातोश्री सुमंगलाच समर्थ आहे. तिच्यावर भरंवसा ठेव, तीच तुझें रक्षण करील. आतां रडूं नकोस. सोड मला. आणिक एक वाईट वाटतें. या वेळेस शेवटीं हंसपा-लिकेची मात्र भेट झाली नाहीं. [ असें ह्मणून भुव-नपाल मोठ्यानें रडतो व भुवनसुंदरीही आक्रोश करते. ]

खं०–अरे बघतां काय ? हं. [ असें म्हणतांच एकच आकांत होतो. ] इतक्यांत आंत शिरून सौंदर्यसागराची जिकडे तिकडे कचाकची करितात.

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

वि०–कां सूत्रधार, मोडली कीं नाहीं इतक्या रा-मोशांची खोड ? मारे कधीं पाहिलें होतें कीं नाहीं असें करून टाकिलें.

सू०–शाबास ! आपण तसेच पराक्रमी.

वि०–पराक्रमी ह्मणजे असे तसे एका किंवा दो-न हत्यारांचे शिपाई आहोंत कीं काय ? हा जवान पंच हत्यारी आहे ! उगीच नाहीं.

सू०–अरे तीं कोणतींरे पंच हत्यारें ? आह्माला उगीच नांवें तर ऐकून माहीत असूंदे?

वि०–अहो. ऐका नांवें. घाला बोटें. म्हणजे प-हा, शत्रू अगदीं तोंडाजवळ आला तर, “ मोठ्यानें

रडावें." हें एक हत्यार. दुसरें, मारूं लागला तर "पाया पडावें." तिसरें, कोणी प्रथमतः लढाईला चला म्हटलें कीं "लुगडें नेसून बांगड्या भरून बसावें." चवथें--

सू०-अरे बाबा पुरे. समजलीं आपलीं पांच हत्यारें! शाबास! एकूण शूर शिपाई खरा. (पाठ थोपटून) शाबास!

वि०-(फुगून व डौलानें.) कांहो सूत्रधार, झालें आटपलें कां तुमचें आख्यान? जाऊं आम्ही घरीं? (हात पुढें करून.) आणा तर आणा खिरापत.

सू०-अरे बुवा मौज काय ती आतां पुढेंच आहे; आणि चाललास कोठें? आतां पुढच्या भागांत तर हंसपालिकेची आणि सौंदर्यसागराची भेट होऊन काय बहार होणार आहे! अरे इतकें झालें तसें शेवटीं भुवनपालास गादीवर बसवून आनंदाचे लाडू खाऊन जा.

वि०-वः! मग तर गंमतच झाली. आमचें काय? इतके जागलों तसे आणखी उजाडेपर्यंत.

सू०-ठीक आहे तर, पहा आतां चमत्कार.

(असें म्हणून निघून जातात.)

# भाग ४.

## प्रवेश १.

स्थळः-विश्रांतवनांतील एक रमणीय जागा.

### पात्रें.

हंसपालिका..................कन्या.
क्षेमावती....................कृपासागरची कन्या.
सावित्री....................ऋषीकन्यका.
सौंदर्यसागर..................चंद्रकांताचा पुत्र.
भालचंद्र....................त्याचा स्नेही.

सौं०-कारे भालचंद्रा, कालचा प्रकार ठीक झाला कीं नाहीं? अरे, जरा आपणास धांवून येण्यास विलंब लागला असता, तर भुवनपाल आणि भुवनसुंदरी जिवंत दृष्टी पडलीं नसतीं. बरें झालें त्यांच्या बदला त्या दुष्टांचेच बळी दिले. भालचंद्रा, यांत माझे बाबास काय मिळालें बरें? विनाकारण बिचाऱ्या भुवनपालाचे पाठीस लागले आहेत. मी खचीत सांगतों परमेश्वराचे घरीं असलीं कृत्यें रुजू नसतात. आपण करावें काय? बाबांचा स्वभाव मला बिलकूल आवडत नाहीं. बिचारा गादीवर बसल्यापासून एक दिवसही प्रजेस सुख नाहीं. ज्याच्या त्याच्या तोंडीं निंदाच ऐकूं येते. आतां करावें तरी काय? मला

पुष्कळ भल्या मंडळींनीं एकांतीं येऊन चंद्रकांता-विषयीं फारच निंद्यकर्म सांगितलीं, पण काय करूं ? जिवाची आग होऊन जाते. प्रत्यक्ष बाप आहे. म्हणून अन्य विचार करतां येत नाहीं. नाहीं तर ठार मारून टाकिलें असतें. कारण, असा राजा काय उपयोगीं ?

भा०—खरें महाराज. धर्मशास्त्रही असेंच आहे कीं, राजा जर अनीतीनें वागेल, तर प्रजेनें त्यास दंड करावा. महाराज, मीसुद्धां दररोज बोभाटे ऐकतों कीं, आज काय सुभेदाराची बायको आणली, उद्यां काय तो गांवांतील संभावित बिचारा त्रिविक्रम शास्त्री त्याची बायको आणा, अशा एक कीं दोन, नित्यशः पांच पन्नास बायकांची विटंबना होत असते. परवांचा फार्स आपणास माहीत असेलच.महाराज, शृंगारपुरीहून आपला स्वार रामसिंग आला त्यानें नाहीं का तो फार्स सांगितला ?

सीं०—कोणरे तो ? माझें नसेल लक्ष तिकडे.

भा०—अहो, धनपाल ह्मणून कोणी सावकार आहे कीं नाहीं भुवनपालाच्या वेळचा ? त्याची बायको फार खुपसुरत आहे. तिलाच रात्रीं धरणें पाठविलें. परंतु तो धनपाल जेव्हां हिरकणी खाऊन प्राण देऊं लागला तेव्हां मग गप्प झालें. महाराज काय सांगावें? प्रजेवर कर तर बसविले, घरपट्टी तर आहेच.

# भाग ४.

## प्रवेश १.

### स्थळ:-विश्रांतवनांतील एक रमणीय जागा.

### पात्रें.

हंसपालिका..................कन्या.
क्षेमावती...................कृपासागरची कन्या.
सावित्री ...................ऋषीकन्यका.
सौंदर्यसागर.................चंद्रकांताचा पुत्र.
भालचंद्र...................त्याचा स्नेही.

सौं०-कारे भालचंद्रा, कालचा प्रकार ठीक झाला कीं नाहीं? अरे, जरा आपणास धांवून येण्यास विलंब लागला असता, तर भुवनपाल आणि भुवनसुंदरी जिवंत दृष्टी पडलीं नसतीं. बरें झालें त्यांच्या बदला त्या दुष्टांचेच बळी दिले. भालचंद्रा, यांत माझे बाबास काय मिळालें बरें? विनाकारण बिचाऱ्या भुवनपालाचे पाठीस लागले आहेत. मी खचीत सांगतों परमेश्वराचे घरीं असलीं कृत्यें रुजू नसतात. आपण करावें काय? बाबांचा स्वभाव मला बिलकूल आवडत नाहीं. बिचारा गादीवर बसल्यापासून एक दिवसही प्रजेस सुख नाहीं. ज्याच्या त्याच्या तोंडीं निंदाच ऐकूं येते. आतां करावें तरी काय? मला

पुष्कळ भल्या मंडळींनीं एकांतीं येऊन चंद्रकांताविषयीं फारच निंद्यकर्मे सांगितलीं, पण काय करूं? जिवाची आग होऊन जाते. प्रत्यक्ष बाप आहे. म्हणून अन्य विचार करतां येत नाहीं. नाहीं तर ठार मारून टाकिलें असतें. कारण, असा राजा काय उपयोगीं?

भा०—खरें महाराज. धर्मशास्त्रही असेंच आहे कीं, राजा जर अनीतीनें वागेल, तर प्रजेनें त्यास दंड करावा. महाराज, मीसुद्धां दररोज बोभाटे ऐकतों कीं, आज काय सुभेदाराची बायको आणली, उद्यां काय तो गांवांतील संभावित बिचारा त्रिविक्रम शास्त्री त्याची बायको आणा, अशा एक कीं दोन, नित्यशः पांच पन्नास बायकांची विटंबना होत असते. परवांचा फार्स आपणास माहीत असेलच. महाराज, शृंगारपुरीहून आपला स्वार रामसिंग आला त्यानें नाहीं का तो फार्स सांगितला?

सों०—कोणरे तो? माझें नसेल लक्ष तिकडे.

भा०—अहो, धनपाल ह्मणून कोणी सावकार आहे कीं नाहीं भुवनपालाच्या वेळचा? त्याची बायको फार खुपसुरत आहे. तिलाच रात्रीं धरणें पाठविलें. परंतु तो धनपाल जेव्हां हिरकणी खाऊन प्राण देऊं लागला तेव्हां मग गप्प झालें. महाराज काय सांगावें? प्रजेवर कर तर बसविले, घरपट्टी तर आहेच.

शिवाय तांबडें पागोटें घालील त्याला तीन रुपये कर. काय हा अनर्थ !! जमिनीचे सारे वाढविले. याशिवाय हजारों प्रकारच्या दुष्ट चाली जबरदस्तीनें पाडून गोरगरिबांची नुकसानी चालविली आहे. महाराज, त्या दुष्ट सिंव्हबल प्रधानाचा इतका खेळ. हल्लीं भुवनपालास मारण्याचा तरी त्याचाच उपदेश. कारण, असें केलें ह्मणजे हंसपालिका हस्तगत होईल. किती जरी केलें तरी त्या दुष्ट ह्मसोबास कां हंसपालिका राजी होणार ? त्याविषयीं तिची खात्री मागेंच झाली आहे. मी जेव्हां काशीयात्रेहून परत येत होतों, तेव्हांच त्यांचे पर्णकुटींत राहिलों होतों, हंसपालिकेचें माझें दोन घटकांपर्यंत एकांतीं बोलणें झालें, त्यांत मनासारखा नवरा मिळेल तरच लग्न करीन, नाहींपेक्षां प्राण गेला तरी ब्रह्मचर्य व्रत सोडणार नाहीं असा तिचा कटाक्ष होता. पण महाराज, त्याच वेळीं मी आपल्या स्वरूपाची तिला तारीफ सांगून आपणाविषयीं मन वळवून ठेविलें होतें; असो, आतां काय उपयोग ? जिवंत असेल तर सार्‍या गोष्टी.

सा०—अरे भालचंद्रा, काय सांगूं? मी अजून तिला समक्ष अवलोकन केली नाहीं, तरी तिजविषयीं मनाचा ग्रह पक्का झाला. आतां तीच प्राप्त होईल तर लग्न करीन; नाहींपेक्षां प्राण गेला तरी ब्रह्मचर्य व्रत सोडणार नाहीं. भालचंद्रा, फार तर काय सांगूं पण तिचा शोध लागेपर्यंत या अरण्यांतच राहीन. कार्य

सफळ झालें तर बरें. नाहीं तर पुनश्च त्या दुष्ट चांडाळांच्या राज्यांत पाऊल न ठेवितां तीर्थयात्रेस निघून जाईन. पण भालचंद्रा, आतां ती भेटेल का ? कोणी दुष्टांनीं तिचे काय हाल केले असतील कोण जाणे !

भा०—महाराज, आपण ध्यास धरून वेडे होऊं नका. आपल्यापेक्षां भुवनपाल आणि भुवनसुंदरी किती शोक करीत आहेत बरें ? त्यांची समजूत कोणी करावी ? तीं मजवळ काय बोललीं आहेत तें सांगू का तुम्हाला ?

सौं०—भालचंद्रा, सांगरे सांग, बिचारा भुवनपाल तुजजवळ काय बोलत होता ?

भा०—महाराज, भुवनपालास सोडवून आणल्यावर त्यानें ईश्वराचे फार आभार मानले, आणि तुमचा फार आभार दर्शवून ईश्वराजवळ तुमच्या कल्याणाविषयीं प्रार्थना केली. नंतर मी जवळ उभा आहें हें पाहून मजजवळ बोलले कीं, आज जर मी राज्यावर असतों, व कन्या जिवंत असती, तर सौंदर्यसागरास जांवई करून लग्न किती समारंभानें केलें असतें ? असो. ईश्वरा, तुझी मर्जी. सरकार, असे भुवनपालाचे सकरुण शब्द ऐकून माझे मनास फार वाईट वाटलें.

सौं०—एकून भुवनपालाचे मनांत मला जांवई करावयाचें आहे काय ? तर मग आतां हंसपालिकेचा शोध थोडासा आणखी दोन कोस करून माघारी जाऊं. आणि भुवनपालास राज्य देण्याची तजवीज करूं.

कारण, अन्यायानें आचरण करणारा पिता जरी असला तरी त्याला दंड करावा असें शास्त्रांत सांगितलें आहे. आणि असें झालें तर सर्व दुनिया माझे आभार मानील यांत संशय नाहीं. आज आठ दहा वर्षांत प्रजा अगदीं जर्जर होऊन गेल्या आहेत. भालचंद्रा, भुवनपालाचे वेळीं, प्रजा किती सुखानें नांदत होती ? असो. आतां सर्व विचार झाला. हा प्रेमसागरास सांगून कार्य करून टाकूं ह्मणजे झालें. बहुधा सेनापतीसह सर्व मंडळी आपल्याला सामील होतील. फक्त रणछोडरायास मात्र यांत घेणें नाहीं. कारण, त्याचा आणि बाबांचा फार स्नेह आहे. झालें, प्रथम अगोदर सिंहबलास कैद केलें पाहिजे. असो. आतां प्रेमसागरचे विचारानें सर्व बेत ठरवूं. चला, एखादें सावज तरी धरूं. शिकारीमुळें फार वेळ लागला असें शोभेल. आपला बहुतेक वेळ यांतच गेला हें कसें सांगावें ? चला आतां एखादें सावज धरूं आणि चालते होऊं. तिकडे प्रेमसागरासह सर्व मंडळी वाट पहात असतील.

भा०-चला. (असें ह्मणून दोघेही पुढें चालूं लागतात.)

भा०-अहो, अहो महाराज तें पहा हरिण !

सौं०-वा ! बरें झालें. हा पहा सोडलाच तीर. पण अरे, हा पहा त्याचयामागें केवढा वाघ लागला आहे तो ?

भा०—हो खरेंच महाराज. आतां मी तर पळतो बुवा! कां झाडावर चढूं? आतां कसें करूं? (थरथर कांपूं लागतो.)

सौं०—हा वेड्या! इतका कां भितोस? मी आहें तोंपर्यंत तुझ्या केसासमुद्धां धक्का लागूं देणार नाहीं. चल फेक माझ्या मागें घोडा. हा पहा सोडला तीर.

भा०—पण महाराज, चुकला तो तीर. आतां?

सौं०—चुकला तर चुकला. त्याला मारल्याखेरीज मागें परतायचें नाहीं. चल घोड्यास टांच मार. बिशाद काय त्याची! हा पहा दुसरा तीर. (असें ह्मणत सौंदर्यसागर व भालचंद्र घोडे उडवीत वाघामागें लागतात. इतक्यांत)

सा०—बाई क्षेमावती, चलाग चला लवकर! पळा. तो पहा हरिण पळत येत आहे, आणि त्याच्या मागें वाघ लागला आहे.

क्षे०—खरेंच. पण मागें पहा, दोघेंजण घोडे उडवीत कोण येत आहेत बाई?

सा०—अग पळा लवकर. ते पहा आले जवळ. (दोघीही वेड्यासारख्या होऊन थरथर कांपतात, व कोठें पळावें अशा गडबडून जातात. इतक्यांत.)

हं०—क्षेमावतीबाई, आपण घाबरूं नका. वाघाची बिशाद काय! हा पहा सोडतें तीर. (असें ह्मणून हंसपालिका तीर सोडून हरिणास व वाघास दोघांसही खालीं पाडते.)

क्षे०—शाबास ! बाई शाबास! काय तुझा पराक्रम ! ते दोघे पहा कितीएक कोश मागें लागून आले आहेत; परंतु तूं सहज एका तिरानें दोघांसही चित केलेंस. शाबास! स्त्रीजात होऊन कायग हा पराक्रम ! !

सा०—खरंच बाई, सर्व गुणानें संपन्न आहांत. (इतक्यांत सौंदर्यसागर व भालचंद्र जवळ येतात. )

सौं०— अहाहा! भालचंद्रा, हीच कारे चारुगात्री ? अरे काय हा पराक्रम! ( तोंडांत बोट घालून ) काय सुंदर स्वरूप! अरे एकदम माझे सर्व पुण्याईचें फळ आज प्राप्त झालें काय ? अहाहा ! भालचंद्रा, हरणामागें फार कोस पळत आल्याचा सर्व श्रम परिहार होऊन, हा मुखचंद्र पाहतांच शांत झालों. भालचंद्रा, हीच कारे हंसपालिका ? ही जर नसेल, तर माझी प्रतिज्ञा आतां भंग होणार. मघां तुला शपथपूर्वक सांगितलें कीं, हंसपालिकेवांचून लग्न करणार नाहीं. पण ही चारुगात्री पूर्वींच पाहिली असती, तर अशी घातक प्रतिज्ञा कधींच केली नसती. भालचंद्रा, हीच कारे हंसपालिका ? अरे मी नुकतीच केलेली प्रतिज्ञा भंग करण्याकरितां भिल्लिणीच्या रूपानें मातोश्री पार्वतीच भूमितलावर आली काय ? अहाहा ! अरे, सकाळपासून दोन प्रहरपर्यंत पळत या वाघामागें लागलों, पण सहस्त्रावधी तीर फुकट गेले. आणि या मृगनयनेनें क्षणांत एका तीरानें सहज दोन्ही श्वा-

पदें मारलीं. वः! काय पराक्रम ! ! सांगरे सांग हीच कां ती सुंदरी ? भालचंद्रा, नीट न्याहाळून पहा. बांधा सडपातळ असून सुकुमारपणा किती आहे ? कांती सुवर्णचाम्प्यास नाहीं कां लाजविणार ? अहाहा! एवढा मोठा वाघ मारला, त्यानें भालचंद्रा, हातास फोड आले असतील. आतां कसें करूं ? अरे माझ्या मनास भंग करण्यासच जर हा उपाय योजिला असेल, तर मग इतके श्रम कशाला पाहिजे होते ? नुसत्या नेत्रांच्याच शरानें मी स्वाधीन झालों असतों. हा शस्त्रशर कशाला तिनें सोडला ? घातुक श्वापदें मेलीं, आणि मी घायाळ झालों. काय तीव्रशर ! ! ! अरे, त्या शस्त्रशरानें श्वापदांचे प्राणच हरण केले इतकें नाहीं, तर माझें मनही तो घेऊन गेला. आतां काय करूं ? ही एक शब्द तरी या हतभाग्याबरोबर बोलेल काय ? भालचंद्रा, हीच कां ती मृगलोचना ? अरे, काजळी शालू ऐटदार नेसून मागच्या चुण्यांचा कसा कासोटा घातला आहे ! कंचर अगोदरच सिंहाकृती, आणि त्यांत भरजरी लफ्याचा पदर कसा खुबीनें आडवा बांधला आहे ! अहाहा! केशभाग पाहून विषयसमुद्रास भरतें येतें. अरे भालचंद्रा, केश किती कुटील, पश्चात्‌भागीं किती लांब पडले ! मला वाटतें ही आजच न्हाली असावी, अहाहा! हा आतां सुगंधीक वायु आला, हा तिच्याच देहावरील. वः ! अष्ट दिशांस तिच्या देहाचा सुगंध भरून गेला आहे ! वा ! अरे

भालचंद्र, अरे, आतां नीट पहा. इतका वेळ ती पाठमोरी उभी होती. अहाहा ! हा खरोखरीच चंद्रोदय झाला कांरे ? ब्रह्मदेवा ! शर्थ झाली तुझ्या कसब्याची! अरे, हिला घडवितांना तूं फार आनंदांत होतास असें वाटतें. अहाहा ! चंद्राची तरी उपमा कशी द्यावी ? क्षयरोगी बेटा ! अंः! भालचंद्रा, हिच्या सौंदर्यास उपमा तरी कशाची द्यावी ? वरून काजळी शालूचा पदर घेतला आहे, तो फारच पातळ असल्यामुळें आंतील काचोळी सर्व दिसत आहे. अहाहा ! कोण भाग्यवंत तेथें हस्तस्पर्श करण्यास अवतरला असेल ? भालचंद्रा, कंचुकींत काय लपविलें आहे, तें मी जाऊन विचारूं कां ? अरे हातांत तिरकमठा, कास मारलेली, मस्तकावर सुवासिक पुष्पें, इत्यादि थाटानें पुराणांतील भिल्लिणीचें मला वारंवार स्मरण होतें. भालचंद्रा, हीच कां ती सुहास्यवदना ?

भा०–( मनाशींच ) मघांपासून हीच कां हंसपालिका हीच कां हंसपालिका असें मला कां विचारित आहे, पण इतक्यांत सांगूं नये. कारण, एकदां हीच हंसपालिका असें सांगितलें तर हा कामवयास झालेला गृहस्थ एकदम काय प्रकार करील कोण जाणें. म्हणून जरा धीरसो गंभीर. बाकी मला तिनें ओळखिलें असेल यांत संशय नाहीं.

सौं०–भालचंद्रा, एकदां सांग हीच कां हंसपालिका ? जर हीच ती असेल, तर तिला सांग कीं, मीं

सांगितलेला सौंदर्यसागर तो हाच. पूर्वीच्यावरून तिची तुझी ओळख पक्की असेलच. तर मग बोल लवकर. हीच कां ती ?

भा०—महाराज, हीच असें सांगितलें, आणि तुझाविषयीं तिजजवळ शिफारस केली तर मज गरिबास प्रसन्न होऊन काय द्याल ?

सौ—अरे वेड्या ! तुला काय पाहिजे आहे? अरे, हीच जर हंसपालिका असेल तर मग मला दुसरें कांहीं नको. बाबास राज्यावरून काढिलें कीं भुवनपाल राजा, आणि तूं दिवाण. वाटेल तसें राज्य चालवा. शिवाय शेवटपर्यंत तूं जसें सांगशील, तसा मी वागेन. आणि मला तूं सुंदर बायको दिलीस ह्मणून मीही तुला एक सुंदर स्त्री करून देईन. झालेंना ? आणखी काय मागतोस ? अरे, मला ह्या प्राणप्रियेपेक्षां दुसरी कोणतीच प्रिय वस्तु नाहीं. राज्य नको, घर नको, फार तर काय, एक वेळ हिच्या भेटीकरितां हा माझा देह गेला तरी बेहेतर! भालचंद्रा, सांगरे सांग. अरे, आतां माझ्यानें दम धरवत नाहीं. प्रियसखीस केव्हां आलिंगन देईन असें झालें आहे ? अहाहा ! त्या लाल व नाजुक ओष्ठाचें चुंबन मला मिळेल काय ? उगीच थट्टेनें, व या माझ्या मृदु हस्तानें ते रसरसित व सुंदर गाल धरण्यास सांपडतील काय ? तिचे सकाम नेत्रकटाक्षांस हा देह पात्र होईल काय ? सुवर्णवर्णासारखा वक्षस्थळीं ह्या क्षुधातुर ह-

स्तांचा प्रवेश होईल काय? हा हिचा सुवासिक केशांचा समुदाय माझ्या पुष्पयुक्त पलंगावर मनेच्छा विहार करील काय? कोकिलेसारख्या स्वरानें "प्राणनाथ" अशी हिच्या तोंडचीं अक्षरें माझ्या कानीं पडतील काय? भालचंद्रा, इतकी पुण्याई या हतभाग्याची आहे काय? हिच्या सौख्यसमुद्रांत सौंदर्यसागर हाच कोणी एक मत्स्य क्रीडा करण्यास इच्छितो, पण तें सर्व तुझ्या हातीं आहे. म्हणून बा भालचंद्रा, आतां नकोरे अंत पाहूं. अरे, मत्स्य जीवनावांचून तळमळत आहे. एकदां दे सौख्यसमुद्रांत ढकलून.

( असें ह्मणून मूर्छित होतो. )

**भा०**— हं हं. महाराज? हें काय? आपण असे घाबरे कां होतां? अहो हंसपालिका ती हीच. सावध व्हा. ब्रह्मदेवानें ती आपलीच राणी होण्याकरितां हिला निर्माण केली आहे. असें असतां असे अधीर कां होतां? ( असें म्हणून नेत्रांस पाणी लावून पदरानें वारा घालून सावध करितो. )

**हं०**—( मनाशींच ) अहाहा! कायगबाई हे राजबिंडे! भालचंद्रभट बरोबर आहेत, त्यावरून त्यांनीं सांगितलेला मनमोहन हाच असावा. अरेरे! एकूण मजकरतां ह्या सुकुमार देहास येथपर्यंत यावें लागलें ना? वाटेनें ऊन लागल्यामुळें मुख कसें म्लान होऊन उतरून गेलें आहे! अहाहा! काय बाई ही शरिरांची ठेवण! ( मनाशींच ) अगे हंसपालिके, भरजरी

मंदील काय ऐटदार बांधला आहे पाहिलासना ? कपाळ किती मोठें, भिंवया कशा धनुष्याकृती, नासिका किती सरळ ! अहाहा ! केशरी गंध घामानें कपाळभर झालें आहे. कानांत पाचेची बिगबाळी असल्यानें उजवा गाल हिरवागार दिसत आहे पाहिलासना ? अहाहा ! ओंठ सुकुमार असून तांबुलानें कसे लालबुंद दिसतात बरें ? नको नको. (कडकडा बोटें मोडून) माझी दृष्ट होईल एखादी. किती खालवर पाहूं. देवा! भालचंद्रानें सांगितलेला हाच राजपुत्र असला तर बरें. नाहीं तर केलेली प्रतिज्ञा व्यर्थ जाईल असें वाटतें. जयसुमंगले, माझी प्रतिज्ञा भंग करण्यास हा प्रत्यक्ष मदनच पाठविलास कीं काय ? अहाहा ! मदनाची कां उपमा मी यास देतें ? छीः! मदन कांहीं यांच्यापेक्षां सुंदर नसेल. मदनाचा संचार संनिधान झाला असतां आंगाचा दाह होतो. पण प्रियकराचें संनिधान झालें तर दाह शांत होतो. मग मी मूर्खपणानें मदनाची उपमा कशी देतें ? बरें, हंसपालिके, या सुंदरास आतां विष्णूची उपमा द्यावी. ( पुनः मनाशींच ) छीः! विष्णूची उपमा तर अगदींच उपयोगीं नाहीं. कारण, विष्णूसारखा व्यभिचारी पुरुष दुसरा कोणीच नाहीं. परवांच्याच अध्यायांत नाहीं कां कृपासागरांनीं कथा सांगितली ? कीं गोकुळांत कृष्णानें किती भंडवाडा केला, आणि शेवटीं कुब्जेबरोबर रत झाला. आणि आजच नाहीं कां कथा ऐकली ? कोण तो दैत्य, काय

भालचंद्र, अरे, आतां नीट पहा. इतका वेळ ती पाठमोरी उभी होती. अहाहा ! हा खरोखरीच चंद्रोदय झाला कांरे ? ब्रह्मदेवा ! शर्थ झाली तुझ्या कसबाची! अरे, हिला घडवितांना तूं फार आनंदांत होतास असें वाटतें, अहाहा ! चंद्राची तरी उपमा कशी द्यावी ? क्षयरोगी बेटा ! अंः! भालचंद्रा, हिच्या सौंदर्यास उपमा तरी कशाची द्यावी ? वरून काजळी शालूचा पदर घेतला आहे, तो फारच पातळ असल्यामुळें आंतील काचोळी सर्व दिसत आहे. अहाहा ! कोण भाग्यवंत तेथें हस्तस्पर्श करण्यास अवतरला असेल ? भालचंद्रा, कंचुकींत काय लपविलें आहे, तें मी जाऊन विचारूं कां ? अरे हातांत तिरकमठा, कास मारलेली, मस्तकावर सुवासिक पुष्पें, इत्यादि थाटानें पुराणांतील भिल्लिणीचें मला वारंवार स्मरण होतें. भालचंद्रा, हीच कां ती सुहास्यवदना ?

भा०-( मनाशींच ) मघांपासून हीच कां हंसपालिका हीच कां हंसपालिका असें मला का विचारित आहे, पण इतक्यांत सांगूं नये. कारण, एकदां हीच हंसपालिका असें सांगितलें तर हा कामव्याप्त झालेला गृहस्थ एकदम काय प्रकार करील कोण जाणें. म्हणून जरा धीरसो गंभीर. बाकी मला तिनें ओळखिलें असेल यांत संशय नाहीं.

सौं०-भालचंद्रा, एकदां सांग हीच कां हंसपालिका ? जर हीच ती असेल, तर तिला सांग कीं, मीं

सांगितलेला सौंदर्यसागर तो हाच. पूर्वीच्यावरून तिची तुझी ओळख पक्की असेलच. तर मग बोल लवकर. हीच कां ती ?

भा०—महाराज, हीच असें सांगितलें, आणि तुझाविषयीं तिजजवळ शिफारस केली तर मज गरिबास प्रसन्न होऊन काय द्याल ?

सौं—अरे वेड्या ! तुला काय पाहिजे आहे? अरे, हीच जर हंसपालिका असेल तर मग मला दुसरें कांहीं नको. बाबास राज्यावरून काढिलें कीं भुवनपाल राजा, आणि तूं दिवाण. वाटेल तसें राज्य चालवा. शिवाय शेवटपर्यंत तूं जसें सांगशील, तसा मी वागेन. आणि मला तूं सुंदर बायको दिलीस ह्मणून मीही तुला एक सुंदर स्त्री करून देईन. झालेंना ? आणखी काय मागतोस ? अरे, मला ह्या प्राणप्रियेपेक्षां दुसरी कोणतीच प्रिय वस्तु नाहीं. राज्य नको, घर नको, फार तर काय, एक वेळ हिच्या भेटीकरितां हा माझा देह गेला तरी बेहेतर! भालचंद्रा, सांगरे सांग. अरे, आतां माझ्यानें दम धरवत नाहीं. प्रियसखीस केव्हां आलिंगन देईन असें झालें आहे ? अहाहा ! त्या लाल व नाजुक ओष्ठाचें चुंबन मला मिळेल काय ? उगीच थट्टेनें, व या माझ्या मृदु हस्तानें ते रसरसीत व सुंदर गाल धरण्यास सांपडतील काय ? तिचे सकाम नेत्रकटाक्षांस हा देह पात्र होईल काय ? सुवर्णवर्णासारखा वक्षस्थळीं ह्या क्षुधातुर ह-

स्तांचा प्रवेश होईल काय? हा हिचा सुवासिक केशांचा समुदाय माझ्या पुष्पयुक्त पलंगावर मनेच्छा विहार करील काय? कोकिलेसारख्या स्वरानें "प्राणनाथ" अशी हिच्या तोंडचीं अक्षरें माझ्या कानीं पडतील काय? भालचंद्रा, इतकी पुण्याई या हतभाग्याची आहे काय? हिच्या सौख्यसमुद्रांत सौंदर्यसागर हाच कोणी एक मत्स्य क्रीडा करण्यास इच्छितो, पण तें सर्व तुझ्या हातीं आहे. ह्मणून बा भालचंद्रा, आतां नकोरे अंत पाहूं. अरे, मत्स्य जीवनावांचून तळमळत आहे. एकदां दे सौख्यसमुद्रांत ढकलून.

( असें ह्मणून मूर्छित होतो. )

भा०— हं हं. महाराज? हें काय? आपण असें घाबरे कां होतां? अहो हंसपालिका ती हीच. सावध व्हा. ब्रह्मदेवानें ती आपलीच राणी होण्याकरितां हिला निर्माण केली आहे. असें असतां असे अधीर कां होतां? ( असें म्हणून नेत्रांस पाणी लावून पदरानें वारा घालून सावध करितो. )

हं०—( मनाशींच ) अहाहा! कायगबाई हे राजबिंडे! भालचंद्रभट बरोबर आहेत, त्यावरून त्यांनीं सांगितलेला मनमोहन हाच असावा. अरेरे! एकूण मजकरतां ह्या सुकुमार देहास येथपर्यंत यावें लागलें ना? वाटेनें ऊन लागल्यामुळें मुख कसें म्लान होऊन उतरून गेलें आहे! अहाहा! काय बाई ही शरिरीची ठेवण! ( मनाशींच ) अगे हंसपालिके, भरजरी

मंदील काय ऐटदार बांधला आहे पाहिलासना? कपाळ किती मोठें, भिवया कशा धनुष्याकृती, नासिका किती सरळ! अहाहा! केशरी गंध घामानें कपाळभर झालें आहे. कानांत पाचेची बिगबाळी असल्यानें उजवा गाल हिरवागार दिसत आहे पाहिलासना? अहाहा! ओंठ सुकुमार असून तांबुलानें कसे लालबुंद दिसतात बरें? नको नको. (कडकडा बोटें मोडून) माझी दृष्ट होईल एखादी. किती न्हाळवर पाहूं. देवा! भालचंद्रानें सांगितलेला हाच राजपुत्र असला तर बरें. नाहीं तर केलेली प्रतिज्ञा व्यर्थ जाईल असें वाटतें. जयमुमंगले, माझी प्रतिज्ञा भंग करण्यास हा प्रत्यक्ष मदनच पाठविलास कीं काय? अहाहा! मदनाची कां उपमा मी यास देतें? छीः! मदन कांहीं यांच्यापेक्षां सुंदर नसेल. मदनाचा संचार संनिधान झाला असतां आंगाचा दाह होतो. पण प्रियकराचें संनिधान झालें तर दाह शांत होतो. मग मी मूर्खपणानें मदनाची उपमा कशी देतें? बरें, हंसपालिके, या सुंदरास आतां विष्णूची उपमा द्यावी. (पुनः मनाशींच) छीः! विष्णूची उपमा तर अगदींच उपयोगीं नाहीं. कारण, विष्णूसारखा व्यभिचारी पुरुष दुसरा कोणीच नाहीं. परवांच्याच अध्यायांत नाहीं कां कृपासागरांनीं कथा सांगितली? कीं गोकुळांत कृष्णानें किती भंडवाडा केला, आणि शेवटीं कुब्जेबरोबर रत झाला. आणि आजच नाहीं कां कथा ऐकली? कोण तो दैत्य, काय

मेलं नांव त्याचं? ( घोंटाळून ) तो जेव्हां मरेना, तेव्हां विष्णूनें जाऊन त्यांच्या बायकोचें पातिव्रत्य भंग केलें. असा तो विष्णु. आणि त्याची कां बरोबरी माझ्या प्राणप्रियास देऊं ? छीः ! मग्गां पहाना, मला पाहून प्रियकराची कशी अवस्था झाली ? बरें झालें, भालचंद्रानें सावध केलें, नाहीं तर माझा बाई जीव घाबरून मी जवळ जाणार होतें. अहाहा ! ! सुमंगले, हें रत्न मला लाधेल काय? हा जर मला पति देशील, तर तुझे प्रीत्यर्थ लक्ष ब्राह्मणांस इच्छाभोजन घालीन. एक हजार सुवासिनींना इच्छा वायनें देईन. दहा हजार दंपत्यांस सुवर्णालंकार देईन. आई जगदंबे, ह्या पुरुषाचें दास्यत्व मला देशील काय ? या सुंदराच्या अर्धांगीं बसण्यास मी पात्र आहें काय ? ( पुनः मनाशींच ) अगे हंसपालिके, तूं आपले मनांत मांडे पुष्कळ खातेस, परंतु ही गोष्ट त्यांनीं पतकरली पाहिजेना? अरेरे ! एवढें मात्र कठिण दिसतें; कारण, त्यांचे स्वरूपास मी शोभणार नाहीं, तेव्हां ते अंगीकार कसा करतील? हर हर ! आतां काय करूं? एकूण या राजीवाक्षाचे सुकुमार ओष्ठाचें चुंबन मिळणें माझे प्राक्तनीं नाहीं असें वाटतें. अहाहा ! या माझ्या कठोर हातानें ते आपल्या सुंदर कंठास आलिंगन करूं देतील कां ? मला असें वाटतें कीं, मीं प्राणप्रियकराची अगदीं आवडती व्हावें. आणि मग जसें कांहीं कारणानें मीं त्यांच्यावर रुसावें, आणि मग त्यांनीं मला जवळ घे-

ऊन समजवावें. जगदेव, हे माझे लाडके हेतु पुरवि- शील काय ? अहाहा ! असा सोन्याचा दिवस पाहण्याची या हतभाग्य देहाची पुण्याई आहे कोठें ? जर असें होत नाहीं, तर हा देह वांचून तरी काय उपयोग आहे ?" चला, त्या विहिरीवर जाऊं आणि एकदाचे यांतून सुटूं. कारण, आतां मला दम धरवत नाहीं. माझ्या विषयसमुद्रास भरती आली. हा मेला मदन तरी काय ? मेल्या मदना, अरे, आह्मी खरोखरी अबला. आह्मापुढें तूं आपला पराक्रम कां दाखवितोस? सामर्थ्य असेल तर माझे प्रियकराकडे जा. ह्मणजे माझेंही काम होईल, आणि तुझाही पुरुषार्थ कळेल. हारे द्वाडा! चल निघ येथून. पुरुषांपेक्षां आह्माला अष्टगुणित कां छळतोस ? उभयतांस छळशील तर सर्वांचेच काम होईल.

( असें ह्मणून मूर्छित होते. )

क्षे०—हं हं. हंसपालिके, हें काय, अशी बेसावध कां झालीस ? आणि वेड्यासारखें काय करतेस ?

सा०—अहो, पाणी आणा लवकर. वारा घाला वारा घाला. मला वाटतें कांहीं तरी झडप झाली असावी. ( हंसपालिकेस सावध करतात. )

क्षे०—कायग बाई ! तूं एकाएकीं अशी कां झालीस ?

हं०—कांहीं नाहीं बाई. उगीच झोंपेची डुकली चिकली आली असेल. आणिक कांहीं नाहींग बाई.

क्षे०–अग, तूं जरी चोरलंस तरी मीं वोळखलं हो. कारण, आपल्यावरून दुसऱ्याचं ताडावं. खरं-कां नाहीं गडे सावित्री ?

सा०–हो, तें खरं बाई. तुमचान् माधवाचा जसा परवां थाट उडाला, तशापैकींच कांहीं हें असेल.

क्षे०–छेग आमचा कशाचा थाट ! पण बाई हंसपालिकेला आतां काय झालें तें वोळखलं कां ? ते समोर वाघाचे मागें दोघे पळत आलेत ते, त्यांत जो श्यामसुंदर मनमोहन राजबिंडा दिसतो तो ? त्याकरतांच हिची बाई ही अशी अवस्था झाली बरं.

सा०–खरंच गडे आतां वोळखलं. अहाहा ! ती मूर्तीच तशी आहे. मला वाटतें मघांशीं तोही घाबरा झाला होता तो इच्याचकरतां.

क्षे०–अग, खऱ्या रीतीनें जर पाहिलें तर या दोघांचं परस्पर प्रेम पाहून मला संतोष झाला. संसारांत दुसरें सुख तें कोणतें ? स्त्री-पुरषांची खरी प्रीति असणें हेंच सुख. एकून जोडा अमोल बाई. उभयतांचे हेतु पूर्ण झाले तर तो केवळ मदन आणि ही रतीच.

सा०–अहाहा ! मला तर फार आनंद झाला. ईश्वर करो, आणि या दोघांचें प्रेम जुळो,

क्षे०–हंसपालिके, झाल्या गोष्टी आतां येत नाहींत. परंतु खरंच सांग ? तुझे मनानें तिकडेच धांव घेतलीना ? एरवीं तुमचें प्रेम पाहून आह्मांला संतोष

झाला. पण एकदां तूं आपलें तोंडानें सांगेनास ?

हं०—तर मग खरेंच सागूं बाई ? मी कांहीं या वेळेस शुद्धीवर नाहीं. माझा देह तुह्माशीं बोलत आहे, आणि प्राण व मन सर्व त्या रूपीं गुंतलें आहे. कृपा करा आणि आह्मा उभयतांचा गंधर्व विवाह करण्यास तुमची व ( कृपासागराची ) वडिलांची परवानगी द्या ह्मणजे झालें.

क्षे०—अगे, आह्मी तर आनंदानें रजा देतों, पण तिकडचा पूर्ण विचार समजला कां ? कां तूंच आपले मनांत मांडे खातेस ?

सा०—हो. तेवढा खास शोध काढशील तेव्हां ना?

हं०—खरंच बाई. इतका वेळ मूर्खाप्रमाणेंच मी तुह्माशीं बोललें. तो कोण ? जात कोण? माझ्या मनांत आहे तसें त्यांचे मनांत आहे कीं नाहीं वगैरे कांहींच खुलासा काढला नाहीं. आणि मनांतच गंधर्व विवाह करीत होते पण बाई आतां कसें करूं ?

क्षे०—अगे हंसपालिके, आह्मी दोघीजणी आतां घरीं जातों, आणि तूं येथेंच क्षणभर एकटी रहा. ह्मणजे तो उत्सुक झालेला राजपुत्र खचित तुझ्याशीं भाषण करील. खरें कीं नाहीं बरं सावित्री ? अग, दोघांच्या प्रेमसंकेतांत आतां आपण कशास बसावें?

सा०—क्षेमावतीबाई, आपण खरें बोललांत. कारण स्वतः अनुभव आहेच.

क्षे०—अहाहा ! ( मनांत थोडा आनंद व थोडा

क्षे०-अग, तूं जरी चोरलंस तरी मीं वोळखलं हो. कारण, आपल्यावरून दुसऱ्याचं ताडावं. खरं-कां नाहीं गडे सावित्री ?

सा०-हो, तें खरं बाई. तुमचान् माधवाचा जसा परवां थाट उडाला, तशापैकींच कांहीं हें असेल.

क्षे०-छेग आमचा कशाचा थाट ! पण बाई हंसपालिकेला आतां काय झालें तें वोळखलं कां ? ते समोर वाघाचे मार्गे दोघे पळत आलेत ते, त्यांत जो श्यामसुंदर मनमोहन राजबिंडा दिसतो तो ? त्याकरतांच हिची बाई ही अशी अवस्था झाली बरं.

सा०-खरंच गडे आतां वोळखलं. अहाहा ! ती मूर्तीच तशी आहे. मला वाटतें मघांशीं तोही घाबरा झाला होता तो इच्याचकरतां.

क्षे०-अग, खऱ्या रीतीनें जर पाहिलें तर या दोघांचं परस्पर प्रेम पाहून मला संतोष झाला. संसारांत दुसरं सुख तें कोणतें ? स्त्री-पुरषांची खरी प्रीति असणं हेंच सुख. एकून जोडा अमोल बाई. उभयतांचे हेतु पूर्ण झाले तर तो केवळ मदन आणि ही रतीच.

सा०-अहाहा ! मला तर फार आनंद झाला. ईश्वर करो, आणि या दोघांचें प्रेम जुळो.

क्षे०-हंसपालिके, झाल्या गोष्टी आतां येत नाहींत. परंतु खरंच सांग ? तुझे मनानें तिकडेच धांव घेतलीना ? एरवीं तुमचें प्रेम पाहून आह्माला संतोष

झाला. पण एकदां तूं आपलें तोंडानें सांगेनास ?

हं०—तर मग खरेंच सांगूं बाई ? मी कांहीं या वेळेस शुद्धीवर नाहीं. माझा देह तुह्माशीं बोलत आहे, आणि प्राण व मन सर्व त्या रूपीं गुंतलें आहे. कृपा करा आणि आह्मा उभयतांचा गंधर्व विवाह करण्यास तुमची व ( कृपासागराची ) वडिलांची परवानगी द्या ह्मणजे झालें.

क्षे०—अगे, आह्मी तर आनंदानें रजा देतों, पण तिकडचा पूर्ण विचार समजला कां ? कां तूंच आपले मनांत मांडे खातेस ?

सा०—हो. तेवढा खास शोध काढशील तेव्हांनां?

हं०—खरंच बाई. इतका वेळ मूर्खाप्रमाणेंच मी तुह्माशीं बोललें. तो कोण ? जात कोण? माझ्या मनांत आहे तसें त्यांचे मनांत आहे कीं नाहीं वगैरे कांहींच खुलासा काढला नाहीं. आणि मनांतच गंधर्व विवाह करीत होते पण बाई आतां कसें करूं ?

क्षे०—अगे हंसपालिके, आह्मी दोघीजणी आतां घरीं जातों, आणि तूं येथेंच क्षणभर एकटी रहा. ह्मणजे तो उत्सुक झालेला राजपुत्र खचित तुझ्याशीं भाषण करील. खरें कीं नाहीं बरं सावित्री ? अग, दोघांच्या प्रेमसंकेतांत आतां आपण कशास बसावें?

सा०—क्षेमावतीबाई, आपण खरें बोललांत. कारण स्वतः अनुभव आहेच.

क्षे०—अहाहा ! ( मनांत थोडा आनंद व थोडा

विरह वाटून ) मलाग बाई कशाचा अनुभव ? कदाचित् तुझ्याच मनांत असेल.

सा०–( आपण भालचंद्रास मोहित झालों, हें क्षेमावतीनें ताडलें असें जाणून ) क्षेमावतीबाई, सर्वांची एकच वाट आहे. एकमेकांस कांहीं नांव ठेवण्यास नको.

क्षे०–असं. असं वाटेवर ये; चल तर आतां जाऊं. कारण आतां जितके क्षण आपणास येथून जाण्यास जास्त होतील, तितकीं वर्षें हंसपालिकेस होणार आहेत, ह्मणून चल कशी बाई.

सा०–ही पहा मी चाललें. ( दोन तीन पावलें पुढें जाऊन पुनः माघारी फिरते. ) पण हंसपालिके, ( हळूच ) अग आपल्याच पोटावर मात्र नजर देऊं नकोस समजलीस का !

हं०–( हंसून ) नाहींग बाई. मी समजलें. जमलें तर लागलीच तुलाही सुखाची अधिकारी करीन! ( लाजून ) स्वारी बरोबर जे दुसरे गृहस्थ आहेत, ते माझ्या ओळखीचे आहेत. आणि परवां मला भेटले होते, तोंपावेतों त्यांचें लग्नही झालें नव्हतं, आणि आतां तरी त्यांचें लक्ष पहा तुजकडेच लागलें आहे. तेव्हां या सर्व चिन्हांवरून परमेश्वर तुझी ही इच्छा पूर्ण करील ह्यांत संशय नाहीं.

क्षे०–( तोंड गोरेंमोरें करून. ) मग काय मीच तनढी राहिलेंना ? बरं देवाची मर्जी.

हं०—अहो क्षेमावती, आपले वडील जे कृपासागर यांचा लोभ मजवर फारच आहे. आणि आलिकडे नेहमीं मजवरच फार प्रीति करतात. आणि मी कांहीं एखादें अचाट काम केलें, किंवा चमत्कारिक शिकार वगैरे केली, किंवा मनास आनंद होण्यासारखे शब्द बोललें, तर लागलीच स्वारी प्रसन्न होते आणि कांहीं माग ह्मणून मला ह्मणते, हें तुह्मीं सुद्धां पुष्कळ वेळां पाहिलें असेल. तेव्हां बाई अशी आतां कधीं वेळ आली कीं लागलीच तुम्हाला माधवास देण्याविषयीं वचन घेऊन ठेवतें. ह्मणजे झालेंना काम ?

क्षे०—( लाजून ) तूं बाई मोठी चतुर आहेस. तुझ्या इच्छेप्रमाणें कर. आह्माला मात्र विसरूं नकोस. कारण, बाबा नेहमीं ह्मणत असतात कीं, हंसपालिका पृथ्वीची स्वामिणी होईल. तर ईश्वरइच्छेनें ऐश्वर्य येवो हीच आमची इच्छा आहे. पण बाई आह्माला मात्र विसरूं नको. कां सावित्री, खरं कीं खोटं ?

सा०—खरं आहे बाई. चला आतां ईश्वरकृपेनें आपल्या तिघींचींही कल्याणें होवोत.

क्षे०—चल बाई. हंसपालिके, आह्मी पुढें घरीं जातों, तूं मागून जलद येहो. ( असें म्हणून क्षेमावती व सावित्री निघून जातात. इतक्यांत. )

भा०—( सौंदर्यसागर स्त्रैण झाला पाहून मनांत ) आतां आपण सौंदर्यसागराजवळ राहूं नये. त्या हंस-

पालिकेच्या मैत्रिणी कशा सुज्ञ ? त्या लागलीच घरीं चालत्या झाल्या. खरेंच आहे. दोघांत तिसरें असणें ठीक नाहीं. व्यर्थ यांच्या भाषणास अडथळा कां ? आपण आपलें दूर जावें हें योग्य. ( उघडपणें ) सौंदर्यसागरा, मला तहान फार लागली आहे. तूं क्षणभर जर येथें बसशील, तर मी आतां पाणी पिऊन येतों.

सौं०—( भालचंद्राचें जाणें आपल्या पथ्यावर आहे असें जाणून. ) ठीक आहे. भालचंद्रा, पाणी लवकर पिवून ये. हा मी येथेंच बसतों.

भा०—(मनांत) वः! काय चमत्कार आहे. ! माझ्या मुखांतून शब्द निघण्याचा अवकाश, तों लागलींच यानें रजा दिली. एकून स्त्रैण झालेल्या पुरुषास दुसरी कोणतीच वस्तु प्रिय नाहीं. स्त्रीच्या नादीं लागला ह्मणजे मग त्याला इष्ट नको, मित्र नको, धन नको, देह नको, फार तर काय प्राणही नको असें होतें ! अहाहा ! ईश्वरा ! काय व्यर्थ मोहांत हें जग गुंगविलें आहेस! शाबास! अचिंत्य, अविनाश, अक्षयी निर्मळ असें जें तुझें ब्रह्मसुख, त्याहीं पेक्षां हें रतीसुख जास्त केलें आहेस. अरे, बालपणापासून आमचें अकृत्रिम मित्रत्व आजपर्यंत चालत आलें असतां, आज सौंदर्यसागरास विषयसुखाचा भास झाल्याबरोबर त्यानें माझी आशा सोडून दिलीना! अरेरे! आजपर्यंत चाललेल्या मित्रत्वाचा आज नाश झालाना ! यापेक्षां पूर्वीच जर मी दूर दूर राहिलों असतों तर

हा त्रास आतां झाला नसता. असो. आपण हे विचार मनांत आणून उपयोग नाहीं. आपल्याकडून मित्रत्वांत अंतर आणूं नये. कारण आपणच त्याला येथपर्यंत आणलें, आणि हंसपालिकेची गांठ घालून दिली, तेव्हां हे विचार व्यर्थ मनांत आणणें ह्मणजे आपल्या मनांत अंतर आणणें आहे. अरे, विश्वामित्रासारखे तपोनिष्ठ ऋषी आपल्या अमोल तपोभांडारास लाथ मारून, उर्वशीस पाहतांच पूर्ण स्त्रैण झाले. मग या सौंदर्यसागराची काय कथा आणि मित्रत्वाची योग्यता विसरला ह्मणून आश्चर्य काय? असो. त्याच्याकडे तरी दोष लाववत नाहीं. कारण खरें जेथें रूप, गुण, यौवन आणि प्रेमदृष्टी परस्पर झाली, तेथें दुसरें कोणतेंच भान रहात नाहीं. फार कशाला, हंसपालिकेला पाहून पुरुष मनमोहीत होईलच, पण ती दुसरी एक कोणी हंसपालिकेबरोबर होती, आणि तिनें साधारण दृष्टचा, मजकडे नेत्र कटाक्षानें पाहिलें. तेव्हां माझीच काय अवस्था झाली बरें? साधारण तरुण स्त्री पाहून जर मन मोहीत होतें तर अति सुंदर स्त्रियेस पाहून कोणता पुरुष मोह पावणार नाहीं? तर स्त्रीपुरुषांच्या प्रीतीपेक्षां जगतांत दुसरी कोणतीच मौल्यवान वस्तु नाहीं यांत संशय नको. पहा, ज्या प्राणाचें मोल होत नाहीं तो प्राण खऱ्या स्त्रीच्या प्रीतीकरतां सहस्त्रावधी मनुष्यांनीं दिले आहेत, आणि देतही आहेत. ह्मणून स्त्री ही सर्व मोहक वस्तूंत

श्रेष्ठ आहे. असो, आतां आपण चालतें व्हावें.(उघडपणें) सौंदर्यसागरा, मी जातों. सवड झाल्यास तुलाही सुंदर पाणी आणीन.

सौं०–अरे, अझून आहेसच कां? मी समजलों तूं गेलास. अरे, जाणें असेल तर लवकर जा.

भा०–(मनांत) काय पहा. मी केव्हां जाईन असें यास झालें आहे. असो. (असें ह्मणून भालचंद्र निघून जातो. नंतर)

सौं०–अहाहा! ठीक झालें, काय ईश्वरी चमत्कार! कोणतीही गोष्ट घडून येणें असली ह्मणजे अशीच जमून येते. पहा, हंसपालिका व मी एकांतांत असावें असें वाटल्याबरोबर ईश्वरकृपेनें लागलींच त्या दोघी तिच्या सख्या निघून गेल्या. बरें, भालचंद्र जवळ होता. त्याला कां तृषा लागावी? यावरून ईश्वरीलीला अगाध आहे, असो. आतां कसें करावें? कारणाशिवाय आपण तिच्या जवळ तरी कसें जावें? (विचार करून.) अं:! त्यांत काय आहे? (मनाशींच) अरे सौंदर्यसागरा, असें कर, अंगावरील भरजरी शेला आहे कीं नाहीं? तो जरा अगदीं हाताच्या पुढें घोळ करून आण, शेला उडून जाईल असा सपाट्यानें तीर सोड. ह्मणजे काम झालें. मग शेला आणावयाच्या निमित्यानें तिज जवळ जाण्यास काय हरकत आहे? शेला मात्र नेमका तिच्या जवळ पडला पाहिजे, (टाळी वाजवून.) व:! झालें काम! खाशी

युक्ती सुचली. हा पहा आणला शेला हातावर. ( असें ह्मणून शेल्यासहीत तीर हंसपालिकेजवळ सोडतो.) ( उघडपणें ) अरे शेला उडाला ! ! ( इकडे तिकडे दाटूनच पाहतो.) वः! इतका लांब गेला कां ? (आणावयास हंसपालिकेजवळ जातो. नंतर )

हं०—वः ! काय परमेश्वर हितावर आहे. (मनांत) प्रियकराशीं प्रथमतः आपण होऊन कसें बोलावें या विचारांत होतें, तों शेला आपोआप जवळ आला. आतां ठीक झालें. शेला उचलून आपल्या जवळ घ्यावा. ह्मणजे मग तर तिकडूनच बोलणें होईल कीं नाहीं? ( शेला उचलूं लागते. पुनः मनाशींच. ) नकोग बाई शेला उचलून घेतला, आणि तिकडून कां उचलला असें बोलणें आलें तर ? मग काय उत्तर द्यावें? ( पुनः मनाशींच.) अगे, उत्तर कशाला पाहिजे ? तसाच प्रसंग आला तर घट्ट पाय धरूं ह्मणजे झालें. मग तर तिकडचा राग जाईलना ? ( असें ह्मणून शेला उचलून घेते. )

सौं०—( शेला उचलून घेतला पाहून ) अहाहा ! शेल्या, धन्य भाग्य तुझें. अरे, आतां तुला जगतांत भीतीच राहिली नाहीं. कारण समर्थानें हातीं धरलें.

हं०—( हें बोलणें आपल्यासच लावून आलें असें जाणून ) शेल्या, तूं समजत असशील कीं, मी निर्भय झालों पण नाहींरे नाहीं. अरे, सबलांची वस्तु अबला

जर हातीं धरितील, तर ती अचला होईल काय? नाहीं. तर शेल्या, तुला जें मी निर्भय झालों असें वाटत असेल तें व्यर्थ आहे.

सौं०–( मनांतच ) अहाहा! काय भाषणचातुर्य आहे! उत्तर कसें मिळालें? यापुढें आतां मी काय बोलावें! असो; मुकाट्यानें राहून उपयोग नाहीं. लागलीच आपल्या चातुर्याची परीक्षा होईल. तर ही कुंठित होईपर्यंत आतां बोललेंच पाहिजे. ( उघडपणें ) शेल्या तूं भिऊं नकोस. कारण, ज्यांनीं तुला हातीं धरलें आहे, त्यांच्या योग्यतेचा विचार कर, ह्मणजे तूं निर्भय आहेस किंवा नाहीं हें तुला समजेल. कदाचित् तूं समजत असशील, कीं ज्यानें मला हातीं धरलें तो अचल आहे. आणि पूर्वीं आपण ज्याजवळ होतों तो चक्रवर्ती सबल आहे. पण तसें नव्हे हो. पूर्वींचा तुझा आश्रय जरी चक्रवर्ती सबल आहे, तरी तो उपयोगीं काय? कारण चक्रवर्ती ह्मणजे सार्वभौम राजा. त्याला जरी पृथ्वीवरील सर्व मांडलिक राजे करभार देतात, तरी त्यालाही त्याच्या गृहिणीस करभार द्यावा लागतो. तेव्हां अर्थात चक्रवर्ती सार्वभौम राजापेक्षांही स्त्रियांची योग्यता जास्त आहे; ह्मणून शेल्या, प्रस्तुत जो तुला आश्रय मिळाला आहे, तो स्त्रीजातीचा आहे. आणि पूर्वींचा जरी चक्रवर्ती होता, तरी तो पुरुषजातीचा होता. याकरतां आतां स्वस्थ मनानें रहा बरें!

हं०–(मनांत) अहाहा! काय स्त्री-जातीला शिखरीं नेऊन बसविलें! आणि त्या बोलण्यांत आपण चक्रवर्ती राजपुत्र आहोंत असें सुचविलें. शाबास! यापुढें मीं आतां काय बोलावें ? पण मला वाटतें अशा चतुर पुरुषाबरोबर पुष्कळ बोलून घ्यावें. आणि कदाचित् तिकडे कुंठीत झाले तर बरेंच झालें. (उघड) शेल्या, तुझा विचार तूंच कर. मी सांगायाला पाहिजे असें नाहीं. अरे पूर्वींच्या तुझ्या मालकानें मनावर धरलें तर तुला ते एका क्षणांत परत आपल्याजवळ घेतील. मग तुझ्या हल्लींच्या आश्रयाकडून तुझें साह्य होणार नाहीं. कारण तिकडे पराक्रमच तसा आहे.

सौं०–शेल्या, या बोलण्याला तूं भिऊं नकोस. कारण, भुंग्याचें सामर्थ्य कसें असतें हें तुला माहित असेलच, कीं तो मोठमोठीं हत्तीच्या शरीरा एवढालीं खंबीर लांकडाचीं खोडें क्षणांत चूर करून टाकतो. पण कमलांत जर अडकून राहिला, तर तेथें मात्र त्याच्या पराक्रमाचें पाणी होऊन जातें. कारण, तेथें मोहांत घोंटाळून प्रीतिपाशांत गर्क होऊन जातो. जरी तुझ्या पूर्वींच्या मालकांत मोठा पराक्रम आहे, तरी तो कोठें ? इतर ठिकाणीं. तुझ्या प्रस्तुत आश्रयाजवळ त्याचें पाणीच होणार. कारण प्रीतिपाश.

हं०–(मनांत) वा! ह्या बोलण्यांत तर खूपच ठेवून दिली! ह्मणजे माझ्या ठिकाणीं प्रीति जडली

आहे हें तिकडून सुचविलें. आतां काय बोलावें ? पुनः हो. मी हटतें कीं काय ? ( उघडपणें ) शेल्या फसूशीलरे फसूशील. अरे, भुंग्याजवळ एकच वस्त्र असल्या कारणानें त्याचें कमलिनीजवळ कांहीं बळ चालत नाहीं. परंतु पूर्वीच्या तुझ्या मालकाजवळ किती शस्त्रें आहेत, ह्याचा विचार केलास कां ? अरे, एक सौंदर्यशस्त्र, दुसरें सहस्त्रावधी सद्गुण भरलेत, तें एक प्रबल शस्त्र. तिसरें प्रियभाषण—किती तीक्ष्ण शस्त्र बरें? आणि यांहीपेक्षां प्रबळ आहे एक, त्याचें नांव सांगूं कां शेल्या तुला? अरे, चवथें कामशस्त्र. इतकीं शस्त्रें तिकडे आहेत. त्यायोगानें, तूं प्रस्तुत ज्याचा आश्रय केला आहेस, तो क्षणांत बलहीन होऊन कामशस्त्राच्या स्वाधीन होईल. आणि तुझ्या पूर्वींच्याच आश्रयाचा जय होईल. तेव्हां मग निमुटपणें पुढें त्यांच्याकडे जाण्यापेक्षां आतांच हा निर्बल आश्रय सोडून तिकडेस जा.

सौं०—शेल्या, तूं असा वरकांती दुसऱ्याचें बोलण्यावर विश्वास ठेवूं नकोस हो. पूर्ण विचार कर. अरे, शस्त्रें कोणाकडे जास्त आहेत सांगूं कां ? पहा तूं आहेस तिकडे सौंदर्यशस्त्र तर आहेच. सद्गुणशस्त्र आहेच. तशींच प्रियभाषणादि शस्त्रें आहेतच. झालें, इकडे अधिक काय काम-शस्त्र ? त्याचें शांती-शस्त्र तिकडे आहेच. तें आह्माकडे नाहीं, समजलेंना ?

हं०—( मनाशीं. ) अग बाई ! आतां बरीक श-

र्थ झाली ! आतां पुढें काय बोलावें ? हो पण मी ऐकतें कीं काय ? ( उघडपणें. ) शेल्या, शस्त्रें जवळ पुष्कळ आहेत आणि शस्त्रें बाळगणाराला जर त्याचा अभिमान नाहीं, तर मग शस्त्रें असून उपयोग काय? प्रस्तुत तूं जिकडे आहेस इकडे कांहीं शस्त्रांचा अभिमान नाहींहो. ह्मणून जिकडे अभिमान असेल तिकडे तूं जा.

सौं०—शेल्या, तुझ्या पहिल्या आश्रयास जर अभिमान असता तर त्यानें आगांतुकपणानें तुला दुसऱ्याकडे कां पाठविलें असतें ? अरे, तुला पुढें पाठविण्याचें कारण इतकेंच कीं, तुझी सोय पूर्वीं झाली, कीं मागून तुझ्या धन्याची.

हं०—(मनांत.) मजकडे लक्ष्य पूर्ण असल्यामुळेच निमित्याला शेला मजकडे उडविला. आतां उगीच आडून आडून गोळ्या कां माराव्यात ? एकदां मनाचा हिय्या करून समक्षच बोलावें. ( उघडपणें. ) शेल्या, असा आगांतुकीच करण्यास आलास मग लाजतोस कां ? आणि बोलण्यांत मध्यस्थी कां ? अभिमानच सोडला मग आतां हरकत कोणती ?

सौं०—शेल्या, तुझी माझी कथा काय ? अरे, देवादिकांनीं सुद्धां स्त्रियांपुढें हात टेंकिले. अरे, पार्वतीनें भिल्लिणीचें रूप घेतलें तेव्हां महादेवही तिजकारितां भ्रमिष्ट झाले. हें तुला माहित असेलच. तसेच भस्मासुरासारखे महाशूरही मोहनीला वश हो-

ऊन अभिमान विसरले. मग तुझी माझी कथा काय? (मनाशीं) थोडी गंमत करावी. [उघडपणें.] असो. शेल्या, इतकें अमर्याद बोलणें आपल्याला कशाला हवें? चल आपण जाऊं. हा पहा मी चाललों. चल तुला यावयाचें असेल तर. [असें ह्मणून सौंदर्य-सागर जाऊं लागला.]

हं०—अगबाई! कायग बाई बोललें. आग लागो माझ्या बोलण्याला? [तोंडांत मारून घेते.] मेले टवळे जिभे, सटव्ये कायग अक्षरं बोललीस! अरेरे! प्राणनाथास राग येऊन जाऊं लागलेना? आतां काय करूं? [रडूं लागते.] हाका मारते,—अहो चक्रवर्ती, अहो, पृथ्वीपती, अहो, अहो, अहो प्राणनाथ, अहो, या अनाथ दुबळीला किंचित् भाषणामृत पाजून अर्धमृत नकाहो टाकून जाऊं. अहो मी बोललेलीं प्राणनाथ हीं अक्षरें श्रवण करून पाय कसा पुढें पडतो?" मजकडून चुकी झाली. नकाहो नका जाऊं. तुह्मास माझ्या सुमंगलेची शपथ आहे, या उपरांत पाय पुढें टाकाल तर हे प्राण रहात नाहींत. महाराज (हात जोडून.) मी मूर्ख दुर्बळ स्त्री-जाति, आणि थट्टेनें भाषण केलेलें आपण मनावर घेतां काय? नाहीं हो नाहीं. मीं आपणास अपमानानें नाहीं भाषण केलें; या गरीब दुर्बळ स्त्रीस पेटलेल्या कामाग्नींत नका हो टाकून जाऊं. अहो कृपा-मेघाची वृष्टि करा. मी-

नांस जर जल सोडूं लागलें,तर त्यांनीं कोणास शरण जावें ? सरितेस सागर उपेक्षूं लागला तर तिची वाट काय व्हावी ? महाराज, सुकुमार केळीवर वज्रपात झाला तर तिची कशी दशा होईल ? अहो, भालचंद्रभटानें आपली मूर्ति ध्यानीं भरविल्यापासून ह्या मनास आपला ध्यास लागला. आणि आतां किंचित् सुखाचा भास दाखवून सर्व अभास करतां काय? आपल्या पायाखेरीज मीं आशा कोणाची धरावी ? प्राणनाथ नकाहो नका जाऊं. आपण ऐकत नाहींना? मी जाऊं देणार नाहीं. [ असें ह्मणून सौंदर्यसागराचे मागें पळते. इतक्यांत ठेंच लागून खालीं पडते. ]

सौं०—( पुढें पळतां पळतां मागें काय पडलें ह्मणून पाहतो.) हाय हाय ! प्राणप्रिया पडली काय ? अरेरे. मी दुष्ट ! ! देवा ! मजसारखा कठोर हृदयी कोणी असेल कां ? शिव ! शिव! चांडाळापेक्षांही माझें मन कसें कठोर झालें ? ही कोणी बुद्धि सांगितली? ( तोंडांत मारून घेतो. ) अरे राम ! राम ! राम ! मी अभागी खरा. किती सायासें करून ह्या रत्नाची भेट झाली ? मीं कृतघ्न खरा. माझ्या प्राणप्रियेस दुःखाब्धींत मी टाकिलेंना हर ! हर ! आतां माझी वाट काय ? आतां या दुष्टाला ती पुनः प्रेमदृष्टीनें पाहील काय ? अरेरे! आतां पुनः प्रीतीचें नांव कशास !! आतां कसें करूं ? ( असें ह्मणून तिला उठवूं लागतो व सावध करूं लागतो. ) प्राणप्रिये, एकवार दृ-

ष्टि उघडून या चांडाळाकडे अवलोकन तरी कर. आतां पुनः असा निर्दयपणा कधीं करणार नाहीं. आणि मी तरी खरोखरीच रोषानें तुला सोडून जात नव्हतों. सखे, विनोद तुला समजेना कां? हा वेडे. ऊठ. हें काय असें. एकदां बोल बरें. मी विचारतों तेवढें सांग.

हं०-(हळूच व किंचित् नेत्र उघडून.) आतां कशाला पण येणं झालं? नाहीं तर नाहीं. मनांत नसलें तर दुसऱ्याच्या आग्रहानें कां कोणती गोष्ट होते?

सौं०-प्राणप्रिये, तुजवर जर माझें प्रेम नसतें, तर शृंगारपुरी सोडून इकडे पांचशें कोश कां आलों असतों? दुसरें कांहींच कारण नाहीं. ऊठ. आणि तुझ्या मनांतील हेतु उघडपणें सांग. परमेश्वर मनोरथ पूर्ण करील.

हं०-अहाहा! प्राणप्रिया, सर्वत्रांस प्रकाश देणारा जो दीप तो स्नेहावांचून क्षीण होतो, तद्वत् मला झालें होतें. आतां तुमच्या स्नेहरूप भापणानें माझा दीपरूप प्राण क्षीण झालेला पुनः टवटवीत झाला. महाराज, तोच प्राण मी आपणास अर्पण करतें. त्याचें संरक्षण करा.

सौं०-प्राणसखे, तुझ्या दीपरूप प्राणाभोंवतीं शेंकडों पतंग रूपी प्राण घिरट्या घालीत होते, परंतु सुदैवानें आज ह्या प्राणाची आणि तुझ्या प्राणाची मैत्रिकी झाली. आतां पुढें विचार काय करणें हें मात्र कळलें पाहिजे. हे माझे बाहू तुझ्या मनवेधक देहास

आलिंगन देण्यास घाबरे झाले आहेत, परंतु अनीतीनें आलिंगन देणें काय उपयोगीं? ज्या योगानें अक्षय सुख मिळेल तो रस्ता धरावा.

हं०—महाराज, काया वाचा मनानें हें शरीर व प्राण आपणास अपर्ण केले आहेत. आतां तृषित झालेल्या चातकास अंत न पाहतां एकदा कृपामेघ व्हा. महाराज, नकाहो नका. आतां मजविषयीं दुजा भाव धरूं नका. सर्वसाक्षी सूर्यनारायण व मातोश्री धरणी हे माझे साक्षी यादेखत मी आपली सत्य सत्य स्त्री झालें आहें. आतां अंतर नका देऊं. प्राणप्रिया, या वेळेस जर माझी आई आणि बाबा जिवंत असते, तर प्रियकरा, आपणास पाहून त्यांना किती सुख झालं असतं? माझे मनांतून त्यांनीं माझें विवाहसुख पहावें असें फार होतें. परंतु उपाय काय? मज अभाग्याचे नशिबीं तें सुख कोठें आहे? ( मोठ्यानें हुंदका येऊन. ) असो, आतां जिवलगा, ही दीन झालेली निराश्रित दासी हिचा अंगीकार करा. आणि निरंतर पायाजवळ रक्षण करा.

सौं०—( आलिंगन देऊन ) प्रिये, नको रडूं.—परमेश्वर तुझे सर्व हेतु पूर्ण करील. तुझ्या मनांतून आईबापांसमक्ष सोहळा व्हावा असें आहे, तर उद्यां ईश्वर तसाच दिवस दृष्टी पाडील. सखे तूं शोक करूं नको. भुवनपाल व भुवनसुंदरी खुशाल आहेत.

हं०—( आनंदानें ) प्राणनाथ, खरं कां? ( कंठा-

स मिठी घालून ) असें होईल तर माझा आनंद पृथ्वींत मावणार नाहीं. आपली व त्यांची भेट कां झाली?

सौं०—सखे, शृंगारपुरींत सिंहबल प्रधानानें, व माझा बाप चंद्रकांत ह्या उभयतांनीं दुल्यारामोशाशीं संकेत करून त्यास इकडे पाठविलें. सिंहबलानें तुझ्या प्राप्तीविषयीं फार फार युक्त्या दुल्यास सांगितल्या होत्या; असो. दुल्या इकडे येण्यास निघाला तेव्हां मला चैन पडेना. आणि त्यापूर्वीं भालचंद्र—काशीहून आला तेंव्हां ह्या ( हनवटीला धरून ) जिवाची तारीफ त्यानें केली होती. दुल्या इकडे येऊन भुवनपालाचा वगैरे दोघांचा घात करून तुला सिंहबलाचे स्वाधीन करणार. हें मला सहन न होऊन मी लागलीच भालचंद्रासहित प्रेमसागरासह कांहीं लोकांस बरोबर घेऊन या वनाचे उत्तरेस येऊन पोंहचलों. पवनगंगेचे कांठीं सुंदर रम्य स्थळीं उतरल्यावर, रात्रीं एसचा ह्मणून रामोशाचा रडण्याचा स्वर ऐकूं येऊं लागला. मी आपल्या माणसांकडून तपास करून त्यास धरून आणविलें. त्यानें आज रात्रीं माझा धनी भुवनपाल काळूबाईस बळी देणार व हंसपालिकेस दुल्यानें व सटव्यानें धरून नेलें. वगैरे सर्व मजकूर सांगितला. आह्मी लागलींच तयार हत्यारांनिशीं काळूबाईच्या देवळाशीं जाऊन छपून बसलों. ज्यावेळीं त्या दुष्ट खंडबानें भुवनपालास व तुझ्या आईस देवीजवळ वांकविलें, त्यावेळीं काय तो प्रसंग सांगावा ! ! असो, लागलींच सर्वां-

चा घात करून भुवनपालास व तुझ्या आईस त्या दुष्ट रामोशांच्या दाढेंतून सोडविलें. सखे, त्यांच्या बदला त्या दुष्ट रामोशांचेच बळी दिले. ही गोष्ट कालच झाली. भुवनपाल व तुझी आई हल्लीं माझ्या छावणींतच आहेत. आज सकाळीं भालचंद्र व मी तुझ्या शोधास शिकारीच्या निमित्यानें आलों. तों अशा रीतीनें तुझी भेट झाली.

हं०—अहाहा ! प्राणनाथ, काय हा आनंद ! ! आतां मी आपली हकीकत सांगतें. आह्मी सर्वजण येथून पश्चिमेस एक दाट झाडी आहे तेथें पर्णकुटींत बरेच दिवस राहत होतों. तेथें मला सोबत काय ती रामोशांच्या मुलींची व भिल्लांच्या पोरींची. त्यांच्या बरोबर तीर मारणें वगैरे शूरांच्या कामांत मी बरीच प्रवीण झालें. वाघ, आस्वलें वगैरे हिंसक पशूंच्या झुंडीच्या झुंडी मारून मी रास पाडीत असें. मला बरें समजूं लागलें तेव्हां माझ्या आईनें मला लिहिण्यास व वाचण्यास शिकविलें. याशिवाय शिवणकाम व कशिदा काढणें, रांगोळया घालणें, चित्रें काढणें वगैरे बऱ्याच विद्या मला शिकविल्या. आमच्या आसपास रामोशांची वस्ती फारच होती, त्यामुळें बहुतक भिल्लांचा व रामोशांचा माझ्या बाबाशीं स्नेह झाला. त्यानंतर पुढें कांहीं विचार करणें होता; तों दुल्यानें शृंगारपुरीस जाऊन चढाई केली. सर्व रामोशांपेक्षां एसब्याचा आमचा फार लोभ जुळला होता. असो,

ईश्वरकृपेनें त्यास सुबुद्धी होऊन त्यानें तुह्मास वर्तमान कळविलें. नाहीं तर बाबा व आई आज जिवंत राहिलीं असतीं काय ? ( डोळयांत पाणी आणून ) पण महाराज, तो एसबा जिवंत आहेना ? कीं त्यालाही बळी दिलात ?

सौं०— छे वेडे. ज्यानें इतका उपकार केला त्यास कां शिक्षा करीन? त्याला माझे खाजगी तैनातीस पंचवीस रुपये पगार करून नौकरीस ठेविलें आहे. शिवाय त्याचे विश्वासूपणाबद्दल त्यास दोन हजारांचें कडें बक्षिस दिलें. सखे, मग पुढें काय झालें, ती हकीकत एकदां सांग.

हं०—मग पुढें काय ? त्या दुल्यानें वाटतें चहाडी करून हा गोंधळ केला. आह्मी सर्व निजलों असतां एकदम हल्ला करून बाबास व आईस बळी द्यायचे ह्मणून नेलें. आणि मला दुल्या व सटव्यांनीं बांधून प्रधानाकडे न्यायचें ह्मणून एका झाडींत नेलें. दुसरे दिवशीं उजाडल्यावर, त्या दोघांचीही मजविषयीं पाप बुद्धि होऊन आपआपसांत गुलाम ठार मेले. पुढें मी मोकळी होऊन या अरण्यांत दीन वदनानें हिंडत होतें, इतक्यांत कृपासागर ऋषींची कन्या क्षेमावती व सावित्री ह्या दोघी सहज ह्या वनांत आल्या होत्या त्यांची माझी भेट होऊन त्यानीं मला कृपासागर महाराजांचे पायावर नेऊन घातलें. त्यांनीं “ तूं माझी दुसरी कन्याच आहेस. ” असें ह्मणून आजप-

र्यंत माझें पाळण केलें. आज सहज आह्मी येथें आलों तों आपलें दर्शन झालें. महाराज, बाबास व आईस दुष्टांनीं बांधून बळी देण्यास नेलें त्यास बरेच दिवस झाले. आणि आपण काल बळी देत होते सांगतां हें कसें ?

सौं०—सखे, एसबाच्या सांगण्यावरून समजलें कीं, त्यांनीं बरेच दिवस पुढें काळू बाईच्या जत्रेचा दिवस येण्याची वाट पाहिली. काल त्यांचा जत्रेचा दिवस होता. परंतु काळूबाईनें त्यांचीच उलटी जत्रा केली.

हं०—एकुण ईश्वर तारी त्याला माणुस काय मारी! अहाहा! परमेश्वराची लीला अगाध आहे !! असो, महाराज, आपण आपले छावणींत जाऊन सर्वत्र मंडळी सुद्धां उद्यां कृपासागरांच्या आश्रमांत यावें. मी जाऊन झालेला सर्व प्रकार त्यांना कळवितें: ह्मणजे आनंदानें आपल्या उभयतांचा लग्न सोहळा होईल. शिवाय सर्वत्रांच्या परस्पर भेटीही होतील. याप्रमाणें सर्व आनंदी आनंद होईल. खेरीज तुमचा स्नेही भालचंद्र यांनीं मला हे पाय दाखविले व आपणास येथपर्यंत आणून माझे आईबापास वांचविलें. तेव्हां त्यांच्याकरतांही एक सुंदर नवरी पाहून ठेविली आहे. व कृपासागर महाराजांची कन्या क्षेमावती हिचेंही लग्न व्हावयाचें आहे. तेव्हां हीं तिन्ही लग्नें एका मांडवांत होण्याची तयारी मी करतें. आतां जाऊन

कृपासागरांचे बळकट पाय धरितें. ह्मणजे सर्व बेत ठीक जमेल. आपण सर्व खटल्यासुद्धां तेथें यावें. मी जातें. ( असें ह्मणून जाऊं लागते. )

सौं०—ठीक आहे. प्रियसखे, फार आनंद झाला. मी जाऊन भुवनपाल व तुझी आई ह्यांसह उद्या वेळेवर हजर होतों. पण आतां उद्यांपर्यंत तुझा विरह मला कसा सहन होईल कोण जाणें ?

हं०—प्राणनाथ, मलाही तेंच संकट आहे. परंतु उद्यां होणाऱ्या अक्षय सुखाकडे लक्ष देऊन व त्या आनंदांत हें विरह दुःख कसें तरी विसरेन असें समजून मनाचा धडा केला आहे. महाराज, आपणही कसा तरी धडा करा ह्मणजे झालें.

सौं०—ठीक आहे. सुंदरी हा मी चाललों पहा. पण हो, अजून भालचंद्र पाणी पिऊन आला नाहीं. अरे हो. बरेंच झालें. तो पहा आला. ( इतक्यांत भालचंद्र पाणी घेऊन येतो. )

सौं०—( पाणी पिऊन ) आलास बाबा. चल आतां किती वेळ तुझी वाट पहात आहें ?

भा०—तें ठीकच आहे. मनांतून तर असें ह्मणत असाल कीं, हा इतक्यांत कोणीकडून आला, पण हें बोलणें उगीच वरकांतीं.

सौं०—नाहीं रे नाहीं. तसें कांहीं नाहीं. काय गंमत झाली ती चल सांगतों वाटेनें. असें ह्मणून सौं-

दर्यसागर व भालचंद्र निघून जातात. व हंसपालिका-ही आश्रमांत जाते.)

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

वि०—सूत्रधार, वः! एकूण खूप आप्पलपोटे दिसतां! एवढ्याकरतां कां रात्रभर जागविलें आह्माला ? असा विश्वासघात करणें हें बरोबर नाहीं. एखाद्याला प्रथम आशा कशाला लावावी ? मी रुसलों आतां. हा पहा आतां जातों. (असें ह्मणून जाऊं लागतो. )

सू०—( त्याला धरून ) कां चाललास कां ? आह्मी काय आप्पलपोटेपणा केला, आणि विश्वासघात कोणता केला ?

वि०—अहो, हंसपालिका शेवट दवडलीत कीं नाहीं आमच्या हातची ? असा हा विदूषकपंत फांकडा ( मिशावरून हात फिरवून ) असून त्या चिटक्यानें कां हंसपालिका आपलीशी करावी ? बरें, ती नाहीं तर ती दुसरी तरी ? ती नाहीं तर तिसरी तरी ? सर्वच नवऱ्या ठरल्या गेल्या, आतां आह्मीं काय करावें ? रात्रभर जागून तुह्माला मदत केली. पण एखादी नवरी तर जुळवून द्यायची होती कीं नाहीं ? जो तो आपलें हित पाहतो, माझें कोण पाहील ? मी आतां रुसून बसतों. नाहीं तर तुह्मी व्हा आमची नवरी.

सू०—वः ! एकूण मजवर आहेस कां राजी ? अरे, हें नाटक होईपर्यंत तुझें माझें येथें लग्नच लागलें आहे.

मग त्यांत अधिक तें कोणतें ? असो. पण आतां एकदां शृंगारपुरींतील हालहवाल पाहण्यास येतोस कां?

वि०- हो. तुमचें आमचें लग्नच लागलें आहे. मग विरहदुःख कसें सहन होईल ? जिकडे तुह्मी तिकडे मी. पण कांहो ? आतां विश्रांतवनांतून थेट शृंगारपुरीस जायचेंना ? मग आमचे पाय कसे चालतील ?

सू०-अरे, नसले चालत तुझे पाय, तर सर्व प्रकार येथेंच करून दाखवितों.

वि०-ठीक, मग तर उत्तमच झालें. चला आटपा लवकर.

सू०-ठीक आहे. आतां कंटाळूं नकोस. अगदीं थोडें राहिलें आहे. ( असें ह्मणून निघून जातात. )

---

## प्रवेश २.

### स्थळः-चंद्रकांताचें मंदिर.

### पात्रें.

चंद्रकांत......................शृंगारपुरीचा राजा.
गणबा ......................विश्वासूक हुजऱ्या.

चं०-अरे गण्या इकडे येरे लवकर. चल, चल, धांव जलद.

ग०-जी सरकार. ह्योच आलो बगा, आलों, आलों. ( जवळ येऊन ) आज्ञा सरकार.

चं०-अरे, आज मोठा कठीण प्रसंग दिसत आहे.

आतां कसें करूं ? गणबा, एकूण कोणी नव्हे कुणाचे; सर्व व्यर्थ आहे. " घर फिरलें, ह्मणजे घराचे वांसे फिरतात " ही ह्मण खोटी नव्हे. गणबा, आतां जिवाभावास विश्वासूक काय तो तूंच आहेस.

ग०—( हात जोडून ) महाराज, परसंग परसंग काय ह्मंताया ! आन् वखतची लय कठीन आला ह्मंताया. मी कांहीं उमंगलों नाहीं महाराज.

चं०—अरे प्रसंग काय विचारतोस? या तोंडानें काय सांगूं ! शिव ! शिव ! शिव ! ( उसासा टाकून ) गणबा या राज्याचा आणि सुखाचा काय तो एक घटकाभर मी आतां धनी आहें. एक घटकेनें हें सर्व लयास जाऊन मी जमीनदोस्त होणार आहें. अरेरे ! दुष्टानें सर्वच फस्त केलें काय ? अरे, याचा विचार मीं पूर्वीं केला नाहीं अं ! दुष्ट लोकांच्या सांगण्यावरून त्यांच्या नादीं लागून हवीं तशीं वाईट कामें केलीं. आणि आतां शेवट प्रसंगीं ते सुटून मी !! अरेरे ! ( डोळ्यांत पाणी येऊन ) गणबा, आतां मी काय करूं ? अरे, या वेळेस मला प्रसंगीं कोण उपयोगीं पडेल ? आणि ईश्वर तरी कशी कोणास बुद्धि देईल ? आजपर्यंत कधीं ईश्वराचें भय स्वप्नींसुद्धां बाळगिलें नाहीं. आतां ईश्वर पावेल काय ? मी किती पापी ! मजसारखा दुष्ट, चांडाळ, अधम, विश्वासघातकी, कृतघ्न या जगतांत कोणी नसेल. देवा ! सर्व पाप्यांचा मी राजा. आतां माझें रक्षण कोण करील ? प्रभो, मी

चुकलों. अपराधी आहें, सहस्त्र अपराधी आहें. आतां या दीनावर करुणामेत्र सोड. हे दीनदयाळा, काय तुझा मायाजाल ! अरे हाच पश्चात्ताप पूर्वी झाला असता तर ? अरे राम ! राम ! राम ! आतां माझी वाट काय ? मीं जन्मास येऊन काय केलें ? राज्यावर असतां एखाद्या गरिबाचें जन्माचें कल्याण केलें नाहीं, ब्राह्मणास कधीं दान किंवा वांवभर जमीन माझे हातून मिळाली नाहीं. प्रजाजनांचें संरक्षण केलें नाहीं. बहुतकरून न्याय यथायोग्य कोणासही मिळाला नाहीं. नेहमीं खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें लांच घेऊन करीत गेलों. गोरगुरिबांवर जुलुम केले. सर्व आश्रितांच्या व शहरांतील संभावितांच्या स्त्रिया भ्रष्ट केल्या. हर ! हर ! सर्व लोकांचे दांत मजवर. आतां काय करूं.? ( तोंडांत मारून घेतो. ) असो, या सिंहबलाचे नादीं लागून इतका घात झाला. नाहीं तर पूर्वीं मी आपले थोडक्याशा राज्यांत चांगला सुखी होतों व नीट शुद्धीवर असून नीतीनें वागत होतों. परंतु या सिंहबलाचे भरीं पडून बिचाऱ्या भुवनपालावर हल्ला केला. बरें असो. पुढें कसा तरी ईश्वरकृपेनें जय झाला. मग तरी बेतानें वागलों कां नाहीं? बुद्धीच भ्रष्ट झाली. सिंहबल सांगेल तसें केलें. आज काय ? याची बायको चांगली आहे, आणा धरून. उद्यां काय? अमक्या गरिब ब्राह्मणाचे घरांत त्यानें भिक्षुक वृत्तीनें संपादन केलेलें बरेंच द्रव्य आहे आणा लुटून. आ-

ज काय असका बरा अश्रूदार आहे ध्या इजन. वाह-वा सारे. बनवा कर. याप्रमाणें कहर कहर करून सोडले. ते प्रजाजन आतां दया कशी करतील ? हाय हाय ! आतां काय करूं ? नारायणा ! बा तुजवांचून निदानीं आतां कोणी नाहीं. धांवरे धांव. चुकलों चुकलों चुकलों. कृपाघना, आतां तूंच समर्थ आहेस. नकोरे उपेक्षूं. तूं ह्मणशील कीं, " तुजसारख्या पाप्यावर दया कशी करावी ? " परंतु हें मात्र तुझें निमित्त साजणार नाहीं. प्रभो, अरे माझी काय कथा ! मजहून शतगुणीत पापी तुला शरण आले होते व आले आहेत, आणि त्यांचें तूं रक्षण केलेंस. ते पवाडे मीं ऐकले आहेत. कदाचित् तुला स्मरण नसेल तर देऊं कां ? अरे, अजामेळ, अघासूर, पिंगला, गजेंद्र इत्यादि थोडे कां प्राणी ? अरे, अजामेळ तर मांगिणीशीं रत असतां तूं त्याचा उद्धार केलास. मग माझी काय कथा ! तुझ्या कृपासिंधूपुढें माझें पाप तें किती ! तस्मात् शरणांगतास उपेक्षूं नकोस. मी पुनः असा वागणार नाहीं. झाला, मला पश्चात्ताप झाला.

**गण०**—महाराज, मंगा धरून तुमी दुःख करताया मी कांहीं उमंगलो नाहीं बगा. एकदा या दासापं सांगा तर खरं.

**चं०**—अरे गणबा, आतां सांगू काय ? सर्व ग्रंथच आटपला. ज्या जोरावर किंवा ज्याचे अनुमतानें मी आजपर्यंत गैर वर्तन केलें, व ज्यावर पूर्ण विश्वास ठेवि-

ला तोच आज सिंहबल प्रजाजनास सामील होऊन बारा वाजतां वाड्यावर हल्ला करणार आहे. अरे, आजपर्यंत प्रजेचा रोष या चांडाळाकरतांच मजवर झाला. नाहीं तर मी कधीं प्रजेशीं गैर वर्तन केलें नसतें; परंतु सारें सिंहबलाकरतां; आणि तोच सिंहबल आज सर्व फौजेसुद्धां व सेनापतीसुद्धां लहान मोठे कामगार मंडळीसह प्रजाजनास जाऊन मिळाला. आणि आज मजवर हल्ला करणार.

**गण०**—महाराज, पन हल्ला करण्याचें कारण काय?

**चं०**—अरे आतां सांगूं काय? गांवांतील धनपाल ह्मणून जो सावकार आहे कीं नाहीं, त्यानें बंड केलें आहे. आणि शहरांतील सर्व प्रजा त्याला साह्य झाल्या आहेत. गणबा, इतकें झालें तरी त्याचें मला नवल वाटत नाहीं. परंतु आपला सिंहबलही त्यांना अनुकूळ झाला हें आश्चर्य वाटतें. अरे, सिंहबल सर्व प्रधानासुद्धां व माझ्या सर्व फौजेसुद्धां धनपाळास मिळाला आहे. आणि आतां बारा वाजतां वाड्यावर हल्ला करणार. ह्मणून या गणबा मी कसें करूं? एकसुद्धां मनुष्य मजकडील राहिलें नाहीं.

**गण०**—सरकार, लय अवघड सांगितलत बगा. पन काहो? सिंहबल ह्मंज लय तुमचा आकशी पिरतीतला. आन आसं कसं झालं? आहो, परसंगी तुमच्याकरतां मानबी देणार मंग असं कसं झालं?

**चं०**—अरे, ती सर्व हकीकत मला समजली आहे.

गांवांतील सर्व मंडळींनीं व धनपाळानें सिंहवलास लाखों रुपये देऊं केले. तरी तो त्यांचा सल्ला पत्करिना. शेवट धनपाळानें सांगितलें कीं, " तुझी इतकी जरी खटपट केली, तरी भुवनपाल व भुवनसुंदरी आणि हंसपालिका सर्व जिवंत आहेत. आणि ते कोठें आहेत हेंही मला माहीत आहे. भुवनपालाचा आणि माझा फार स्नेह आहे सबब त्यास सांगून हंसपालिका तुला देववीन. " गणवा, या आशेनें सिंहवळ त्यास कबूल होऊन त्यानें त्याच्या वचनास रुकार दिला. आणि आतां मजवर हल्ला करणार. गणवा, स्त्रियांच्या नादानें पुरुष कोणतीं साहस कर्में करतील याचा नेम नाहीं. जन्मभर माझें अन्न खाऊन सिंहवल स्वीकरतां मजवर उलटलाना ? अरे सिंहवलाचेंच आश्चर्य काय ? परमेश्वर फिरला ह्मणजे सर्व स्वकीय गणगोतसुद्धां आपल्याशीं फिरतात. माझा कार्टा सौंदर्यसागर तोसुद्धां भुवनपालास जाऊन मिळाला आहे. व त्यानेंच त्याला आश्रय दिला आहे म्हणून ऐकिलें. गणवा, आतां काय उपयोग ? जसा वागलों तसें मला फळ मिळण्याची वेळ जवळ आली. असो. आतां हिरकणी खाऊन प्राण द्यावा. ( ह्मणून हातांतील आंगठी काढूं लागतो. )

**गण०**—हं, हं. महाराज, हें काय ? अहो मला एक युक्ती या वेळेस सुचली आहे. ती सांगूं कां ?

**चं०**—अरे, सांग पाहूं. पण लवकर सांग. गांवांत

कायशीं कडेकोट तयारी होऊन आतां दीन करण्याची वेळ आहे.

**गण०**—महाराज, तुमचा रणछोडराय है कीं नाहीं? त्याजवळ तुमची पन्नास हजार फौज है. आन त्यो येथून तीन कोसांवर सरकारी बागेंत है, त्यासनी बगा कळवा. आन जलद् वाड्याप आनवा. संमद जरी फितुर झाले, तरी रणछोडराय आक्शी तुह्माकडे हैत बगा. पन्नास हजार फौज आक्शी निवडक एक जात त्याप है बगा. त्यो जर वाड्याप राखन बसला तर मंग कांहीं तुमच्या जिवाला धोका नाहीं.

**चं०**—अरे हो. चांगली युक्ती काढली. हें घे पत्र आणि जलद घोड्यावर बसुन जा. रणछोडराय पत्राबरोबर आले कीं काम झालेंच.

**गण०**—ठीक है महाराज. पन पत्रांत काय लिवलया मला समजूंद्या.

**चं०**—अरे हें पहा तुला वाचून दाखवितों. ( असें म्हणून पत्र वाचूं लागतो. )

"तरवार बहादर रा० **रणछोडराय** यांस—आज्ञापत्र लिहिण्यांत येतें कीं, या घटकेस प्रसंग फार कठीण आला आहे. सबब पत्र देखत सर्व फौजेसुद्धां वाड्याजवळ हजर व्हावें. या वेळेस भरंवसा काय तो तुमचाच आहे. कळावें माघ शुद्ध १०, सोमवार दोनप्रहर. "

**चंद्रकांत.**

चं०—गणवा, ऐकलेंस पत्र! चल तर हें घे, आणि कसा मागल्या पायीं पळत येतोस. पहा, विलंब लागल्यास माझी पुनः भेट होणार नाहीं.
हा पहा निघालों. आपण स्वस्थ असावें.

( असें म्हणून निघून जातात. )

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

त्रि०—कां सूत्रधार, तुह्मी अगदीं मनचेच मुखत्यार झालांतना? कांहीं कुणाचा धाक?

सू०—अरे, पण कां? धाक कशाला? आह्मी गैर वागतों कीं काय?

वि०—अहो, पाहिजे तेव्हां विश्रांतवनांत जातां, वाटेल तेव्हां शृंगारपुरींत येतां हें काय? सर्व आपली मनचीच मुखत्यारी. असें कराल तर लागलींच चार्ज बसवून अर्ज करीन. आणि ससूपिंड करून दसपिंड पाहीन. मग माझा राग तर माहितच आहे तुम्हाला.

सू०—हा वेड्या. जीभ संभाळ. असे अमंगळ शब्द मुखावाटें कधीं काढूं नयेत. काळ आहे, वेळ आहे. कांहीं बोलणें झालें तर विचार करून शुभ शब्द असतील तेवढेच बोलावे; अशुभ मुखावाटें कधीं बोलूं नये.

वि०—तें असूंद्या हो. पण मग पुढें काय झालें तें एकदां दाखवा.

सू०—अरे, पहा आतां चमत्कार.

( सर्व निघून जातात. )

---

## प्रवेश ३.

### स्थळः-कृपासागराचा आश्रम.

### पात्रें.

कृपासागर................ऋषी.
भुवनपाल ................राजा.
सौंदर्यसागर.............त्याचा जामात.
प्रेमसागर................त्याचा जिवलग मित्र.
भालचंद्रभट..............उपाध्याय.
भुवनसुंदरी..............राणी.
हंसपालिका..............तिची कन्या.
क्षेमावती................कृ. ची. कन्या.
सावित्री..................तिची सखी.

( दुसरी पुष्कळ मंडळी व शृंगारपुरीचे प्रजाजन. )

सा०–कायग बाई क्षेमावती, परमेश्वरकृपेनें आपल्या तिघींचेही हेतु पूर्ण झालेना ?

क्षे०–खरेंच बाई. इतका हा हंसपालिकेचा उपकार.

हं०–माझाग बाई कशाचा उपकार! हा सर्व तुमचा उपकार बरीक खरा. तुम्हीं जेव्हां कृपासागरास वळविलेंत तेव्हांना हा प्रकार झाला.

सा०–अगबाई! तें असूंद्या आतां, कोणाचा कां उपकार असेना. उपकार ईश्वराचा खरा. पण बाई आतां नांवें घ्या सर्वजण एकदां. कसं बाई क्षेमावती ?

क्षे०–आह्मी नाहीं बाई घेणार. तुलाच फार नांव घेण्याची हौस आहे. तूंच घेइनास. कसं हंसपालिके ?

हं०—हो. ज्यानं प्रथमतः नांवाची गोष्ट काढली, त्यानंच अगोदर द्यावं.

क्षे०—( टाळी वाजवून ) हं. हं. ठीक झालं. घे आतां पहिल्यानं तूंच.

सा०—हे हो काय बाई. " पाटीलबोवा लग्न करा तर म्हणाले तुम्हीच करून द्या. " हें काय असं ?

क्षे०—अग तूंच प्रथमतः नांवाचं लचांड काढलं. आम्ही कां उकरून काढलं ?

सा०—बरं हो बाई. आतां नाहीं असं काढणार.

हं०—सावित्रीबाई, देवघराच्या दारांत काल आडविलं होतं त्यापेक्षां नांव घेण्याचं कां अवघड झालं ?

सा०—( यांनीं काल आपल्यास त्यांच्या बरोबर बोलतां पाहिलें असें जाणून. ) अहाहा ! क्षणोक्षणीं काय तरी थट्टा ? डोळ्याला डोळा उचलून पाहणें आणि गालांतले गालांत परस्परांनीं चोरून हंसणं त्यापेक्षां आमचें हें बरें.

हं०—( आपलें आणि त्यांचें हसणें इनें पाहिलें असें जाणून ) अग बाई सावित्री, फुलांचे गजरे कोणी नसलें म्हणजे एकमेकांस मारावे त्यापेक्षां नुसतें हंसणें बरें नव्हे कां ?

क्षे०—( आमचा खेळ हंसपालिकेनें कधीं पाहिला कोण जाणें. ) बाई पुरे आतां. उखाळ्या पाखाळ्या कां उगीच काढतां ? नांव घेणं असेल तर जलद द्या कसं. आतां मंडळी घरीं येतील.

हं०–हो खरंच, आत्तां आई गंगेवरून येईल.

क्षे०–अग आई आली तरी चिंता नाहीं. पण पुरुष सर्व आले म्हणजे आपलें व्यर्थच जाईल.

सा०–एकूण आतां मजवरच आलेंना ?

क्षे०–हो, तूं प्रथमतः काढलं तें आतां निस्तर.

सा०–ऐका आतां–" नवलाखाचा शालू त्याला हजाराची दशी आणि "–( लाजते. )

क्षे०–हेंग काय बाई ! वा ! काय तरी पण. असं करशील तर आम्हीं आपल्या जातों. चलग हंसपालिके.

सा०–घेतेंहो पण. इतकं जायला नको लागलींच.

" नवलाखाचा शालू त्याला हजाराची दशी–भालचंद्रजीला उदंड असल्या दासी तरी त्यांत सावित्रीच खाशी. "

क्षे०–अग बाई ! केवढा तरी डौल.

सा०–चल बाई आतां तूं घे कशी.

क्षे०–मी होय. मग हंसपालिका कां घेईना अगोदर.

हं०–मी बाई मग घेईन. तुम्हीच ध्या अगोदर.

क्षे०–हजाराचा शालू त्याला मोतींघोस पदर–( लाजते. )

सा०–कांग आतां ? " लोकां सांगे ब्रह्मज्ञान आणि आपण कोरडे पाषाण. "

क्षे०–हो पण इतकं बोलायला नको कांहीं.

"हजाराचा शालू त्याला मोतींघोस पदर, माधवरावांची उदंड असली कदर तरी क्षेमावतीवर प्रेमाचीच नजर."

सा०—वाहवाग बाई ! खूपच ठेऊन दिली. आतां हंसपालिके, तूं घे बाई. म्हणजे आपलें काम झालें.

हं०—बरं बाई घेतें हो.—“ रत्नखचित चोपाळा त्याला कांचनाच्या कड्या आणि ”—( लाजेत. )

क्षे०—तें नाहीं चालणार. घेतलेंच पाहिजे.

हं—बरं बाई तुह्मी कुठल्या सोडायला.

“ रत्नखचित चोपाळा त्याला कांचनाच्या कड्या सौंदर्यसागरांनीं हंसपालिका बायको मिळावी ह्मणून उदंड आणल्या साड्या तरी हव्यात जरतारीच्याच घड्या. ”

सा०—अहाहा ! याचें नांव नांव. नाहीं तर मेले उष्टे उखाणे आणि उष्टीं नांवें.

( इतक्यांत स्नानास गेलेली पुरुष मंडळी येतात. )

भु०—( हात जोडून. ) महाराज कृपासागरजी, आपल्या कृपेनें आज धन्य धन्य झालों. कन्या भेटली, विवाहसुख डोळ्यानें पाहिलें. सर्व आनंदी आनंद झाला. आतां आह्मा उभयतांस काशीयात्रेस जाण्याची परवानगी द्या. आणि थोडेंसें मला विचारणें आहे, तेवढी शंका दूर करा.

कृ०—अरे भुवनपाला, उत्तम झालें. तीन लग्नें एका मांडवांत झालीं, माझ्या क्षेमावतीचाही सोहळा थाटानें झाला. तसेंच सावित्रीसही स्थळ उत्तम मिळालें. आणि तुझ्या हंसपालिकेचें तर अक्षय कल्याणच झालें. ती पृथ्वीचें स्वामित्व करील हा माझा

पूर्ण आशीर्वाद आहे. आतां तुला काय शंका आली असेल तिचें दूरीकरण करून घे.

भु०—महाराज, शंका इतकीच कीं, हंसपालिका मला कन्या प्राप्त झाली, ती मोहनबागेंत सुमारें सहा महिन्यांची हंसपक्षांत सांपडली. ती कोणाची होती आणि तेथें पडली कशी वगैरे कांहींच खुलासा आजपर्यंत समजला नाहीं. तर एवढी शंका दूर करा.

कृ०—अरे भुवनपाला, ऐक. पूर्वी इंद्रशापानें वीर्यसेन गंधर्व मृत्युलोकीं स्त्रीरूपानें विहार करीत होता. तुझ्या मोहन बागेच्याच आसपास ती शापानें स्त्री होऊन हिंडत असतां, माधुर्यनामा ऋषी तिला पाहून कामातुर झाला. नंतर उभतांचें प्रेम जमून ती स्त्री गरोदर राहिली; पुढें दिवस पूर्ण होतांच, मोहन बागेच्याच झाडींत ती प्रसूत झाली. मग कन्या सहा महिन्यांची झाली नाहीं, तोंच शापाचे दिवस पूर्ण झाल्यामुळें वीर्यसेन पुनः स्त्रीचा पुरुष झाला. परंतु तो मोठा वीचारांत पडला कीं, कन्या सहा महिन्यांची, आणि इंद्र सेवेस तर गेलें पाहिजे; आतां काय करावें ? विर्यसेन असा संकटांत आहे, असें पाहून इंद्रानें स्वतः त्यास दर्शन देऊन सांगितलें कीं, बा वीर्यसेना, काळजी करूं नकोस, जगदंबेनें येथील भुवनपाल राजास कन्या प्राप्त होईल ह्मणून आशीर्वाद दिला आहे, तेव्हां तो आतां स्त्रीसहवर्त-

मान या ठिकाणीं येईल. तूं कन्येस येथेंच ठेवून मज-बरोबर चल. आपण गेल्यावर भुवनपाल येथें येई-पर्यंत ह्या कन्येचें संरक्षण हंस पक्षी करितील. आणि माझ्या आशीर्वादानें पुढें ही पृथ्वीची स्वामिनी होई-ल. असें ह्मणून इंद्र व वीर्यसेन कन्येस मोहन बागें-त टाकून गेले, व नंतर तुला ती सांपडली. " भुव-नपाला, जगदंबेच्या आशीर्वादाची ही कन्या आहे. तेव्हां उभय कुळाचा उद्धार करील. आतां तुला काशी यात्रेस जाणें आहे, तर तुझ्या जामातास गा-दीवर बसवून मग खुशाल जा.

भु०—महाराज. गादीवर तर माझा व्याही, सौं-दर्यसागराचा बाप चंद्रकांत आहे.

कृपा०—अरे, ईश्वरकृपेनें भूत भविष्य वर्तमान तिन्ही काळांचें ज्ञान मला आहे. चमत्कार पहा आ-तां काय होतो तो. ( इतक्यांत शृंगारपुरीचे प्रजाजन पर्णकुटीजवळ हजर होतात. )

भु०—बाहेर काय गलबला आहे ? ( इतक्यांत प्रेमसागर आंत येऊन. )

प्रे०—कृपासागर महाराज, अहो भुवनपाल म-हाराज, शृंगारपुरींतील धनपालासह हजारो प्रजाजन शरण शरण ह्मणून प्राप्त झाले आहेत. त्यांना दर्शन द्यावें महाराज; मुख्य धनपाळ जो सावकार तो पाद-चारी असून रुमालानें हात बांधले आहेत. शिवाय सहस्रावधी संभावीत लोक दांतीं तृण धरून शरण

आले आहेत. कैक हत्तीवर बसून व गाड्यांतून, आणि घोड्यावरून आले आहेत, याकरितां दर्शन द्यावें ही विनंती आहे.

कृपा०–भुवनपाला, चल आपण त्या प्रजाजनांस सामोरें जाऊन दर्शन देऊं.

भु०–आज्ञा महाराज. ( असें ह्मणून कृपासागर व भुवनपाल, सौंदर्यसागर, भालचंद्र, प्रेमसागर सर्व मंडळी पर्णकुटीबाहेर सामोरे जातात. आणि तिकडून धनपालासह प्रजाजन येऊन परस्परांच्या मध्यंतरीं भेटी होतात. )

धन०–मी साष्टांग नमस्कार करून विनंति करतों कीं, आह्मी सर्व प्रजाजन या पायांस शरण आलों आहों. याकरितां शृंगारपुरीस येऊन आह्मां दीन प्रजेचें पुत्रवत् पाळण करावें. आपण आह्मांस टाकून आल्यापासून मागें जी आमची चंद्रकांतानें दुर्दशा केली, ती सांगतां एक ग्रंथच होणार आहे. असो. आह्मी अति त्रस्त झाल्यावर सर्वजण एक ठिकाणीं मिळून सिंव्हचलास अनुकूल करून घेतलें, आणि चंद्रकांतावर हल्ला केला. चंद्रकांत कोठें गेला याचा पत्ता नाहीं. याप्रमाणें आह्मी त्रस्त झालेलों प्रजाजन शरण आलों आहोंत. तर आमचा अनादर न होतां पूर्वीप्रमाणें गादीवर बसून रक्षण व्हावें. ( असें ह्मणून धनपालासह सर्व हात जोडून नमस्कार घालतात.)

कृ०—भुवनपाला, सर्व प्रजाजन शरण आले आहेत; करितां शृंगारपुरींत सौंदर्यसागराम व हंसपालिकेस राज्याभिषेक करून नंतर तुह्मी वाराणशींत उभयतांनीं जावें असा माझा हेतु आहे.

भु०—( हात जोडून ) ठीक आहे महाराज. मी आपले आज्ञेबाहेर नाहीं. ( असें ह्मणून सर्व कृपासागरास नमस्कार करून शृंगारपुरीस जाण्यास निघाले.)

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

विदू०—कां सूत्रधार, तुह्मी आमची बायकोना ? माझे मनातून एकदां नांव घ्यावें असें आलें आहे.

सू०-अरे तर मग घे. इतका लाजतोस कां ?

वि०—घेऊंच तर ? हें पहा— पण कांहो ? इंग्रजी घेऊं कां गुजराथी घेऊं ?

सू०—अरे हें काम तुझ्या आवडीचें आहे, तेव्हां तूं आपले इच्छेप्रमाणें घे.

वि०—बरें तर. हें पहा—समोर होता कोनाडा त्यांत होतें वासकूट आणि—सूत्रधार, लाज वाटते बुवा.

सू०—अरे घेणें असेल तर घे लवकर. आतां मी नाटक आटपणार.

वि०—हें पहा समोर होता कोनाडा त्यांत होतें वासकूट आणि सूत्रधारी माझ्या बायकोनें खाल्लें बिस्कूट.

सू०—वः ! खूप मजा केलीस बाबा. अरे पण गुजराथी नांव कसें घेतोस पाहूं बरें.

वि०–वा हें पहा–सामे हतो गोखलो तेमां हतो कांचळो, अने सुत्रधार बायडी मेरी वात सांचळो."

सू०–( मोठ्यानें हसून ) खूप मजा केलीस बाबा. शाबास अरे. आतां एकदां शृंगारपुरींत जाऊं आणि नाटक आटपूं.

वि०–वा मधाशीं तें पत्र पाठविलें चंद्रकांतानें रणछोडरायाला, त्याचें पुढें काय झालें तें सांगितलें नाहीं. आणि नाटक आटपूं ह्मणतां काय ?

सू०–अरे, मघांचा झाला उलगडा. ह्मणजे तुला स्पष्ट सांगूं, काय अशिक्षित मनुष्य मोठ्या हुद्यावर ठेविला ह्मणजे असाच परिणाम होतो. बरें झालें, चंद्रकांत पळाला; नाहीं तर त्या दंग्यांत ठार मेला असता. चंद्रकांताचें पत्र रणछोडरायास पोंचलें. पण काय ? दुसऱ्याकडून वाचवावें तर अब्रु जाते, आणि स्वतः वाचण्यास घंघाळभर पाणी पाहिजे. याच कारणानें त्या घाईच्या वेळीं, पत्रांतला भाव रणछोडास न समजून चंद्रकांतास सर्व सुखाचा अभाव झाला. परंतु प्रजाजनांचा स्वभाव चांगला असल्यामुळें भाव धरून त्यांनीं भुवनपालाकडे धांव घेतली. आणि सर्व आनंद केला. याप्रमाणें झालें. आतां थोडा वेळ आपण सुधारलेल्या व आनंदानें भरलेल्या शृंगारपुरींत जाऊं येतोस काय ?

वि०–हो. हा पहा निघालों. सर्व निघून जातात.

( पडदा पडतो. )

---

# प्रवेश ४.

## स्थळः—शृंगारपुरांतील धनपाळांचा वाडा.

### पात्रें.

धनपाळ.........................सावकार.
विनायकपंत...................त्याचा कारभारी.

( इतर गांवांतले सर्व प्रजाजन. )

वि०—(हात जोडून) प्रजाजनहो, धनपाळशेटजीनीं आज सर्वांस एकळ्याकरतां पाचारण केलें आहे कीं, आपल्या शहरची व आपली पूर्वींची स्थिति कशी होती, व हल्लीं कशी आहे. कर सुटले, देवस्थानें सुरूं झालीं, न्याय बरोबर मिळूं लागला, पर्जन्य यंदा हवा तसा पडला; चोंहींकडे स्वस्थता झाली, गोरगुरिबांस धर्मार्थ अन्न मिळूं लागलें, तसेंच ठिकठिकाणीं गरिबांकरतां दवाखाने स्थापन झाले, शेंकडो देवळांचा जीर्णोद्धार झाला, कित्येक नवीं देवळें झालीं, शहरांत पाण्याची कमताई होती, ती ठिकठिकाणीं नवे हौद झाल्यामुळें मोडली, चोरी, दरवडे वगैरे घालणाऱ्या लोकांस योग्य शासनें मिळूं लागलें, प्रजेच्या सुखाकरतां व शहरच्या सुधारणुकीकरतां पंच नेमिले, दिवाणी फौजदारी कामें नियमानें व्हावींत ह्मणून नियम ठरऊन टाकिले, व कांहीं नवीन ठरविण्याची गरज लागली, तर त्या कामावर चतुर निस्पृही मंडळी स्थापन केली, मोठमोठीं हुद्यांचीं कामें चांगल्या चांगल्या

विद्वान् लोकांस दिलें, ह्याच्या कामावर अशिक्षित मनुष्य नसल्यामुळें अनर्थ होणें बंद झाला, फितुरी करणारीं मनुष्यें हद्दपार केलीं, ठिकाठिकाणीं विद्याभ्यासाकरितां शाळा स्थापन झाल्या, हांजी हांजी करणारे राज्यांतले लोक काढून लाविले, मद्य वगैरे अमली पदार्थांचीं दुकानें बंद करून टाकिलीं, याप्रमाणें नवीन आपले प्रभू जे सौंदर्यसागर व मातोश्री हंसपालिका राणीसाहेब यानीं सुधारणा करून सर्व प्रजेस सुख दिलें, अशा आपल्या प्रभूचें कल्याण व्हावें, ह्मणून सर्वांनीं आप या जातीधर्माप्रमाणें आपापल्या देवाची प्रार्थना करावी, आणि आपण प्रजा, हा प्रभू झाल्यापासून आनंदीत झालो, वगैरे आनंद प्रकार उघडपणें सर्वांनीं दर्शवावा; म्हणून शहरांत सर्वांनीं आपल्या धर्माप्रमाणें ब्राह्मणभोजनें, हरिकीर्तनें, दीपोत्साह वगैरे करावेत, आणि निरंतर प्रभूचें यश चिंतून रहावें. कळावें, सर्वांनीं आजरोजीं आपापल्या शक्तीप्रमाणें घरोघरीं आनंदोत्साह करावा. ज्यांना अगदींच सामर्थ्य नसेल त्यांस आमचे धनपाळशेट मदत करतील.

**धन०**—अहो सभासदहो, याकरतांच तुह्मां सर्वांस आज येथपर्यंत यावयाची तसदी दिली. (असें बोलणें झाल्यावर पानसुपारी घेऊन सर्व प्रजाजन आनंदानें आपले घरीं उत्सव करण्यास निघून जातात, व सौंदर्यसागर हंसपालिकेसह आनंदानें राज्य करतो.)

( पडदा पडतो. )

( पडद्याबाहेर. )

सू०—विदूषका, पाहिलासना भाग? याप्रमाणें आनंद झाला. भुवनपाल व भुवनसुंदरी पुढें वाराणशींत जाऊन राहिलीं. त्यांस दरमहा सव्वा लक्ष रुपये सौंदर्यसागर पाठवूं लागला, आणि सौंदर्यसागराचा बाप जो दुष्ट राजा चंद्रकांत त्यालाही साठ हजार रुपये दरमहाची नेमणूक भुवनपालानें सांगितलें म्हणूनच सौंदर्यसागर देऊं लागला. तो चंद्रकांतही शेवटापर्यंत वाराणशींतच राहिला. असो. याप्रमाणें चरित्र समाप्त झालें. आतां सभासदांनीं मेहरबानगी करावी, व तुम्हाही सांगतों कीं, कदाचित् सभासदांनीं आपला उदार आश्रय मला पुनः दिला तर या रंगभूमीवर दुसरें अद्भुत चरित्र करण्यास मला यावयाचें आहे. तेव्हां तूंही कृपा करून येहो.

वि०—हें काय विचारावें महाराज! तुम्ही आतां जातां व सर्व सभासद आनंदानें जातात. परंतु मला फार वाईट वाटतें. पण पुनः तुम्ही लवकरच चरित्र करून मला बोलविणार, हें ऐकून मात्र संतोष होतो. असो. ईश्वरकृपेनें तुमची आमची व सभासदांची पुनः लवकरच भेट होवो ही आशा आहे. चला आतां सूत्रधार, बाहेर उजाडण्याचा सुमार आला आहे. तेव्हां कांहीं ईश्वरस्मरण करूं चला. (निघून जातात.)

समाप्त.